


जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २० ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०




# शनिवार वाड्यात नमाज पठणाने वाद

## खासदार मेधा मुलकर्णींनी व्यक्त केली नाराजी



**पुणे/ प्रतिनिधी** : पुण्यातील ऐतिहासिक शनिवार वाड्यात नमाज पठण केल्याचा दावा केला जात आहे. याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल होत आहे. या घटनेनंतर शहरात मोठी खळबळ उडाली असून, विविध हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत.

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पतित पावन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शनिवार वाड्यात आंदोलन केलं. संघटनेने सांगितलं की, त्यांनी त्या जागेवर गोमूत्र शिंपडून ती जागा पवित्र केली तसेच शेणाने सारवून जागा शुद्ध ☞(पान २ वर)

# बिहारमध्ये INDIA आघाडीत फूट?

## जागावाटप अन् CM चेहऱ्यावरून काँग्रेस-आरजेडीत घमासान

**पटना /वृत्तसंस्था--** विरोधी पक्षाच्या इंडिया आघाडीत फूट पडण्याची चिन्हे दिसत आहेत. ज्या बिहारमधून इंडिया आघाडीची सुरुवात झाली तिथेच ही आघाडी विखुरताना दिसत आहे. बिहारच्या पटना येथे २३ जून २०२३ साली नितीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली विरोधकांची पहिली बैठक झाली होती. मात्र आज २ वर्षांच्या कमी काळातच नितीश कुमार एनडीएत परतले आणि बिहारमध्ये भाजपाविरोधात जी एकजूट तयार करण्यात आली होती. ती इंडिया आघाडीही तुटण्याच्या मार्गावर आहे.

इंडिया आघाडीने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत २३४ जागांवर विजय मिळवत त्यांची ताकद दाखवून दिली. परंतु त्यानंतर झालेल्या महाराष्ट्र, हरियाणा आणि दिल्लीसारख्या निवडणुकीत विरोधकांच्या आघाडीला शह मिळाला. तृणमूलसोबत आघाडीचे नेतृत्व कोण करणार यावरून झालेला संघर्ष असेल किंवा दिल्ली निवडणुकीत आपसोबत फिस्कटलेली चर्चा असेल, आता काँग्रेस आरजेडीसोबत जागावाटप आणि मुख्यमंत्रि?पदाच्या चेहऱ्यावरून वादात सापडली



आहे. बिहारमध्ये अनिश्चितता असताना शेजारील झारखंड राज्यातही झटका लागला आहे. याठिकाणी जेएमएमसोबत आघाडीवर पुन्हा विचार सुरू आहे. त्यामुळे इंडिया आघाडीचा प्रवास इथेच संपणार का असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

बिहारमध्ये आरजेडी आणि काँग्रेस यांच्यात जागावाटपावरून रस्सीखेच सुरू आहे. मतदानाच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया संपल्यानंतरही अद्याप जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला नाही. त्यामुळे महाआघाडीत अनेक जागांवर एकमेकांविरोधात उमेदवार उतरवण्यात आले आहेत. वैशाली, लालगंज, कहलगाव, बिहारशरीफसारख्या ठिकाणी आरजेडी आणि काँग्रेस यांच्यात थेट सामना आहे तर बछवाडा, रोसरा येथे सीपीआयची काँग्रेससोबत लढत आहे. दुसरीकडे आरजेडी नेते मृत्यूंजय तिवारी यांना अजूनही महाआघाडीतील मतभेद संपुष्टात येण्याचा विश्वास आहे. आरजेडी केवळ बिहार, झारखंडमध्ये निवडणूक लढते. आम्ही काँग्रेसकडून कर्नाटक, राजस्थान, मध्य प्रदेशातील जागांची मागणी केली नाही. त्यामुळे काँग्रेसने राज्यातील परिस्थिती समजून घ्यावी असं त्यांनी सांगितले.

दरम्यान, तेजस्वी यादव यांना महाआघाडीचा मुख्यमंत्रि?पदाचा चेहरा घोषित करावा अशी मागणी आरजेडी नेते करत आहेत. काँग्रेसने अद्याप हा प्रस्ताव मान्य केला नाही. बिहारमध्ये काँग्रेसचे काही नेते खासगीरित्या यादव यांना पसंत करतात परंतु पक्षाचे केंद्रीय नेतृत्व ☞(पान २ वर)

# ओबीसींना राजकारणापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र हाणून पाडले - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर/ प्रतिनिधी :** मागच्या ठाकरे सरकारने सर्वोच्च न्यायालयात योग्य बाजू न मांडल्याने निवडणुकीत ओबीसींचे आरक्षण गेले. ओबीसींना राजकारणापासून वंचित ठेवण्याचे हे षडयंत्र होते. आमच्या सरकारने न्यायालयात भक्कम बाजू मांडली आणि गेलेले २७ टक्के आरक्षण पुन्हा आणले. राजकारणातून ओबीसींना वंचित ठेवण्याचे विरोधकांचे षडयंत्र हाणून पाडले अशी टीका करीत सध्याच्या निवडणुका या २७ टक्के आरक्षणानुसारच होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे सांगितले. मराठा समाजाला न्याय देताना ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, अशी आमची भूमिका असल्याचेही त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले.

महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (महाज्योती) सात माळ्यांची भव्य प्रशासकीय इमारत सदर येथील नियोजन भवनाजवळ उभारण्यात येत आहे. या इमारतीचे भूमिपूजन रविवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी



ते बोलत होते. याप्रसंगी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तसेच 'महाज्योती'चे अध्यक्ष अतुल सावे आणि वित्त, नियोजन, मंत्री ?ड. आशिष जयस्वाल यांच्यासह खासदार श्यामकुमार बर्वे, आ.डॉ. परिणय फुके, आ. कृष्णा खोपडे, आ. चरणसिंग ठाकूर, आ. आशिष देशमुख, आ. संजय मेश्राम, डॉ. बबनराव तायवाडे, हेमंत काळमेघ आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २०१४ मध्ये सरकार आल्यानंतर सर्वप्रथम ३५० जाती समुहाच्या विकासासाठी ओबीसी मंत्रालय सुरू केले. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरू करतानाच प्रवेश न मिळालेल्यांना भत्ताही देण्यात आला. बार्टीच्या ☞(पान २ वर)

# मतचोरी करूनच मोदी पंतप्रधान आणि फडणवीस मुख्यमंत्री झालेत- हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

**मुंबई/ प्रतिनिधी** : 'मतदार याद्यांमध्ये प्रचंड घोटाळे करण्यात आलेले आहेत. भारतीय जनता पक्षाला अनुकूल नावे समाविष्ट करणे व विरोधांना अनुकुल असलेल्यांची नावे वगळणे, एकाच घरात ८० किंवा १०० मतदार, घर नंबर नसलेल्यांची नावे, वयांमध्ये फेरफार असे अनेक प्रकारचे गोंधळ यादीत आहेत. देशात व महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाचे आलेले सरकार हे मतचोरी करून आलेले आहे. मतचोरी करूनच नरेंद्र मोदी पंतप्रधान तर देवेंद्र फडणवीसमुख्यमंत्री झाले आहेत. म्हणूनच निवडणूक आयोगाची पाठराखण भारतीय जनता पक्ष व देवेंद्र फडणवीस करत आहेत', असा घणाघाती आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.



**आयोगाविरोधात मोर्चाला काँग्रेसचे समर्थन**

ते पुढे म्हणाले, 'मतदारांची वाढलेली संख्या अनाकलनीय आहे. याचे पुरावे निवडणूक आयोगाला सादर केलेले असताना निवडणूक आयोगाकडून जी उत्तरे दिली जात आहेत, ती समाधानकारक नाहीत व पटणारीही नाहीत. निवडणूक आयोगाची भूमिका कटपुतलीच्या बाहुल्यासारखी आहे. निवडणूक आयोगाचा कारभार पाहता त्यांच्याविरोधात मोर्चा काढण्याची तयारी केली जात आहे. तसा निर्णय झाला तर काँग्रेस पक्ष त्याचे समर्थन करेल.'

**पुण्यातील जमीन घोटाळा प्रकरण-** 'पुण्यातील जैन बोर्डिंग हाऊसची जागा हडप करण्याचा प्रकार युवक काँग्रेसने उघड केला आहे. या प्रकरणात केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचा जवळचा संबंध असल्याचे उघड झाले आहे. या जमीन व्यवहारात धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयातून तत्काळ परवानग्या देण्यात आल्या, हे धर्मादाय आयुक्त व मुख्यमंत्री यांचे निकटचे संबंध असल्याचे ☞(पान २ वर)

# निवडणूक आयोगाविरोधात १ नोव्हेंबरला मुंबईत निघणार विराट मोर्चा

## सर्वपक्षीय विरोधकांची घोषणा

**मुंबई/ प्रतिनिधी :-** निवडणुकीतील मॅच फिक्सिंगविरोधात विरोधकांचा लढा आहे. घुसखोर मतदारांना यादीतून बाहेर काढणे ही लोकशाहीची गरज आहे मात्र निवडणूक आयोग विरोधकांचे आक्षेप गांभीर्याने घेत नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या मनमानी आणि भ्रष्ट कारभाराविरोधात येत्या १



नोव्हेंबरला मुंबईत सर्वपक्षीय विरोधकांचा विराट मोर्चा काढण्यात येईल. या मोर्चातून निवडणूक आयोगाला दणका देण्याचं काम विरोधक करतील अशी घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली आहे. शिवसेना भवन येथे झालेल्या सर्वपक्षीय विरोधकांच्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील, मनसेचे नेते बाळा नांदगावकर, काँग्रेस नेते सचिन सावंत, कम्युनिस्ट नेते प्रकाश रेड्डी यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेत संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्रातील मतदार यादीत घुसलेले ९६ लाख म्हणजे जवळपास १ कोटी मतदार यांना बाहेर काढले पाहिजे. ☞(पान २ वर)




# धावत्या रेल्वेतून ३ प्रवाशी पडले, २ मृत्यू

**नाशिक /वृत्तसंस्था--** मुंबईच्या लोकमान्य टिळक टर्मिनसहून बिहारला जाणाऱ्या कर्मभूमि एक्सप्रेसमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. नाशिक रोड रेल्वे स्टेशनच्या काही अंतरावर धावत्या रेल्वेतून ३ प्रवासी खाली पडले आहेत. ज्यातील दोघांचा जागीच मृत्यू झाला असून १ जण गंभीर जखमी आहे. हे प्रवासी दिवाळीसाठी गावी जात होते की, बिहार निवडणुकीत सहभागी होण्यासाठी जात होते हे अद्याप स्पष्ट नाही. सध्या या घटनेची चौकशी करण्यात येत आहे.

या घटनेची माहिती मिळताच नाशिक रोड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह ताब्यात घेतले. माहितीनुसार, ही दुर्घटना भूसावळच्या दिशेने जाणाऱ्या ट्रॅकवर घडली. यातील दोन मृतकांचे वय ३० ते ३५ यातील आहे. तिसऱ्या प्रवाशाची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर सरकारी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या तिन्ही प्रवाशांची ओळख पटू शकली नाही. पोलिसांनी आकस्मिक मृत्यू असं या घटनेची नोंद केली आहे.




# सध्या 'मनोमिलन' नाटकाचं जोरदार प्रमोशन सुरू

## एकनाथ शिंदेंचा उद्धव अन् राज ठाकरेंना टोला

**अंबरनाथ/ वृत्तसंस्था- -** भाऊबंदकी नावाचे नाटक एकेकाळी फार गाजले होते, मात्र आता मनोमिलन नाटकाचे जोरदार प्रमोशन सुरू झाले आहे असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव आणि राज ठाकरे बंधूंवर जोरदार टीका केली. आम्ही कामाने ' पछाडलेली' लोकं असल्याने आमच्या कामांचा 'धूमधडाका' पाहून विरोधकांचा 'थरथराट' होत असल्याची मिश्किल टिप्पणी त्यांनी केली.



अंबरनाथमधील धर्मवीर आनंद दिघे नाट्यमंदिराचे पद्मश्री अशोक सराफ यांच्या हस्ते लोकार्पण पार पडले. या कार्यक्रमात एकनाथ शिंदे म्हणाले की, स्वर्गीय आनंद दिघे यांच्या नावाने अंबरनाथ मध्ये उभ्या राहिलेल्या या नाट्यगृहाच्या निर्मितीमुळे ठाणे आणि कल्याण-डोंबिवलीच्या प्रेक्षकांना न जाता आता येथेच दर्जेदार नाटकांचा आस्वाद घेता येईल. ज्यांनी या नाट्यगृहाची संकल्पना मांडली, बांधकाम केले. त्या सर्वांचे मी अभिनंदन करतो. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी हे नाट्यगृह साकार करून अंबरनाथच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्णपान जोडले गेले असल्याचे सांगितले.

तसेच अशोक सराफ हे नाट्यकलेचे चालते-बोलते विद्यापीठ आहेत. त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याचा योग मला आला. आज इतके दिग्गज कलाकार येथे एकत्र आल्याने जणू काही अंबरनाथमध्ये तारांगणच अवतरले आहे. अशोक सराफ यांचे एक खूप गाजलेले नाटक आहे, सारखे छातीत दुखतय, शिवसेनेचे यश पाहून देखील काही लोकांच्या पोटात दुखते असा चिमटा शिंदेंनी विरोधकांना काढला. मी कोणावर टीका करत ☞(पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शिवसेना उबाठा बालेकिल्ल्यात कोणाला मिळणार उमेदवारी

## -सातेगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये निवडणुकीच्या रंगतात चर्चा

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** मिनी मंत्रालय म्हणून समजले जाणारे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. भावी उमेदवारांचे लक्ष गटाच्या आरक्षणाकडे लागले होते.सातेगाव जिल्हा परिषद गटाचे आरक्षण अनुसूचित जातीकरीता आरक्षित झाले आहे.कोकरड व सातेगाव तालुक्यातील महत्वाचे गावे आहेत.हे दोन्ही तालुक्यांचे सेंटर असुन शिवसेना उबाठाचे बालेकिल्ला गट आहे. सातेगाव जिल्हा परिषद गटातील राजकीय आखाड्यातील संभाव्य उमेदवार कोकरड असावा अशी त्या भागातील ठिकठिकाणी चर्चा रंगत आहे. तर सातेगाव भागातील विहीगाव भागातील असावा अशी त्या भागातील चर्चा आहे. सातेगाव जिल्हा परिषद गटातील उमेदवार पक्षाने स्थानिक द्यावा म्हणून जोरदार हालचाली सुरू झाल्या असल्याचे दिसून येत आहे.

अंजनगाव सुर्जी तालुक्याला एकाच पक्षाचे दोन आमदार लाभले असून एक आमदार विधानसभेवर गजानन लवटे तर एक आमदार विधान परिषदेवर निवडून आले आहे. त्यामुळे या निवडणुकीत सातेगाव सर्कल मध्ये शिवसेना उबाठा बालेकिल्ल्यात कोणाला उमेदवारी देणार या कडे मतदार लक्ष देऊन आहे.



माजी पंचायत समिती सभापती मनोहर माहुरे, विधान परिषद आमदार ज.मो. अभ्यंकर यांचे सुपुत्र प्रशांत अभ्यंकर तर शिवसेना उबाठा चे कट्टर समर्थक संजय बाबनेकर यांची कन्या डिंपल बाबनेकर जिल्हा परिषद उमेदवारी साठी इच्छुक आहेत.आमदार ज.मो. अभ्यंकर यांचे सुपुत्र प्रशांत अभ्यंकर यांनी विधानसभा निवडणुकीची तयारी केली होती. त्यावेळी त्यांना विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान पक्षाने पुढील संधीसाठी आश्वासन दिले होते. त्यामुळे त्यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली होती. सातेगाव जिल्हा परिषद अनुसूचित जाती आरक्षित झाले असून याच जिल्हा परिषद गटात प्रशांत अभ्यंकर यांचे विहीगाव असल्याने त्यांना उमेदवारी देण्यात यावी अशी चर्चा शिवसेना उबाठा गटात होत आहे. त्यामुळे प्रशांत अभ्यंकर यांनी मोर्चे बांधणी केली आहे. यामुळे शिवसेना उबाठा पक्षाकडून त्यांचे संभाव्य उमेदवार म्हणून नाव घेतले जाते.

आमदार ज.मो. अभ्यंकर यांचा अंजनगाव सुर्जी तालुक्यात येथे मोठा जनसंपर्क असून जिल्हा परिषद सातेगाव गटात त्यांचे नातेसंबंध व कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे तसेच या गटातील अनेक गावचे सरपंच शिवसेना उबाठा पक्षाचे असून गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना उबाठाचे उमेदवार या गटात विजय होत आले आहे तसेच काँग्रेस पक्षाचे खासदार बळवंत वानखडे यांनीदेखील जोरदार मोर्चे बांधणी केली असून त्यांचाही चांगला जनसंपर्क आहे. उबाठा, काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी यांनी आपले उमेदवार आगामी निवडणूक लढवणार असल्याने ही निवडणूक अटीतटीची होणार यात शंका नाही तर पैशाच्या जोरावर मतदान विकत घेऊन निवडणूक जिंकू असे अपक्ष उमेदवारांचे समर्थक बोंब ठोकताना दिसत आहे. वंचित बहुजन आघाडी निवडणूक लढवणार असल्यामुळे कॉंगेस पक्षा समोर मोठे आव्हान निर्माण झाले.

सातेगाव जिल्हा परिषद गटात १८ ते २० लहान मोठी गावे असून १५ हजारांच्या जवळपास मतदार आहे त्यामध्ये सर्वाधिक कुणबी,माळी मतदार असून त्या खालोखाल , दलित, मुस्लिम आहे. त्यामुळे येणारा वेळच सांगणार कुणाच्या गळ्यात उमेदवाराची माळ पडणार आहे.

### सुशिक्षित उमेदवार मिळण्याची शक्यता-

सातेगाव कोकरड जिल्हा परिषद सर्कल हा शिवसेना उबाठा चा बालेकिल्ला सर्कल असल्याने या सर्कल मधुन निवडून येणारे अनेक उमेदवार हे जिल्हा परिषदवर मोठ्या पदावर गेले आहे. या सर्कल मधुन शिवसेना पक्षाने कोणताही उमेदवार दिला तरी पक्ष कार्यकर्त्यांनी निवडून आणले आहे. त्यामुळे यावेळी शिवसेना उबाठा पक्षाने सुशिक्षित उमेदवाराला उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी शिवसैनिक पक्षाकडे करणार असल्याची माहिती समोर येत आहे.

# आनंदवाडी येथे डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेची विटंबना

## -शेकडो आंबेडकरी अनुयायांची पोलीस ठाण्यावर धडक

**तिवसा/प्रतिनिधीः-** शहरातील आनंदवाडी परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेल्या एलइडी बॅनरला दगड मारून प्रतिमेची विटंबना केल्याची घटना रविवार (ता.१९) रोजी मध्य रात्री ३ वाजता दरम्यान घडली. या घटनेने तिवसा शहरातील आंबेडकरी अनुयायांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. आरोपी विरुद्ध कारवाई करण्याची मागणी तिवसा पोलीस ठण्यात तक्रारीतून करण्यात आली आहे. शहरापासून एक किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या आंनदवाडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कमान असून या कमानीवर डॉ.आंबेडकर यांचा फोटो असलेल्या झगझम रोशनाईचे एलइडी बॅनर येथील तरुणांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने लावले होते.याच बॅनरला दगड मारून त्याची तोडफोड करण्यात आली.सकाळी ही बाबत येथील



नागरिकांच्या लक्षात येताच हे कृत्य करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी तिवसा पोलीस ठण्यावर शेकडो महिला, पुरुष,तरुणांनी धडक दिली. आरोपीला अटक करण्याची मागणी केली असून पोलीसांनी अज्ञात विरुद्ध गून्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहे.

> सदर कृत्य हे समाजातील शांतता, बंधुता आणि समानतेच्या मूल्यांवर आघात करणारे असून, सार्वजनिक भावना भडकविणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या प्रतिमेचा अवमान खपून घेतला जाणार नाही.
>
> **-सम्यक हगवणे, आंबेडकरी कार्यकर्ता.**

# अभिमानस्पद : जिल्हा परिषदेचे ३२ विद्यार्थी विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र

## -मुलींचा सहभाग लक्षणीय



**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, नांदगाव पेठ येथील विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली. विविध खेळप्रकारात ३२ पेक्षा अधिक विद्यार्थी विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. यवतमाळ आणि वाशीम येथे होणाऱ्या या विभागीय स्पर्धांमध्ये हे विद्यार्थी अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

१४ ते १९ वयोगटातील मुला-मुलींसाठी आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये धावण्याच्या (१००, २००, ४००, १५०० मीटर व ६ किमी), लॉंग जंप, हर्डल्स, गोळाफेक, रिले रेस, कबड्डी (मुली), बुद्धिबळ, कॅरम आणि कुस्ती अशा विविध खेळांमध्ये नांदगाव पेठ शाळेच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी करून विजेतपद पटकावले. विशेष म्हणजे या सर्व स्पर्धांमध्ये मुलींनी लक्षणीय वर्चस्व गाजवले असून त्यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.शाळेच्या या भव्य यशाबद्दल बोलताना प्राचार्य देवेंद्र ठाकरे म्हणाले की, 'विद्यार्थ्यांचे हे यश मेहनत, शिस्त आणि शिक्षक-पालकांच्या अखंड पाठबळाचे फलित आहे. विभागीय स्तरावरही आमचे विद्यार्थी चमकदार कामगिरी करून राज्यस्तरावर झेप घेतील, असा विश्वास आहे.' या विजयानंतर संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण असून उपप्राचार्य सुनील राऊत, क्रीडा मार्गदर्शक गजानन राणे यांच्यासह शिक्षक अशोक चाफले, ए. एस. बनसोडे, के. जे. शेख,रामकृष्ण उपरीकर, संजय डांगे, व्ही. एम. गुरव, प्रणाली ढोणे, जे. टी. आझडे, कल्पना वर्हेकर, माया बागडे, देवपल ब्राम्हण, यु. एस. घारड, डॉ. जयश्री इंगळे, ज्योती नारखेडे, आसीया शेख, चंदा इंगळे, स्वाती बोडाखे, प्रशांत वाडीकर, हेमंतकुमार यावले, जीवनमाला बोरकर, शितल अटाळकर, नितीन फाळके, नीरज दारोकर, उद्धव पांढरीकर, तेजस्विनी शेंडे, धनंजय देशमुख, प्रतिभा भुले, उमेश केने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# परवानगीशिवाय डीजे वाजवणाऱ्यांवर पोलिसांचा हातोडा

## दोन वाहनांवर तब्बल ५५,५०० दंड

**अमरावती/प्रतिनिधीः-** ध्वनीप्रदूषण आणि वाहतूक नियमांचं उघडं उल्लंघन करणाऱ्यांवर आता पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. शिरजगाव कसबा पोलिसांनी दोन डीजे वाहनांवर धडक कारवाई करत तब्बल ५५,५०० रुपयांचा दंड ठोठावला आहे. परवानगीशिवाय डीजे सिस्टीम बसवून गावात आवाजाच्या दहशतीखाली सण साजरे करणाऱ्यांना पोलिसांनी आता थेट इशारा दिला आहे .



करजगाव येथील मोकळ्या मैदानात एमपी १३/जीबी २९८५ आणि एमएच २७/बीएक्स ७२७६ क्रमांकाची डीजे वाहने उभी असताना पोलिसांना आढळली. वाहनचालकांकडे ना मालकीचे कागदपत्र, ना परवानगी. दोन्ही वाहने पोलिसांनी ताब्यात घेत आरटीओकडे पाठवली. तपासात धक्कादायक बाब समोर आली — दोन्ही वाहनांमध्ये परवानगीशिवाय बसवलेल्या डीजे सिस्टीम्स होत्या. यानंतर आरटीओ अधिकारी गोटे यांनी एक वाहनावर २८,००० तर दुसऱ्यावर २७,५०० असा दंड ठोठावला. पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे. 'गावात, शहरात किंवा कोणत्याही उत्सवात परवानगीशिवाय डीजे सिस्टीम वापरली, तर थेट गुन्हा दाखल केला जाईल आणि वाहन जप्त होईल.' ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, सहाय्यक पोलीस अधीक्षक (अचलपूर) डॉ. शुभम कुमार आणि गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरगाव कसबा पोलिस पथकाने केली.

## विहिरीतून मोटार पंप चोरी

**अमरावती :** कुऱ्हा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वऱ्हा शेत परिसरात एका विहिरीतून अज्ञात चोरट्याने पाण्याची मोटार पंप चोरी केल्याची घटना शुक्रवारी रात्री उशिरा उघडकीस आली. या प्रकरणी शेतकरी जगन्नाथ वाघमारे यांनी पोलिसात तक्रार दाखल केली असून, त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

## वीज बिलाच्या वादातून सुनेवर हल्ला

**अमरावती :** वीज बिल जास्त आल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून सासरच्यांनी सुनेवर हल्ला केल्याची घटना वाठोडा (ता. मंगरूळ दस्तगीर) येथे घडली. या हल्ल्यात सुनेचा डावा हात मोडला असून, पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. तक्रारीनुसार, पीडित सुनेने पाण्याची टाकी भरण्यासाठी मशीन सुरू केले होते. त्यावरून वाद निर्माण झाला. दरम्यान, दामोदर कवटकर यांनी संतापाच्या भरात काठीने तिच्यावर हल्ला केला. या मारहाणीमध्ये तिचा डावा हात मोडला. घटनेची माहिती मिळताच मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## बसमध्ये चोरीचा प्रयत्न

**अमरावती :** शनिवारी बसमध्ये चढत असताना दोन महिलांनी एका प्रवासी महिलेची पर्स चोरण्याचा प्रयत्न केला. मात्र, गर्दीचा फायदा घेऊन चोरी करण्याचा त्यांचा प्रयत्न नागरिकांच्या लक्षात आला. तत्परतेने कारवाई करत उपस्थित नागरिकांनी दोन्ही महिलांना रंगेहाथ पकडून तिवसा पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# राजापेठ हद्दीत घरफोडी : मोबाईल व सोन्याचा झुमका चोरीला

**अमरावती /प्रतिनिधीः-** शहरातील देवदत्त नगर, बाकडे वाडी परिसरात घरफोडीची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून मोबाईल फोन व सोन्याचा झुमका असा सुमारे ९,५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. ही घटना दि. १८ ऑक्टोबरच्या रात्री ११ वाजता ते १९ ऑक्टोबरच्या सकाळी ६.३० वाजेच्या दरम्यान घडली.

फिर्यादी विशाल वसंतराव कुलकर्णी (वय ५१, रा. देवदत्त नगर, बाकडे वाडी) यांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री जेवणानंतर ते व त्यांची पत्नी बेडरूममध्ये झोपले. झोपण्यापूर्वी पत्नीने कानातील सोन्याचे झुमके व त्यांचा विवो वाय-७५ मोबाईल बेडजवळ ठेवला होता. सकाळी उठल्यावर एका कानातील झुमका व मोबाईल गायब असल्याचे लक्षात आले. घरातील शोध घेतल्यानंतर चोरी झाल्याचे उघड झाले. अज्ञात चोरट्याने



घरात प्रवेश करून मोबाईल (किंमत ७,०००) व सोन्याचा झुमका (१.२५ ग्रॅम, किंमत २,५००) असा एकूण ९,५०० रुपयांचा माल चोरला. राजापेठ पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू आहे.

# अल्पभूधारक शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

## -सालोरा बुजरूक येथे हृदयद्रावक घटना; गावात शोककळा

**तिवसा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील सालोरा बुजरूक येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचा आणि कर्जबाजारीपणाच्या मानसिक तणावाचा परिणाम म्हणून एका तरुण अल्पभूधारक शेतकऱ्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. ही घटना शुक्रवारी १७ ऑक्टोबर रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास घडली.




प्राप्त माहितीनुसार, दिवसभर शेतीचे काम आटोपल्यानंतर प्रवीण विश्वास आठवले (वय ३५ वर्ष) या तरुण शेतकऱ्याने रात्री जेवण करून घरातील टिनाच्या शेडमध्ये ओढणीच्या साहाय्याने बल्लीला गळफास लावून आपले जीवन संपवले. त्या वेळी गावात वीज पुरवठा अधूनमधून खंडित होत होता. घरातील सदस्य जेवणानंतर घराबाहेर बसलेले असताना, त्या संधीचा फायदा घेत प्रवीणने आत्महत्या केली. काही वेळानंतर कुटुंबीयांनी त्याला शोधले असता तो गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला.

घटनेची माहिती मिळताच कुऱ्हा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह तिवसा उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला. प्रवीण आठवले हा घरातील जबाबदार व मेहनती तरुण म्हणून ओळखला जात होता. त्याच्याकडे अल्पभूधारक शेती असून, गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे त्याचे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले होते. त्यातच वाढलेला कर्जबाजारीपणा आणि आर्थिक संकटामुळे तो तीव्र तणावात होता. या विवंचनेतूनच त्याने टोकाचा निर्णय घेतल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली.

# १ व १० वरील उर्वरित

## शनिवार वाड्यात नमाज पठणाने वाद

करण्याचा विधीही पार पाडला. यानंतर शनिवारवाड्यात 'शिववंदना' सादर करण्यात आली. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, अशा प्रकारच्या घटना भविष्यात सहन केल्या जाणार नाहीत. मेधा कुलकर्णी यांनी हा व्हिडिओ आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला आहे. त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटलं की, 'यापुढे अशा प्रकारचे प्रकार काहीही झालं तरी आम्ही खपवून घेणार नाही.' त्यांनी प्रशासनाला अशा घटनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## बिहारमध्ये INDIA आघाडीत फूट?

यावर काहीही बोलण्यास तयार नाही. जर आरजेडीचा प्रस्ताव मान्य केला तर अशा मतदारांवर प्रभाव पडेल जे अद्यापही लालूप्रसाद यादव यांच्या जंगल राजला घाबरतात. मात्र महाआघाडीत सर्व काही ठीक असून केवळ घोषणा बाकी आहे जी योग्य वेळी केली जाईल असं काँग्रेस नेते पवन खेडा यांनी म्हटलं.

## ओबीसींना राजकारणापासून वंचित

धर्तीवर सारथी व महाज्योती सुरू केली. घरकुल योजना सुरू केली. नॉनक्रिमीलिअरची मर्यादा ८ लाखांपर्यंत वाढविली. राज्यात ६० पेक्षा अधिक वसतीगृह उभे राहिले आहे. आता ओबीसी समाजातील युवकांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी १५ लाखांचे बिनव्याजी कर्ज देण्यात येईल. तर विना गॅरेंटीचे ३ लाखापर्यंत कर्ज देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी अतूल सावे यांनी ओबीसी विभाग व महाज्योतीच्या कार्याला उजाळा दिला. मिलिंद नारिंगे यांनी प्रास्ताविक केले. संचालन दिनेश मासुदकर यांनी केले. प्रशांत वावगे यांनी आभार मानले.

## मतचोरी करूनच मोदी पंतप्रधान

दिसत आहे तर बँकेकडून एकाच दिवसात कर्जही मंजूर करण्यात आले. मोहोळ हे भ्रष्ट मार्गाने माया जमवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण पुण्यातील हा जमीन व्यवहार रद्द केल्याशिवाय काँग्रेस गप्प बसणार नाही,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## निवडणूक आयोगाविरोधात १

पैठणच्या आमदारांनी जाहीररित्या २० हजार मतदार बाहेरून आणले असं सांगितले. दुबार मतदारांची नावे देऊनही ती यादीतून काढली जात नाहीत असं सत्ताधारी भाजपाच्या आमदार मंदा म्हात्रे सांगतात. बुलढाणा जिल्ह्यात १ लाखाहून अधिक बोगस मतदार नोंदवले गेले असं तिथले आमदार संजय गायकवाड सांगतात. निवडणूक मतदानात घोटाळा करून हे लोक सत्तेत आले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पक्ष या मतदार यादीतील घोटाळ्याविरोधात लढत आहेत. निवडणूक आयोगाने गुन्हेगारी कृत्य केले आहे. अधिकारी ऐकायला तयार नाहीत. निवडणूक आयोगाला दणका द्यावा लागेल आणि तो रस्त्यावर उतरून द्यावा लागेल. निवडणूक आयोगाच्या मनमानी आणि भ्रष्ट कारभाराविरोधात १ नोव्हेंबरला मुंबईत सर्वपक्षीय विराट मोर्चा निघेल. महाराष्ट्राच्या जिल्हाजिल्ह्यातून मतदानाचा अधिकार गमावलेले लाखो लोक मुंबईत येतील. ही ताकद देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृह मंत्री अमित शाह यांना दाखवून देतील. या मोर्चाचे नेतृत्व शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते करतील असं त्यांनी सांगितले.

## सध्या 'मनोमिलन' नाटकाचं जोरदार

नाही पण मी आरोपाला नेहमी कामातून उत्तर दिले असल्याचंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं.

दरम्यान, अंबरनाथचे रस्ते पूर्वी खड्ड्यांनी भरलेले होते, आज सिमेंट काँक्रिटचे झाले आहेत. शूटिंग रेंजपासून अनेक प्रकल्प साकार झाले आहेत. आता हे नाट्यगृह प्रेक्षकांची कलात्मक भूक भागवेल. महाराष्ट्रातील अनेक नाट्यगृह बटाटावड्यांसाठी प्रसिद्ध आहेत. अंबरनाथचाही बटाटावडा तितकाच प्रसिद्ध होऊ द्या असंही एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## १२ तासांत खुनाचा उलगडा : यवतमाळमधून

सपोनि मनीष वाकोडे, सपोनि अनिकेत कासार (सायबर), सपोनि प्रियंका कोटावार (सायबर), तसेच पोलीस अंमलदार सुनिल लासूरकर, दीपक सुंदरकर, जहीर शेख, संग्राम भोजने, विकारा गुडधे, सैयद नाझीम, राजीक रायलीवाले, रंजीत गावंडे, सागर ठाकरे, सुरज चव्हाण, प्रभात पोकळे, निखील माहूरे (सायबर) आणि सुषमा आठवले (सायबर) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## रहाटगाव बनावट नोट प्रकरणात

बनावट चलनी नोटा जप्त केल्या होत्या. या सलग कारवायांमुळे रहाटगाव परिसरातील बनावट नोटांच्या अवैध व्यवहारांवर पोलिसांनी मोठा आळा घातला आहे.

प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, या आरोपींनी बनावट नोटा स्थानिक बाजारात आणि किरकोळ व्यवहारांमध्ये वापरून चलनात आणण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान आता बनावट नोटा बनविणाऱ्यांचे धाबे दणाणले असून मोठे रॅकेट समोर येण्याची शक्यता आहे.

ही कारवाई अमरावती पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, तसेच सपोआ कैलास पुंडकर (फ्रेजरपुरा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात पार पडली. या पथकात पोहेकॉ राजाभाऊ राऊत, पोकॉ राजीक खान, पोकॉ निलेश साविकार, पोकॉ राजा सय्यद, पोकॉ वैभव तिखीले आणि पोकॉ अमित ढोले यांनी विशेष परिश्रम घेतले.या सलग आणि प्रभावी कारवायांमुळे शहरात चलनात असलेल्या बनावट नोटांच्या प्रसारावर आळा बसला असून,याप्रकरणी प्रत्येक हालचालीवर तसेच संशयितांवर देखील पोलीस नजर ठेवून आहेत.

**प्रतिक्रियाः-** या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू असून बनावट नोटा नेमक्या कोठे आणि कशा पद्धतीने तयार केल्या जातात, याचा सखोल तपास सुरू आहे. प्राथमिक चौकशीतून असे संकेत मिळाले आहेत की या मागे एक संगठित टोळी कार्यरत आहे. लवकरच या रॅकेटचा मास्टरमाईंड हाती लागेल.पोलीस या प्रकरणी गंभीरतेने कारवाई करत असून हे संपूर्ण रॅकेट लवकरच जेरबंद असेल.**-दिनेश दहातोंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नांदगाव पेठ**

## गोमांस विक्री करताना युवक

युवकाला गोवंश जनावराचे मांस विक्री करताना रंगेहात पकडण्यात आले, तर त्याच्याकडून तब्बल ६० हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी शनिवारी (दि. १९ ऑक्टोबर) सकाळी कारवाई केली. मोनिश अहमद अनिस अहमद (वय २०, रा. पेठपुरा) हा युवक जनावराची कत्तल करून मांस विक्री करत असल्याची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पिंपळखुटा गावात छापा टाकला.

या कारवाईत पोलिसांनी अंदाजे १० किलो गोवंश मांस (किंमत २ हजार), रोख ४,४३०, कापणीसाठी वापरलेले साहित्य ४,२००, तसेच वाहतुकीसाठी वापरलेली हिरो पॅशन एक्स-प्रो मोटरसायकल (क्र. एमएच २७ एई ९८२३, किंमत ५० हजार) असा एकूण ६०,६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुद्ध गोवंश संरक्षण कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर, तुषार चव्हाण, तसेच पोलीस अंमलदार स्वप्निल बायस्कर, छत्रपती करपते, अथर्व कोहळे आणि मपोका. कन्या गडलिंग यांनी सहभाग घेतला. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अशा प्रकारच्या गोवंश मांस विक्री प्रकरणांवर पुढेही कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### इन्स्टाग्रामने लहान मुलांची सिक्युरिटी वाढवली

**मुंबई-** किशोर यूझर्सना अधिक सुरक्षित ऑनलाइन अनुभव देण्यासाठी इन्स्टाग्रामने एक नवीन सुरक्षा फीचर सादर केले




आहे. मेटाने घोषणा केली आहे की, किशोरवयीन मुलांना आता फक्त पीजी-१३-स्तराचा कंटेंट दिसेल. याचा अर्थ त्यांना प्रौढ (१८ प्लस), ड्रग्ज किंवा धोकादायक स्टंट यासारख्या संवेदनशील विषयांशी संबंधित पोस्ट दिसणार नाहीत. गेल्या वर्षी लाँच झालेल्या 'टीन्स अकाऊंटस' फीचर्सनंतर हा सर्वात मोठा बदल असल्याचे कंपनीचे म्हणणे आहे मेटाने एका ब्लॉग पोस्टमध्ये म्हटले आहे की, १३ ते १७ वयोगटातील यूझर्सना आता प्रौढ कंटेंट, ड्रग्ज, हिंसाचार किंवा धोकादायक स्टंट असलेला कंटेंट दिसणार नाही. कंपनीने त्याचे वर्णन पीजी-१३ चित्रपटांसारखेच अनुभव असे केले आहे. याचा अर्थ किशोरवयीन मुलांना सामान्य '१३ प्लस' चित्रपटासारखाच कंटेंट दाखवला जाईल. मुलांची सुरक्षितता आणि मानसिक आरोग्य लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे.

### रेल्वेमध्ये ११०४ पदांसाठी थेट भरती

**मुंबई-** सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी मोठी संधी चालून




आली आहे. रेल्वेत दहावी आणि आयटीआय पास तरुणांसाठी भरती होत आहे. रेल्वे भरती कक्ष, पूर्वोत्तर रेल्वेने (आरआरसी एनईआर) गोरखपूर, इज्जतनगर, लखनौ, गोंडा आणि वाराणसी येथील वर्कशॉपमधील विविध पदांसाठी अर्ज मागवण्यास सुरुवात केली आहे. ११०४ पदांसाठी अर्ज मागण्यात येत असून १६ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या काळात उमेदवाराला अर्ज करता येईल. गोरखपूर येथे मेकॅनिकल वर्कशॉपसाठी ३९० जागा, सिग्नल वर्कशॉपसाठी ६३ जागा, ब्रिज वर्कशॉपसाठी ३५ जागा आहेत. तर इज्जतनगर येथे मेकॅनिकल वर्कशॉपसाठी १४२, डिझेल शेडसाठी ६०, कॅरेज आणि व्हॅगनसाठी ६४ पदांसाठी भरती होत आहे. लखनौ जंक्शन येथे कॅरेज आणि व्हॅगनसाठी १४९ जागा, गोंडा येथे डिझेल शेडसाठी ८८ जागा आहेत. वाराणसी येथे कॅरेज आणि व्हॅगनसाठी ७३, तर टीआरडीसाठी ४० जागा अशा एकूण ११०४ पदांसाठी भरती होत आहे.

### आता २४ तासांत 'पीएफ' काढता येणार


**मुंबई-** जर एखाद्या कर्मचाऱ्याची नोकरी गेली तर त्या व्यक्तीला



२४ तासात म्हणजेच दुसऱ्याच दिवशी त्याच्या पीएफ खात्यातील ७५ टक्के रक्कम काढता येईल. त्या व्यक्तीला पीएफमधील पैसे काढण्यासाठी दोन महिने वाट पाहावी लागणार नाही. जर ती व्यक्ती १२ महिने बेरोजगार राहिली तर त्या व्यक्तीला पीएफमधील संपूर्ण रक्कम काढता येईल, अशी माहिती कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी दिली आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत काही नवीन नियम जाहीर करण्यात आले होते. नवीन नियमांनुसार नोकरी गेल्यावर पीएफ खात्यांमधून पैसे काढण्याच्या वेळेबाबत गोंधळ उडाला होता. अनेक अहवालांमध्ये असा दावा करण्यात आला होता की आता सलग १२ महिने बेरोजगार राहिल्यानंतर आणि नोकरी गेल्यानंतर पीएफमधील रक्कम काढता येईल. परंतु, कामगार मंत्र्यांनी सोशल मीडिया एक्सवर एक पोस्ट शेअर करून यासंबंधी माहिती दिली आहे. नवीन नियमांनुसार, जर एखादा ग्राहक एका दिवसासाठीही बेरोजगार असेल तर तो त्याच्या पीएफ बॅलन्सपैकी ७५ टक्के रक्कम ताबडतोब काढू शकतो, असे मनसुख मांडविया यांनी म्हटले आहे. ईपीएफओने पूर्वीचे १३ कठीण नियम रद्द केले आहेत. पीएफमधील पैसे काढण्यासाठी आता केवळ तीन नियम ठेवण्यात आले आहेत. आजारपण, शिक्षण आणि लग्न या तिन्ही कारणांसाठी पीएफमधील रक्कम काढू शकतील. पूर्वी शिक्षण आणि लग्नासाठी फक्त तीन वेळा पैसे काढण्याची परवानगी होती, परंतु आता शिक्षणासाठी १० आणि लग्नासाठी पाच वेळा पैसे काढता येतील.

### ज्योती सुरेखा वेण्णमचा ऐतिहासिक पराक्रम!

**नवी दिल्ली-** हिंदुस्थानी तिरंदाज ज्योती सुरेखा वेण्णम हिने



शनिवारी चीनमधील नानजिंग येथे झालेल्या विश्वचषक तिरंदाजी फायनलमध्ये कांस्यपदक जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली. या स्पर्धेत पदक जिंकणारी ती हिंदुस्थानची पहिली महिला कंपाउंड तिरंदाज ठरली, हे विशेष.आशियाई पदकविजेत्या ज्योतीने जागतिक क्रमवारीतील दुसऱ्या स्थानी असलेल्या ब्रिटनच्या एला गिब्सनविरुद्ध १५ पैकी १५ परफेक्ट शॉट्स मारत १५०-१४५ असा विजय मिळवला. त्याआधी, आठ तिरंदाजांच्या स्पर्धेत ज्योतीने उपांत्यपूर्व फेरीत अमेरिकेच्या ॲलेक्सिस रुईजला १४३-१४० ने हरवत दमदार सुरुवात केली. मात्र, उपांत्य फेरीत तिला अव्वल मानांकित मेक्सिकोच्या औंड्रया बेसेराकडून १४३-१४५ असा निसटता पराभव पत्करावा लागला.

### विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नोव्हेंबरमध्ये

**मुंबई-** राज्य शासनाचे हिवाळी अधिवेशन आठ डिसेंबरपासून नागपूर येथे सुरू होणार असल्याची घोषणा करण्यात आली असली तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता डिसेंबरमध्ये लागू होण्याची शक्यता असल्यामुळे हे अधिवेशन नोव्हेंबरच्या अखेरच्या आठवड्यात घेण्याच्या हालचाली सुरू आहेत. याबाबतच्या सूचना मंत्रालयीन अधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.यावर्षी ८ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन होणार असल्याची घोषणा सरकारने केली होती. मात्र, ३१ जानेवारी २०२६ अखेर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने या निवडणुकांसाठी आचारसंहिता डिसेंबरमध्ये लागू होण्याची शक्यता आहे.

# ३३ लाख पूरग्रस्त शेतकऱ्यांना ३ हजार कोटींची मदत

**मुंबई-** यंदा सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्रांत पावसाने थैमान घातले. शेतीपासून लोकांची घरंदारं सगळंच पावसात वाहून गेलं. अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना सरकारने मदतीचा हात पुढे केला आहे.

बाधित शेतकऱ्यांना मदत म्हणून ३३ जिल्ह्यातील, ६५ हजार ५४४ शेतकऱ्यांच्या २७ लाख ५९ हजार ७५४.७७ हेक्टर वरील क्षेत्रावरील बाधित पिकांच्या मदतीसाठी ३ हजार २५८ कोटी ५६ लाख ४७ हजार इतका निधी वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव - पाटील यांनी दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंती अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मदत व पुनर्वसन विभागातर्फे नैसर्गिक आपत्तीत बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम केले आहे. मागील सात दिवसात सुमारे ५ हजार कोटीवर निधी वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यंदाच्या खरीप हंगामातील नुकसानीपोटी आतापर्यंत सुमारे सात हजार ५०० कोटीची मदत वितरणास मान्यता देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री जाधव पाटील यांनी व्यक्त केला आहे. नागपूर विभागातील तीन लाख ७६ हजार ९६८ शेतकऱ्यांच्या ३ लाख ४४ हजार ६२९. २४ हेक्टर बाधित क्षेत्रातील ३४० कोटी ९० लाख ८ हजार निधीचा समावेश आहे.

**नागपूर विभाग-** तीन लाख ७६ हजार ९६८ शेतकऱ्यांच्या तीन लाख ४४ हजार ६२९. ३४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३४० कोटी ९० लाख ८ हजार निधी

**नागपूर :** एक लाख २ हजार ८५० शेतकऱ्यांच्या ८५ हजार ६४१. ८८ हेक्टर क्षेत्रासाठी ११२ कोटी ३७ लाख रुपये

**चंद्रपूर :** ९३ हजार ८९५ शेतकरयांच्या ८१ हजार ७२६. ८० हेक्टर शेत्रास्तही ६९ कोटी ४६ लाख ८६ हजार रुपये

**वर्धा :** १ लाख शेकऱ्यांच्या ४९ हजार ५४६ शेतकऱ्यांच्या १ लाख ६७ हजार ४७६.९६ हेक्टर क्षेत्रासाठी १४२ कोटी ४० लाख ११ हजार रुपये.

**भंडारा-** १८ हजार ९५३ शेतकऱ्यांच्या ६ हजार ४२५.४१ हेक्टर क्षेत्रासाठी १० कोटी ४८ लाख ३६ हजार रुपये

**गोंदिया-** सहा हजार ३९८ शेतकऱ्यांच्या दोन हजार ३०९.४६ हेक्टर क्षेत्रासाठी तीन कोटी ५० लाख २१ हजार रुपये. व



**गडचिरोली-** पाच हजार ३२६ शेतकऱ्यांच्या एक हजार ४८.८३ हेक्टर क्षेत्रासाठी दोन कोटी ६७ लाख ५४ हजार रुपये.

**अमरावती :** विभागातील चार लाख ७८ हजार ९०९ शेतकऱ्यांच्या ४५ हजार ८८२.७४ हेक्टर क्षेत्रासाठी ३८ कोटी ४ लाख ५१ हजार रुपये.

**यवतमाळ :** २ लाख २१ हजार ३८४ शेतकऱ्यांच्या ३ लाख ७ हजार ६२३. ४३ हेक्टर क्षेत्रासाठी २६२ कोटी ८ लाख हजार रुपये

**पुणे :** विभागातील ८ लाख २५ हजार १८९ शेतकऱ्यांच्या सात लाख ९ हजार क्षेत्रासाठी २६२ कोटी ८ लाख ४५ हजार रुपये

**सातारा -** ३ हजार ३८८ शेतकऱ्यांच्या १ हजार ५६२. ६७ हेक्टर क्षेत्रासाठी २ कोटी ४९ लाख ५ हजार रुपये

**सोलापूर :** ६ लाख ७८ हजार ५९२ शेतकऱ्यांच्या पाच लाख ३८ हजार ८८९. हेक्टर क्षेत्रासाठी ७७२ कोटी ३६ लाख ४५ हजार रुपये

**पुणे-** ५२ हजार ७८९ शेतकऱ्यांच्या २१ हजार ९५१.९४ हेक्टर क्षेत्रासाठी ३४ कोटी ४२ लाख ८७ हजार रुपये.

**सांगली -** ९० हजार ४२० शेतकऱ्यांच्या एक लाख ४६ हजार ८०५ हेक्टर क्षेत्रासाठी १४२ कोटी ३५ लाख रुपये

**नाशिक विभाग-** १५ लाख ७९ हजार २३९ शेतकऱ्यांच्या ११ लाख ५० हजार ३०१. ७६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १४७४ कोटी ८४ लाख ९ हजार

**नाशिक -** चार लाख नऊ हजार ७४७ शेतकऱ्यांच्या दोन लाख ८८ हजार ८०६ हेक्टर क्षेत्रासाठी ३१७ कोटी १५ लाख ७७ हजार रुपये

**धुळे :** १६ हजार ३५७ शेतकऱ्यांच्या ११ हजार ५९४. ९ हेक्टर क्षेत्रातील १० कोटी २२ लाख ९७ हजार कोटी

**नंदुरबार :** ९३१ शेतकऱ्यांच्या ४४५. ०६ हेक्टर क्षेत्रासाठी ५३ लाख ९९ हजार

**जळगाव :** ३ लाख २५ हजार ३५९ शेतकऱ्यांच्या २ लाख ४७ हजार २६२.०१ हेक्टर क्षेत्रासाठी २९९ कोटी ९४ लाख ४७ हजार रुपये

**अहिल्यानगर :** ८ लाख २७ हजार ११८ शेतकऱ्यांच्या सहा लाख २ हजार १९४. हेक्टर क्षेत्रासाठी ८४६ कोटी ९६ लाख ८९ हजार रुपये

**कोकण विभाग-** १ लाख ५ हजार २३९ हजार शेतकऱ्यांच्या २९ हजार २३३.१६ हेक्टर बाधित क्षेत्रातील २८ कोटी १० लाख ६३ हजार निधी

**ठाणे :** ३५ हजार ६७६ शेतकऱ्यांच्या नऊ हजार ४८० . ११ हेक्टर क्षेत्रासाठी ८ कोटी ३७ लाख ६५ हजार रुपये

**पालघर :** ४९ हजार ५१७ शेतकऱ्यांच्या १३ हजार ७४४. २३ हेक्टर क्षेत्रासाठी १४ कोटी ४२ लाख ६५ हजार

**रायगड :** १८ हजार ५७८ शेतकऱ्यांच्या ५ हजार ८२९. ४६ हेक्टर क्षेत्रासाठी ५ कोटी नऊ लाख ९ हजार

**रत्नागिरी :** १ हजार १५३ शेतकऱ्यांच्या १०३.८८ हेक्टर क्षेत्रासाठी १३ लाख ५३ हजार रुपये

# महाराष्ट्रात ९६ लाख खोटे मतदार भरण्यात आले

**मुंबई-** गोरेगाव या ठिकाणी असलेल्या नेस्को मैदानात मनसेचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात राज ठाकरेंनी निवडणूक आयोगावर टीका केली. तसंच महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने ९६ लाख खोटे मतदार याद्यांमध्ये भरण्यात आले आहेत असा गंभीर आरोपही त्यांनी केला. माझ्याकडे याबाबतची खात्रीलायक माहिती असल्याचा दावा राज ठाकरेंनी केला.



राज ठाकरेंचा गंभीर आरोप

दिवाळीच्या मध्यात आपण आज हा मेळावा आयोजित केला आहे. हा तातडीचा मेळावा आहे. यावेळची निवडणूक आपण ठरवू तेव्हा लागेल. मतदार याद्यांचा गोंधळ आत्ताचा नाही. हा गेल्या काही वर्षांचा आहे. २०१६-२०१७ ला मी व्होटिंग मशीन आणि मतदार याद्यांच्या विरोधात आवाज उठवला होता. एमआयजी क्लबमध्ये ती पत्रकार परिषद झाली होती. त्यावेळी अनेकांना मी जे बोललो त्याचं गांभीर्य कळलं नव्हतं. प्रत्येकाच्या दरवाजावर टकटक झाली तेव्हा कळलं की काय प्रकार चालले आहेत. आत्ताही विधानसभेची निवडणूक झाली २३२ आमदार निवडून आले आहेत. एवढं प्रचंड यश मिळूनही महाराष्ट्रात सन्नाटा होता. मतदार तर आवाक झालेच होते पण निवडून आलेलेही आवाक झाले होते. कारण त्यांनाही कळलं नाही कसा निवडून आलो. मग सगळ्यांनाच समजलं की निवडणुका कशा प्रकारे चालल्या आहेत. कसे विजय मिळतात, कसं यश मिळतं ते कळलं. राज ठाकरेंच्या सभांना गर्दी होते पण मतांमध्ये रुपांतर होत नाहीत असं अनेक जण म्हणतात. असं केलं तर कशी काय मिळेल मतं? मला तर कळलं आहे की आत्ताच्या निवडणुकांसाठी १ जुलैला निवडणुकांसाठी यादी बंद केली आहे. जवळपास ९६ लाख खोटे मतदार महाराष्ट्राच्या यादीत भरले आहेत. मुंबईत ८ ते साडेआठ लाख मतदार, ठाण्यात, पुण्यात अशा प्रत्येक ठिकाणी भरले आहेत. अशा निवडणुका होणार आहेत तर मग प्रचार कशाला करायचा? असा सवाल राज ठाकरेंनी केला आहे. तुम्ही मतं द्या किंवा नका देऊ मॅच फिक्स झाली आहे. अशा प्रकारे निवडणुका होणार का? ही कोणती लोकशाही आहे?

सत्ताधारी पक्षाचा आमदार सांगतो २० हजार मतं बाहेरुन आणली. पैठणचे आमदार आहेत की २० हजार मतं बाहेरुन आणली. मग एकनाथ शिंदे यांनी डोळा मारला की दाढीवरुन हात फिरवला. त्यानंतर मग भुमरे म्हणाले की मतदार स्थलांतरित झाले होते त्यांना बाहेरुन आणलं. असं मग भुमरे म्हणाले. हा व्हिडीओही राज ठाकरेंनी लावला.

## राज्यभरात तीन हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी

**मुंबई-** अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत राज्यात 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १२ ऑक्टोबरपर्यंत राज्यात तीन हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली.

तपासणीमध्ये दूध, खवा, मावा, खाद्यतेल, तूप, मिठाई, ड्रायफ्रूटस्, चॉकलेटस्, भगर व अन्य अन्नपदार्थांचे एकूण ४ हजार ६७६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. या तपासणीत अनियमितता आढळलेल्या एक हजार ४३१ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली असून ४८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. एका आस्थापनाचा परवाना रद्द करण्यात आला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाने दिली आहे. जनतेस सुरक्षित, दर्जेदार अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, राज्यमंत्री योगेश कदम, सचिव धीरज कुमार व आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न आणि औषध प्रशासन विभागामार्फत राज्यात सणासुदीच्या कालावधीत अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान २५ ऑक्टोबरपर्यंत राबविण्यात येत आहे.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या 'एक्स'वरील पोस्टला केवळ पाच-दहा लाइक्स

**मुंबई-** महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणात सोशल मीडिया सध्या प्रभावी माध्यम मानले जाते. त्यात प्रामुख्याने 'एक्स' आणि फेसबुकसारखी माध्यमे ही सध्या अनेक राजकीय पक्षांसह प्रमुख नेते मंडळींसाठी तरुणाईपर्यंत विचार पोहोचविण्यासाठी महत्त्वाची ठरली आहेत. प्रत्येक पक्षाच्या नेत्यांसोबतच अगदी गल्लीतीलही कार्यकर्त्यांचे लाखोंमध्ये फॉलोअर्स असताना व त्यांच्या प्रत्येक पोस्टवर शेकडो लाइक व कमेंट येत असताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना मात्र समाजमाध्यमांवर अत्यल्प प्रतिसाद मिळाला.

काँग्रेसने नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या पराभवानंतर पक्षाला ऊर्जितावस्था आणण्यासाठी प्रामाणिकपणा या सद्गुणामुळे या पदासाठी अनेक दिग्गज नेते इच्छुक असताना प्रदेशाध्यक्षपदाची धुरा हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सोपविली होती. दिल्लीश्वरांचा आशीर्वाद घेऊन आलेले प्रामाणिक, गांधीवादी नेते जनतेत जाऊन पक्षाची मजबूत बांधणी करतील शिवाय तरुणाईलाही आकर्षित करतील, असा पक्षश्रेष्ठींचा त्यांच्या नियुक्तीमागे होरा असावा. मात्र, काँग्रेसच्याच एका जुन्या कार्यकर्त्याच्या म्हणण्यानुसार त्यांचा प्रामाणिकपणा हा सात्विक भोजनाप्रमाणे पोटाला बाधणार नाही. मात्र, अंगालाही लागणार नाही असा आहे.

## शरद पवार गटाचे मैनुद्दीन बागवान यांचा वेगळा मार्ग

**सांगली -** महापालिका निवडणुकीत जागावाटपामध्ये सन्मानजनक जागा मिळाव्यात, यासाठी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश आवटी यांनी स्वतंत्र राजकीय पक्षाची नोंदणी केली असतानाच राष्ट्रवादी (शरद पवार) काँग्रेसचे माजी महापौर मैनुद्दीन बागवान यांनीही स्वतंत्र आघाडीची नोंदणी केली आहे. यामुळे भाजप व महाविकास आघाडीत उमेदवारीसाठी दबावाचे राजकारण सुरू असल्याचे दिसून येत आहे.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील, जनसुराज्य शक्तीचे समित कदम यांनी पक्षप्रवेशाचा धडाका लावला असून, यामागे महापालिका निवडणुकीची रणनीतीच दिसून येते. महाविकास आघाडीतील आमदार विश्वजित कदम, जयंत पाटील, खासदार विशाल पाटील यांनीही मोर्चेबांधणी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर स्नेहभोजनाच्या निमित्ताने पक्ष बांधणीऐवजी गटबांधणीच पुढे येत आहे.

आवटी यांनी जनसंघर्ष विकास आघाडी या नावाने राजकीय पक्ष नोंदणीसाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे. भाजपमधून उमेदवारीचा आग्रह धरत असताना १२ जागांचा आग्रह धरला आहे. अन्यथा आघाडीतून उमेदवारी दाखल करण्याचा मनसुबा यामागे आहे. यामुळे भाजपची डोकेदुखी वाढली आहे. तसेच महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार इद्रिस नायकवडी यांची महापालिका निवडणुकीत महत्त्वाची भूमिका ठरणार आहे. त्यांचे भाजपशी फारसे सख्य दिसत नाही. अथवा स्थानिक पातळीवरील नेत्यांशी एकदाही निवडणुकीबाबत अद्याप चर्चा झालेली नाही.

दुसऱ्या बाजूला आमदार जयंत पाटील यांचे कट्टर समर्थक असलेल्या माजी महापौर बागवान यांनीही सहा जागांचा आग्रह धरला असल्याचे समजते. समर्थकांना उमेदवारी मिळाली नाही, तर पर्याय म्हणून त्यांनीही मिरज स्वाभिमानी विकास आघाडीची नोंदणी केली आहे. या आघाडीच्या माध्यमातून अन्य पक्षांतील समविचारी, उमेदवारी नाकारलेल्यांना सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाण्याची त्यांची तयारी आहे.

आवटी आणि बागवान यांच्या या राजकीय खेळीमुळे जसे भाजपचे नेते अडचणीत आले आहेत, तसेच आमदार जयंत पाटील यांचा गटही अडचणीत आला आहे. महापालिका निवडणुकीला अद्याप अवधी असला, तरी राजकीय डावपेच आतापासूनच आखले जात आहेत. दबावाचे राजकारण करून जास्तीत जास्त समर्थक कसे मैदानात उतरतील, याचे नियोजन सुरू आहे.

## मतदार यादीतील घोळावरून राज्य निवडणूक आयोगाची सारवासारव

### घर क्रमांक नसल्याचे खापर पालिकेवर

**मुंबई-** मतदार याद्यांमधील घोळ आणि लपवाछपवीचा घोळ विरोधकांच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाने जगजाहीर केल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने आता सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. मतदार यादीमध्ये एकाच व्यक्तीचे नाव अनेकदा असल्यास किंवा मतदार याद्यांमधील तपशिलात सुधारणा करण्याबाबत मतदारसंघाच्या नोंदणी अधिका-याकडे अर्ज केल्यास त्यावर निवडणूक अधिकारी निर्णय घेतील, असे स्पष्ट करीत बुथ लेव्हल अधिकारी नेमण्याचा सल्ला राजकीय पक्षांना दिला आहे.

विरोधकांच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाने राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांची भेट घेतल्यानंतर आता मतदार याद्यांच्या संदर्भात मुख्य निवडणूक अधिका-यांनी स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे. जिल्हाधिका-यांकडून आलेल्या अहवालाच्या आधारावर मुख्य निवडणूक अधिका-यांनी प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे.राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ पर्यंत अद्ययावत असलेली मतदार यादी उपलब्ध करून दिली आहे. ही यादी दावे आणि हरकतींसाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे असे म्हटले आहे.

मतदारांच्या चुकीमुळे घर क्रमांक नाही-अमरावती येथील मतदान केंद्र क्रमांक २११ येथील यशोदा नगर आणि उत्तम नगरातील झोपडपट्टी भाग व पाल टाकून वास्तवास असलेले मतदार राहतात.

या झोपडपट्टींना महापालिकांकडून घर क्रमांक देण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांच्या नावासमोर घर क्रमांक नमूद नाही. त्याव्यतिरिक्त अन्य काही ठिकाणीही घर क्रमांक नसणे किंवा मतदारांनी अर्ज करताना चुकीचा घर क्रमांक टाकल्यामुळे अशा बाबी समोर येत असल्याचा दावा आयोगाने केला आहे.

नावे वगळली-दोन मतदारांची नावे एकापेक्षा अधिक वेळा मतदार यादीमध्ये समाविष्ट केल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. त्यावर ही नावे पूर्वीच वगळण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळ १५८ ठिकाणी फटाक्यांच्या आवाजाची तीव्रता मोजणार

**मुंबई :** दिवाळीच्या काळात फटाक्यांच्या आवाजामुळे मोठ्या प्रमाणात वायू आणि ध्वनी प्रदूषण होते. त्यामुळे पर्यावरण विषयक जनजागृतीचा उपक्रम म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील दिवाळीमध्ये बाजारात उपलब्ध असलेल्या फटाक्यांच्या आवाजाच्या तीव्रतेचे मापन केले. तसेच दिवाळी दरम्यान ध्वनीची पातळी राज्यातील एकूण १५८ ठिकाणी मोजण्याचे नियोजन केले आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने फटाक्यांच्या आवाजाची कमाल तीव्रता १२५ डेसिबल निश्चित केली आहे. दिवाळीआधी प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या चाचणीत काही फटाक्यांचा आवाज कमाल मर्यादेपेक्षा कमी तर निवडक फटाक्यांचा आवाज कमाल मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळले. फटाक्यांच्या ध्वनीची मर्यादा कोणत्या भागात किती असावी नागरी वस्ती भागात दिवसा ५५ तर रात्री ४५ डेसिबल पर्यंतचा आवाज हा प्रदूषण म्हणून ग्राह्य धरला जातो.

तर शांतता क्षेत्र असलेल्या भागात हा आवाज दिवसा ५० आणि रात्री ४० पर्यंत प्रदूषण म्हणून धरला जातो. व्यावसायिक क्षेत्रात दिवसा ६५ तर रात्री ५५ आणि औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५ तर रात्री ७० डेसिबल ध्वनिमर्यादा आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २० ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


### लोकनेते स्व. नानासाहेब सपकाळ यांना अभिवादन; एईपीस सेवेचा शुभारंभ

# ‘ग्रामिणांच्या उन्नतीचे स्वप्न साकार करणे, हेच खरे अभिवादन’ – खा. अनूप धोत्रे

■ प्रतिनिधी | अकोला ■

***‘लोकनेते स्व. नानासाहेब सपकाळ यांनी ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य माणसांच्या उन्नतीसाठी आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांना वास्तवात आणण्याची जबाबदारी आज आपल्यावर आहे. सहकार क्षेत्रात त्यांनी दाखविलेल्या वाटेवर चालून आपण त्यांचे स्वप्न साकार करू शकलो, तर हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल,’ असे प्रतिपादन खासदार अनूप धोत्रे यांनी केले.***

अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने रविवारी लोकनेते स्व. नानासाहेब सपकाळ यांच्या जन्मशताब्दीनिमित्त अभिवादन सभा आणि आधार एनेबल्ड पेमेंट सिस्टीम (ईंइए) सेवेचा शुभारंभ सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार अनूप धोत्रे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री सुभाषराव ठाकरे, आमदार रणधिर सावरकर, तसेच डॉ. नानासाहेब चौधरी, डॉ. रणजीत सपकाळ, संचालक रमेश हिंगणकर, वामनराव देशमुख, रामसिंग जाधव, राजूभाऊ राऊत, जगदीश पाचपोर, अंबादास तेलगोटे, डॉ. जयराज कोरपे, आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

खासदार धोत्रे पुढे म्हणाले, ‘स्व. नानासाहेब सपकाळ हे फक्त नाव नव्हे, तर एक विचार आहेत. त्यांच्या प्रेरणेने सहकार क्षेत्राने उंच भरारी घेतली. ग्रामीण भागात फळपिकांवर प्रक्रिया उद्योग उभारून



युवकांना रोजगाराच्या प्रवाहात आणणे, हा बँकेचा पुढील उद्देश आहे. नदी-जोड प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, हा प्रकल्प राज्याच्या विकासात मैलाचा दगड ठरेल.’

डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी आपल्या प्रास्ताविकात स्व. सपकाळ यांच्या कार्याचा मागोवा घेतला. ते म्हणाले, ‘स्व. सपकाळ यांनी सहकाराची बीजे विदर्भात रुजवली. त्यांनी माणसांना जोडण्याची आणि त्यांच्यात विकासाची जाणीव निर्माण करण्याची शक्ती मिळवली होती. त्यांच्या विचारांवर आधारित कामगिरीमुळेच आज बँकेने यशाची शिखरे गाठली आहेत.’

स्व. नानासाहेब सपकाळ यांचे समकालीन डॉ. नानासाहेब चौधरी (वय ९५) यांनीही त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. ‘सपकाळ यांची बौद्धिकता देशातच नव्हे तर परदेशातही मानली गेली. समाजकारणातून राजकारणात प्रवेश करून त्यांनी समाजाला दिशा दिली,’ असे त्यांनी सांगितले.

माजी मंत्री सुभाष ठाकरे यांनी सपकाळ यांना ‘मोठे समाजधुरीण आणि आमच्यासाठी आदर्श व्यक्तिमत्व’ असे संबोधले. डॉ. रणजीत सपकाळ यांनी कापूस आंदोलनातील त्यांचा सहभाग आणि सहकारी सूतगिरणी स्थापनेच्या आठवणींना उजाळा दिला.

‘बंद पडलेली सूतगिरणी लवकरच पुन्हा सुरु होणार आहे. यामुळे विदर्भातील कापूस उत्पादकांना पुन्हा वैभव प्राप्त होईल,’ असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन बी. जे. काळे व अपर्णा उके यांनी केले. आभार प्रदर्शन अनंत वैद्य यांनी केले.

**डॉ. सपकाळ यांच्या पाठपुराव्याला यश – आमदार रणधिर सावरकर :** आमदार रणधिर सावरकर म्हणाले, ‘स्व. नानासाहेब सपकाळ यांनी उभारलेली सहकारी सूतगिरणी नव्याने सुरू होणार असून, डॉ. रणजीत सपकाळ यांच्या पाठपुराव्याचे हे फलित आहे. या प्रकल्पासाठी शासनाने ११८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. तसेच सोयाबीन खरेदीत एकसूत्रता आणली असून, शेतकऱ्यांना हमीभावाची हमी दिली आहे. कापूस खरेदीसाठी सीसीआय केंद्रांची संख्या वाढविण्यात आली आहे आणि सर्व खरेदी हमीभावानेच केली जाणार आहे.’

## महान तपस्वी संत श्री काशिनाथ बाबा जन्मोत्सव सोहळा हर्षोल्लासात



■ प्रतिनिधी | मानोरा ■

महान तपस्वी संत श्री काशीनाथ बाबा संस्थान येथे धनत्रयोदशीला बाबाजींचा ११३ वा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून या कार्यक्रमात प्रारंभी दुपारी ३ वाजेपासून ७ वाजेपर्यंत बंजारा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये अनेक कवीजन सहभागी होत बाबाजींचे चरित्र भजनातून भक्तांसमोर ठेवले. तद्नंतर सात वाजेपासून संगीतमय भजनसंध्येच्या कार्यक्रम आयोजित केला होता. या संगीतमय भजनसंध्येच्या कार्यक्रमात उपस्थित भाविकांनी भजनाच्या तालावर नाचून कार्यक्रमाची शोभा वाढविली. त्यानंतर हभप दीपकजी शास्त्री यांचे प्रवचन आणि तदनंतर नामजपासह जयजयकारात बाबाजींच्या जन्मवेळेला पाळणा आणि महाआरती म्हणत जन्मोत्सव साजरा करण्यात आला. रात्री ११.३० मिनिटांनी उपस्थित सर्व भविकभक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

## नरेंद्र गोलेच्छा यांचा ७ २ वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

भाजपाचे ज्येष्ठ नेते व जनसंघाच्या काळापासून राजकारणात सक्रिय भूमिका बजावत कारंजा-मानोरा मतदारसंघात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे नरेंद्र गोलेच्छा यांचा ७२ वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता स्थानिक गुरुमंदिरात गोलेच्छा यांना दीर्घायुष्य लाभावे यासाठी अभिषेक करून करण्यात आली. यानंतर दिवाळीनिमित्त वृद्धाश्रमात फराळ व मिठाई वाटप करून वृद्धांना आनंदाचा क्षण देण्यात आला.



नंतर नरेंद्र नगरमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवण्यात आला. यानंतर त्यांच्या निवासस्थानी अभिष्टचिंतन सोहळा पार पडला, जिथे कार्यकर्ते व मित्रमंडळींनी शुभेच्छांचा वर्षाव केला. या निमित्ताने शहरातील व परिसरातील विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून गोलेच्छा यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नरेंद्र गोलेच्छा मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी गोलेच्छा यांच्या सामाजिक कार्याची प्रशंसा करत त्यांच्या दीर्घायुष्याची आणि उत्तम आरोग्याची सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

## रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात रामदेव भजनसंध्या

■ प्रतिनिधी | अकोला ■

लाखो भक्तांचे तारणहार रामसापीर रामदेवबाबा यांच्या भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.कार्तिक सुदी दुजच्या पावन पर्वावर श्रीरामदेवबाबा श्रीश्यामबाबा सेवा समितीच्या वतीने स्थानीय गीता नगर परिसरातील श्रीरामदेवबाबा -श्रीश्यामबाबा मंदिरात गुरुवार दि २३ ऑक्टोबर रोजी साय ७ वाजता रामदेवबाबा यांच्या भव्य भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.या भजन संध्येत भजन गायिका सौ नयना खोडे या आपल्या संगीतमय वाणीतुन रामसापीर बाबा रामदेव यांची भजने सादर करणार आहे.या भजन उत्सवात भक्तां साठी बाबाची दिव्य ज्योत साकार करण्यात येऊन यात सामूहिक आरती,दिव्य रोषणाई, मंदिर सजावट करण्यात येणार आहे.

## आजपासून गंधकुटी येथे पाच दिवसीय श्रामनेर शिबिर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील राजगाव नजीक असलेल्या गंधकुटी येथील अशोक बुद्ध विहार येथे २० ते २५ ऑक्टोबर दरम्यान पाच दिवसीय श्रामनेर शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराचा उपासकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले .

गंधकुटी येथील अशोक बुद्ध विहार येथे भंते प्रज्ञापाल महाथेरो व भंते नागमार्ग यांच्या मार्गदर्शनाखाली पाच दिवसीय श्रामनेर शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या उपासकांना बुद्ध, धम्म व संघ, त्रिशरण ,पंचशील व बुद्धाचे तत्त्वज्ञान याविषयी सविस्तर माहिती



व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पाच दिवस निवासी शिबिरामध्ये विविध मान्यवरांचे मार्गदर्शन देखील लाभणार आहे. सदर शिबिरासाठी अनेक उपासकांनी धम्मदान देऊन शिबिरासाठी सहकार्य केले आहे. या शिबिराचा दहा वर्षावरील उपासकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रामनेर शिबिराचे आयोजक भंते नागमार्ग यांनी केले आहे.

# कोयाळी जाधव गावात अज्ञान व्यक्तीकडून शेतक-याच्या सुडिला आग

### संकटात शेतकरी शासनाकडून तातडीची मदत मागणी



■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील कोयाळी गावात दि.१८ ऑक्टोंबर रोजी रात्री सुमारे अकरा वाजताच्या दरम्याने अज्ञान व्यक्तीने शेतकऱ्याच्या सोडीला आग लावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून परिसरात संताप जनक उसळी आहे

घटनेत शेतकरी ज्ञानबा चिनकाजी जाधव (रा. कोयाळी जाधव गट नंबर २२/२९ मधील सुमारे उभ्या असलेल्या सोयाबीन पिकाच्या सोडीला अज्ञान व्यक्तीने आग लावली ही घटना रात्रीच्या सुमारास घडल्याचे गावकऱ्यांची तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन आग विजवण्याचा प्रयत्न केला मात्र आग प्रचंड असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

शेतकरी ज्ञानबा चिनकाजी जाधव शेतीच्या स्थितीवर असल्यामुळे या घटनेचा त्यांच्यावर आर्थिक संकट अनेक वर्षाची मेहतिने उभे केलेले पीक सुडी काही क्षणात जळून खाक झाल्याने त्यांच्या संसारावर संकट आले आहे गावकऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे या घटनेचा तातडीने तपास करून दोषीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी तसेच सदर शेतकऱ्याला शासनाकडून आर्थिक मदत मिळावी.

या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सतत अशा प्रकरणाच्या घटनांमुळे शेतकरी वर्ग पूर्णपणे हातबल होत आहे शासनाने अशा घटनांवर कठोर पावले उचलून शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थाराकडून करण्यात येत आहे.

# महाआरोग्य शिबिराचे आयोजन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मेडशी गावात नव्याने उभारलेल्या ग्राम संसद भवनाच्या उद्घाटनाचे औचित्य साधून महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाची सुरुवात मालेगाव-रिसोड चे आमदार अमित झनक यांच्या हस्ते ग्राम संसद भवन आणि विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या ’ज्ञानदीप अभ्यासिके’ चे उद्घाटन करून झाली.

त्यानंतर महाआरोग्य शिबिराला प्रारंभ झाला. या शिबिरात वाशीम जिल्ह्यातील नामवंत डॉक्टरांनी निःस्वार्थ रुग्णसेवा दिली. यात डॉ. स्वप्नील सांबापुरे, डॉ. ज्ञानेश्वर डाळ, डॉ. हाके, डॉ. खडसे, डॉ. राजगुरू, डॉ. नेहा सपकाळ, डॉ. बेदरकार आणि



डॉ. संतोष बोरसे , जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतिश परभणकर याच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य निरिक्षक रामदास गवई , क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी वैभव रोडे , लिंक वर्कर गोरे , वाहन चालक गणेश राऊत , परिचर मनिष जाधव प्रशांत देशमुख , संजय भागवत नेते यांचा समावेश होता. तसेच मेडशी प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारीवर्ग सक्रियपणे सहभागी झाले. शिबिरात एकूण १०८० रुग्णांनी विविध आजारांवर उपचार घेत लाभ घेतला. कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार अमित झनक तर अध्यक्षस्थानी शे. गनीभाई शे. चांदभाई होते. या प्रसंगी लक्ष्मी प्रदीप तायडे, आत्मराम धांदरे, राजेश इंगोले, गणेश उंडल, गजानन शिंदे, राजू गीद, कौशल्या साठे, प्रिया पाठक, प्रदीप तायडे, पिंटू बहादूरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित मालेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजेश इंगोले आणि राजू पाटील गीद यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला. या यशस्वी आयोजनासाठी सरपंच शे. जमीर व सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी विशेष प्रयत्न केले. ग्रामविकास अधिकारी घुगे, तसेच सदस्य मूलचंद चव्हाण, जगदीश राठोड, ज्ञानेश्वर मुंढे, धीरज मंत्री, अमोल तायडे, नितीन तायडे, प्रशांत मेडशीकर, गजानन झाटे, उमेश तायडे, रमजान भाई यांनी शिबिराच्या नियोजनात मोलाचे योगदान दिले. कर्मचारीवर्गाच्या अथक प्रयत्नांमुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. गावातील बहुसंख्य नागरिकांच्या उपस्थितीने ग्रामविकास आणि आरोग्यसेवेचा सुंदर संगम या शिबिरातून दिसून आला.

## दिवाळीच्या साहित्याने बाजारपेठ सजली

■ प्रतिनिधी | मानोरा ■

आनंद, उत्साह व प्रकाशाचा उत्सव म्हणुन दिवाळी हा सण हिंदू धर्मात वर्षभरातील सर्वात महत्वपूर्ण मानल्या जातो. दिवाळीच्या खरेदीसाठी ग्राहकांकडून बाजारात हळूहळू गर्दी करण्यास सुरूवात होत आहे. किराणा सामान, फटाक्यांची दुकाने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कपड्यांची दुकाने, मिठाईची दुकाने आदी दुकाने दिवाळीच्या साहित्यांनी सजली आहे.

दिवाळी सणासाठी बाजारपेठ बहरली असुन प्रकाशाचा झगमगाट करणारे आकाश कंदील, दिवे, पणत्या विक्रिसाठी दाखल झाल्या आहेत. विविध डिझाइन, रंगसंगती आकारांतील आकाश कंदील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. घर सुशोभित करण्यासाठी विविध



आकर्शक स्टीकर बाजारात आले आहेत. यामध्ये शुभ लाभ, स्वस्तिक,पावले, श्री, आदी साहित्यांचा समावेश आहे. प्लॅस्टिक फुलांचे तोरण, आकर्षक मेणाचे विविध प्रकारचे दिवे, लायटिंग माळ, पणत्या यांची दुकाने सजली आहेत. विविध प्रकारचे फटाके, आतिषबाजी यांची दुकाने आहेत. दिवाळीसाठी लागणाऱ्या विविध मिठाईच्या पदार्थांनी देखील दुकाने सजली आहेत. पूजेसाठी लागणारे झाडू, शिराई, बत्तासे, करदोडे लक्ष्मी मातेची मूर्ती यांची देखील दुकाने लावण्यात आलेली आहेत. दिवाळीमध्ये नवीन कपडे खरेदीसाठी ग्राहक मोठी गर्दी करत असतात. यासाठी अनेक कापड दुकानांमध्ये ग्राहकांना आकर्षितकपड्यांच्या करण्यासाठी विविध प्रकारांबरोबर विविध प्रकारच्या सूट देऊन आकर्षित करण्यात येत आहे.

# प्रदूषणमुक्त दिवाळी, आरोग्यदायी भविष्य!

### आकाश कंदील स्पर्धेव्दारे एनसीसी विद्यार्थ्यांनी दिला प्लास्टिकमुक्त पर्यावरण रक्षणाचा संदेश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स केवळ कठोर शिस्त आणि राष्ट्रभक्तीचेच नव्हे, तर सामाजिक जबाबदारीचेही भान ठेवतात. याच जाणिवेतून श्री बाकलीवाल विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालय, येथील एनसीसी युनिटने या दिवाळीत ’प्रदूषण मुक्त आकाश कंदील’ स्पर्धेच्या माध्यमातून एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला. या स्पर्धेव्दारे विद्यार्थ्यांनी ’प्लास्टिकमुक्त व प्रदूषणमुक्त दीपावली’ साजरी करण्याचा संदेश नागरिकांना दिला.

पर्यावरण रक्षणाचा संकल्प: दिवाळीत प्लास्टिकचा अतोनात वापर, फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनीप्रदूषण आणि आरोग्याला होणारा धोका याबद्दल लोकांमध्ये जनजागृती



व्हावी, या उदात्त उद्देशातून एनसीसी विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. एनसीसी अधिकारी अमोल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅडेट्सनी प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळून, केवळ रंगीत कागद आणि नैसर्गिक साहित्याचा वापर करून आकर्षक हस्तकलेचे आकाश कंदील तयार केले.

आरोग्यदायी भविष्याचा संदेश: विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या आकाश कंदिलांवर ’प्रदूषणमुक्त प्लास्टिकमुक्त दीपावली, हर जगह खुशहाली’, ’फटाकेमुक्त दीपावली, आरोग्यसंपन्न दीपावली’ असे विविध सामाजिक संदेश लिहून त्यांनी प्रदूषणमुक्त आणि प्लास्टिकमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. या उपक्रमाने कला आणि कल्पकतेला प्रोत्साहन देण्यासोबतच, पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश समाजात रुजवला.

या स्पर्धेमध्ये एकूण ६ २ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यापैकी प्रथम क्रमांक प्रदीप इंगोले, द्वितीय क्रमांक रजत कुटे, आणि तृतीय क्रमांक प्रेमनाथ ढेंगळे यांनी पटकावला. तसेच, अनुजा काकडे आणि वेदिका धामणकर यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.

या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल, शाळेचे मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल आणि एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी विशेष कौतुक केले.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२१ ■ सोमवार, २० ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# शिक्षणातूनच समाजाचा आणि राष्ट्राचा विकासः खा.अमर काळे

## श्री माळी वैभव वर्ध्याच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; प्रेरणादायी विचारांनी झाले सभागृह भारावले

**वर्धा जनमाध्यम :** शिक्षण हेच खऱ्या अर्थाने समाज आणि राष्ट्र विकासाचे भक्कम अधिष्ठान आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार हा केवळ त्यांच्या यशाचा गौरव नसून पालक, शिक्षक आणि समाजाचा अभिमान आहे, असे प्रतिपादन खासदार अमर काळे यांनी केले.श्री माळी वैभव वर्धा जिल्ह्याच्या वतीने बजाज सार्वजनिक वाचनालयात आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात खासदार काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.




खासदार काळे म्हणाले, आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ जास्त गुण मिळवणे एवढेच यश नाही. चांगले संस्कार, आत्मविश्वास आणि समाजाप्रती जबाबदारी असलेला विद्यार्थीच खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतो. अभ्यासाबरोबर सामाजिक बांधिलकी जपणेही तितकेच गरजेचे आहे. ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी डॉक्टर, इंजिनिअर या पारंपरिक अभ्यासक्रमांपलीकडे जाऊन स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आयएएस, आयपीएस, एमपीएससीसारख्या प्रशासकीय सेवांमध्ये जाण्याचे ध्येय ठेवावे. विदर्भात या परीक्षांकडे झुकाव कमी दिसतो, आणि हे बदलले पाहिजे. या प्रसंगी काळे यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. सार्थक वनकर या विद्यार्थ्याने इंडियन आर्मीमध्ये जाण्याचे ध्येय ठेवल्याचे ऐकून मला अत्यंत आनंद झाला. अशा ध्येयवेड्या तरुणांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे, असे ते म्हणाले.खासदार काळे यांनी पुढे सांगितले की, श्री माळी वैभव वर्धा जिल्ह्याचा गुणवंत विद्यार्थी सत्कार हा उपक्रम गेल्या अकरा वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते आणि शिक्षणाबाबतचो सकारात्मक वातावरण निर्माण होते. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह पालक व श्री माळी वैभव वर्धा जिल्ह्याचो पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नॅशनल हायवेवर निर्दयतेने जनावरांची वाहतूक

## -पोलिसांची धडक कारवाई १४ गोवंश जनावरांची सुटका



**वडनेर जनमाध्यम :** स्थानिक गुन्हे शाखा, यांनी हिंगणघाट परिसरात मोठी कारवाई करत जनावरांच्या अवैध वाहतुकीचा पर्दाफाश केला. ट्रकमधून कत्तलखान्यासाठी निर्दयतेने कोंबून नेण्यात येत असलेल्या १४ गोवंश जनावरांची सुटका करण्यात आली असून २१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी तिघा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रविवारी (दि. १९ ऑक्टोबर) स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगणघाट उपविभागात गस्त घालत असताना गुप्त माहितीच्या आधारे नॅशनल हायवे क्रमांक ४४ वर सरकारी दवाखाना चौकात नाकेबंदी करण्यात आली. त्यावेळी एक संशयित ट्रक दिसल्याने त्याची तपासणी केली असता त्यात गोवंश जनावरे कत्तलीसाठी भरलेली आढळली.सदर ट्रकचे चालक मोहतशीम आलम मुक्तार अन्सारी (४१) व इम्रान खान मुस्ताक खान (३८), दोघेही रा. कामठी, जिल्हा नागपूर असून वाहनमालक फिरोज कुरेशी (रा. कामठी) असा आहे. तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.पोलिसांनी अशोक लेलॅन्ड आयशर कंपनीचा ट्रक (क्रमांक श्प ४० एऊ ०४३४, किंमत १८ लाख रुपये), १४ जनावरे (अंदाजे किंमत २.८० लाख रुपये) आणि दोन मोबाईल फोन (किंमत २० हजार रुपये) असा एकूण २१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जनावरांना सुरक्षित ठेवण्यासाठी गोरक्षण संस्थेत पाठवण्यात आले आहे.ही कारवाई पोलीसांनी केली आहे,

**२१ लाखांचा मुद्देमाल जप्त**

# सोयाबीनचा अपयश पाहून शेतकऱ्याने ५ एकर पिकात सोडली जनावरे



**-अतिवृष्टी, रोगराईचा तडाखा; दिड लाख रुपयांचे नुकसान**

**समुद्रपूर जनमाध्यम :** यंदाच्या मुसळधार पावसाने आणि सोयाबीनवरील रोगराईने तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मोहगाव येथील शेतकरी पुरुषोत्तम औरके यांनी पाच एकरांत सोयाबीनची पेरणी केली होती. सुरुवातीला पिकाची चांगली वाढ होत होती. त्यांनी खतपाणी, फवारणी या सर्व बाबी वेळेवर केल्या.मात्र, शेंगा भरण्याच्या टप्प्यावरच पिकावर रोगाचा प्रादुर्भाव वाढला आणि पिक पिवळे पडू लागले. सततच्या पावसाने शेतीतील परिस्थिती आणखी बिघडली. शेवटी पिकावरील रोग न गेलेने औरके यांनी निराशेने स्वतःच जनावरे उभ्या पिकात सोडली.या निर्णयामुळे त्यांचे सुमारे दिड लाख रुपयांचे नुकसान झाले असून, आता सरकारकडून मदतीच्या प्रतीक्षेत ते आहेत. परिसरातील शेतकऱ्यांकडूनही अशा प्रकारच्या हकिगती समोर येत असल्याने शेतकऱ्यांच्या यातना वाढल्या आहेत.

# माझ्या जडणघडणीत ज्येष्ठांचा मोलाचा वाटा : माजी खासदार रामदास तडस

## दिवाळी व ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त देवळीत ३०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार

**देवळी जनमाध्यम :** आपल्या कुटुंबात आणि समाजात ज्येष्ठ नागरिकांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. त्यांनी दिलेल्या संस्कारांचा, परिश्रमाचा आणि त्यागाचा माझ्या आयुष्यावर अमिट ठसा आहे. माझ्या जडणघडणीत या ज्येष्ठांचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन माजी खासदार रामदास तडस यांनी केले.दिवाळी आणि जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त देवळी येथे ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी शहरातील ३०० हून अधिक ज्येष्ठांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित ज्येष्ठांना तडस यांनी दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात सौ. शोभाताई तडस, डॉ. नरेंद्र




मदणकर, नंदु वैद्य, शरदराव आदमने, रवि कारोटकर, उमेश कामडी, शुभांगी कुर्जेकर, विद्या झिलपे, दिलीप कारोटकर, विजयराव गोमासे, मारोतराव मेघरे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन रवि कारोटकर यांनी केले. प्रास्ताविक शुभांगीताई कुर्जेकर यांनी केले, तर आभार उमेश कामडी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय मुजबैले, अमोल काकडे, दिलीप खाडे, आसिफ शेख, योगेश आदमने, स्वप्नील बुट्टे, प्रणाली डंबारे, पूजा डंबारे, भाग्यश्री महिस्कर आदींनी परिश्रम घेतले.देवळी शहरातील नागरिक आणि ज्येष्ठांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे सोहळ्याला भावपूर्ण वातावरण लाभले.

# एनसीसी प्रशिक्षणातून सैनिकी व्यक्तिमत्व घडले जाते, कर्नल जिसांतो

## -एस एस एन जे च्या 'एनसीसी' युनिटला सदिच्छा भेट

**वर्धा जनमाध्यम :** 'आज सैनिकी मानसिकता असलेल्या तरुण-तरुणींची देशाला नितांत गरज आहे. ज्यातून युवा पिढीत शिस्त, साहस, समर्पण, देशभक्ती व नैतिक मूल्य निर्वाण होते. या दृष्टिकोनातून एनसीसी चे प्रशिक्षण महत्त्वाचे असून 'एनसीसी' तून सैनिकी व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, असे प्रतिपादन २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी चे प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल जीसांतो यांनी स्थानिक एस एस एन जे महाविद्यालयातील एनसीसी युनिटला दिलेल्या सदिच्छा भेट प्रसंगी छात्र सैनिकांना मार्गदर्शन करताना १८ ऑक्टोबर रोजी केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेफ्टनंट कर्नल जीसांतो तर मंचावर एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर उपस्थित होते.

आपल्या सदिच्छा भेटीत लेफ्टनंट कर्नल जीसांतो यांनी 'अडथळा पार प्रशिक्षण' केंद्र, सैन्यदलात सामील होण्याकरिता पूर्व तयारी प्रशिक्षण केंद्र, सैनिकी प्रशिक्षणाकरिता डमी रायफल, प्रशिक्षणाचे साहित्य, एनसीसी हॉल, एनसीसी अधिकारी ऑफिस व कॅडेट रूम इत्यादीचे निरीक्षण केले व उत्तम प्रशिक्षण केंद्र म्हणून प्रशंसा केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांनी करून प्रशिक्षणाकरीता आवश्यक अद्यावत सुविधा उपलब्ध असल्याबाबत सांगितले. अंडर ऑफिसर रितेश बुटे याच्या नेतृत्वात छात्र सैनिकांनी 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन कर्नल जीसांतो यांचे सैनिकी पद्धतीने स्वागत केले तर अंडर ऑफिसर मयुरी पेटकर हिच्या नेतृत्वात प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या छात्र सैनिकांनी मानवंदना दिली.

कार्यक्रमाचे संचालन कॅडेट्स सार्जंट मेजर कल्याणी लिखार हिने तर सार्जंट वैष्णवी कन्नाके हिने आभार मानले. यशस्वीते करिता अंडर ऑफिसर कोमल शितळे, सार्जंट निशांत शितळे, समीक्षा नेवारे, सत्तेश्वरी सावरकर व छात्र सैनिकांनी अथक परिश्रम घेतले.

# लायन्स क्लब स्विमिंग विंग्सतर्फे कोजागिरी पौर्णिमा साजरी



**वर्धा जनमाध्यम :** लायन्स क्लब स्विमिंग विंग्स, वर्धातर्फे रविवारी हॉटेल फूड कॉर्नर येथे वार्षिक जनरल बॉडी मीटिंग व कोजागिरी पौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन क्लबचे अध्यक्ष लायन मनोज शिंदे व त्यांच्या कार्यकारिणी टीमने केले. या प्रसंगी माजी प्रांतपाल डॉ. विनोद अदलाखिया, प्रांत मार्केटिंग चेअरपर्सन सुरेंद्रसिंह प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. क्लब सचिव लायन अजय वरठकर, कोषाध्यक्ष लायन दिनेश बोधंकर, उपाध्यक्ष लायन सुनील यूके तसेच अनेक पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.बैठकीत संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर कोजागिरी पौर्णिमेचा उत्सव हशा-विनोद व संवादांनी रंगला. उपस्थितांनी परस्पर संवाद साधत स्नेहपूर्ण वातावरणात चंद्राची पूजा करून उत्सव आनंदात साजरा केला.समारोपाच्या प्रसंगी सचिव लायन अजय वरठकर यांनी सर्व उपस्थित लायन्स सदस्य व अतिथींचे मनःपूर्वक आभार मानले.

# गिरडमध्ये रा.स्व.संघाचा विजयादशमी उत्सव

## -शताब्दी वर्षानिमित्त संघाच्या कार्याचा घेतला आढावा

**गिरड जनमाध्यम :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गिरड शाखेच्या वतीने विजयादशमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून धनंजय कुकडे उपस्थित होते, तर गुरुदेव सेवा मंडळाचे तालुका सेवाधिकारी विष्णू ब्राह्मणवाडे हे प्रमुख अतिथी होते. व्यासपीठावर तालुका संघचालक रवी गाठे उपस्थित होते.या प्रसंगी मान्यवरांनी संघ स्थापनेपासून आजपर्यंत केलेल्या कार्याचा आढावा घेतला. संघाच्या प्रेरणादायी १०० वर्षांच्या प्रवासाने राष्ट्रभक्ती, संस्कार आणि संघटनशक्तीचे महत्त्व अधोरेखित केले आहे, असे वक्त्यांनी सांगितले. देशसेवा व समाजघटन यावर केंद्रित कार्यपद्धतीमुळे संघ समाजजीवनातील अमूल्य प्रेरणास्थान ठरल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमास अरुण मोटघरे, मोहन गिरडे, नुतन गिरडे, बहादूरसिंग अकाली, गिरड ग्रामपंचायतीचे सरपंच राजू नौकरकर, मोहगावचे विलास नवघरे, ग्रा.पं. सदस्य राहुल गाढवे, विहिंपचे निर्भय पांडे, रघुवीर पारधे, केशव घरत, सोनू गिरडे, कुणाल बंडे, निलेश बोदे, रोशन नौकरकर यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



# कृत्रिम फुलांच्या माळांची वाढती क्रेझ

## -दिवाळीचा जल्लोष, बाजारपेठा रंगल्या सौंदर्यात

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळी जवळ येताच शहर आणि जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये सणाची लगबग दिसू लागली आहे. किराणा, कपडे, मिठाई, फटाके आणि देवी लक्ष्मीच्या मूर्तींच्या दुकानांत ग्राहकांची गर्दी वाढताना दिसत आहे.घरांच्या सजावटीसाठी लागणाऱ्या वस्तूंनाही मोठी मागणी निर्माण झाली आहे. रंगीत विद्युत रोषणाई, आकर्षक दिवे, रंगीबेरंगी रांगोळ्या, आकाशकंदील तसेच शुभ-लाभ, स्वस्तिक स्टिकर्समुळे बाजारपेठ उजळून निघाली आहे.

पूर्वी आंब्याच्या पानांच्या माळा घराच्या दरवाजावर लावण्याची प्रथा होती; मात्र शहरांतील आंब्याची झाडे कमी झाल्याने या पारंपरिक माळांची जागा आता कृत्रिम फुलांच्या माळांनी घेतली आहे. कापड, प्लास्टिक आणि क्रिस्टलपासून बनवलेली फुलांची तोरणे ग्राहकांना विशेष आवडू लागली आहेत.

पिवळ्या, नारिंगी, झेंडूच्या फुलांच्या साच्यांतून तयार झालेल्या या कृत्रिम माळा घराच्या प्रवेशद्वाराला नैसर्गिक सजावटीसारखा लूक देतात. ओम आणि




स्वस्तिक चिन्हांनी सजलेली ही तोरणे ६० ते ५०० रुपयांपर्यंतच्या किमतीत उपलब्ध असून त्यांना बाजारात प्रचंड मागणी आहे. काही क्रिस्टल तोरणे लांबूनच चमक देऊन पाहणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतात.आता घराघरांत खरी फुले आणून तोरण गुंफण्याचा काळ मागे पडला असून आधुनिक, टिकाऊ आणि पुन्हा वापरता येणाऱ्या कृत्रिम माळा दिवाळीच्या सजावटीसाठी घराघरांत ठसा उमटवत आहेत.

# वर्ध्यात ७ वर्षांत ९६ बालविवाह रोखले!

## १२ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल

**वर्धा जनमाध्यम :** कायद्याने बालविवाह गुन्हा असला तरी ग्रामीण समाजमान्यातून अजूनही ही प्रथा दिसून येते. मात्र जिल्हा प्रशासन, पोलिस यंत्रणा आणि सामाजिक संस्थांच्या तत्परतेमुळे गेल्या सात वर्षांत ९६ बालविवाह वेळेवर थांबविण्यात यश आले असून, १२ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ अंतर्गत प्रत्येक ग्रामसेवकाला बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. शहरी भागात पर्यवेक्षिका तर ग्रामीण भागात अंगणवाडी सेविका सहाय्यक अधिकारी म्हणून ही जबाबदारी पार पाडतात. कायद्यानुसार मुलीचे वय १८ व मुलाचे २१ वर्षांपेक्षा कमी असल्यास असा विवाह कायदेशीर गुन्हा ठरतो. दोषींना दोन वर्षांची सक्तमजुरी व एक लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते. बालविवाह घडवून आणणारे किंवा प्रोत्साहन देणारे पालक, नातेवाईक, मंदिराचे विश्वस्त, फोटोग्राफर, प्रिंटिंग प्रेस, सभागृह व्यवस्थापक, वाजंत्री, केटरिंग चालक यांच्यावरही कायदेशीर कारवाईची तरतूद आहे. बाल कल्याण समिती, पोलिस विभाग, चाईल्ड लाईन, स्वराज्य मित्र संस्था, ग्रामीण मुक्ती ट्रस्ट आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष या संस्थांच्या एकत्रित प्रयत्नामुळे बालविवाह प्रतिबंधात लक्षणीय यश मिळाले आहे.२०१९ ते २०२५ दरम्यान जिल्ह्यातील विविध भागांतून बालविवाहाशी संबंधित ९६ तक्रारी प्राप्त झाल्या. प्रत्येक प्रकरणात वेळेवर हस्तक्षेप करून विवाह रोखण्यात आले असून, १२ ठिकाणी एफआयआर दाखल करण्यात आले. हिंगणघाट तालुक्यात ३, आर्वी २, वर्धा २, देवळी, आर्वी व सेलू प्रत्येकी १ आणि सेलूमध्ये आणखी २ अशा प्रकरणांचा समावेश आहे.







**वर्धा शहरात दिवाळीच्या पूर्वसंध्येला बाजारपेठेतील गर्दी झपाट्याने वाढली होती. मोठमोठ्या बाजारांमध्ये नागरिकांनी दिवाळीच्या फराळ, फटाके, कंदील, आणि सजावटीच्या वस्तूंची खरेदी केली.**
**यावेळी राहुल तेलरांधे यांनी आपल्या कॅमेऱ्यात गर्दीचा फोटो कैद केला.**

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## प्रगतीची दालने

अलीकडेच सरकारी मालकीच्या एरोस्पेस कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडद्वारे निर्मित स्वदेशी बनावटीचे लढाऊ विमान 'तेजस मार्क-१ए' ने शुक्रवारी नाशिक येथून पहिले उड्डाण यशस्वीरित्या पूर्ण केले.संरक्षण क्षेत्रात भारताच्या स्वावलंबी होण्याच्या दिशेने हे उड्डाण आणखी एक मोठे पाऊल मानले जाते. बंगरूळ नंतरची ही दुसरी उत्पादन सुविधा असून स्वदेशी संरक्षण क्षमतेच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण घडी ठरली आहे पूर्ण भारतीय बनावटीचे तेजस विमान सर्वात हलके लढाऊ विमान आहे ताशी दोन हजार किलोमीटर वेग आणि हवेतच इंधन भरण्याची क्षमता आहे ध्वनीच्या वेगाने १.६ पट म्हणजे सुमारे २०००किमी प्रति तास वेगाने उड्डाण करण्यास हे विमान सक्षम आहे. याच बरोबर भारताने भूतानमध्ये दोन रेल्वेमार्गाची घोषणा केली आहे. या रेल्वे प्रकल्पांमुळे भारत आणि भूतानमधील व्यापार वाढेल. त्यामुळे भूतानमधील वस्तू रेल्वेने बंदरांपर्यंत पोहोचवणे सोपे होईल; पण ही साधी बाब नाही. त्यामागे एक मोठी भारतीय रणनीती आहे. भारत सरकारच्या या पावलामुळे भारतीय लष्कराच्या धोरणात्मक क्षमताच बळकट होणार नाहीत, तर सीमेवर चीनच्या बाजूने एकतर्फी झुकलेल्या धोरणात्मक संतुलनातही बदल होईल. पहिली रेल्वे आसाममधील कोक्राझार ते भूतानमधील गेव्हेलफुगपर्यंत धावेल, तर दुसरी रेल्वे बोंगाईगाव ते भूतानमधील समद्रुप जोंगखारपर्यंत जाईल. दोन्ही मार्ग दक्षिण भूतानला भारताच्या रेल्वे नेटवर्कशी जोडतील. चीनची सीमा तुलनेने जवळ आहे, म्हणून संरक्षणात्मक दृष्टिकोनातून ही कनेक्टिव्हिटी महत्त्वाची मानली जाते. भूतानच्या सुरक्षेची जबाबदारी भारत घेत असल्याने भारताने तेथे आपली लष्करी उपस्थिती मजबूत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सध्याची परिस्थिती अशी आहे, की भूतानसह देशाच्या सीमावर्ती भागात रस्त्याने सैन्य आणि जड शस्त्रे वाहून नेण्यासाठी अनेक दिवस लागतात. अनेक ठिकाणी रस्तेच नाहीत किंवा असले तरी अत्यंत अरुंद आहेत. त्यामुळे मोठे लष्करी ट्रक किंवा शस्त्रे उंचावर पोहोचू शकत नाहीत. आता, भूतानच्या दुर्गम भागात भारताने रेल्वे लाइन टाकण्याचा निर्णय घेतल्याने भारतीय सैनिक, टँक, चिलखती वाहने आणि तोफखाना खूप कमी वेळेत घटनास्थळी पोहोचवता येतील. युद्धकाळात वेळेची बचत अनेकदा महत्त्वाची ठरू शकते. धोकादायक टँक आणि तोफखाना जलद तैनात करता येऊ शकतो. लष्कराला सामान्य परिस्थितीतही भूतानसह उंचावर असलेल्या भागात दारूगोळा, इंधन आणि रेशन यासारख्या रसद साहित्याची वाहतूक करण्यात अडचणी येतात. रेल्वेच्या बांधकामामुळे जलद गतीने मोठ्या प्रमाणात पुरवठा करण्यासाठी वाहतूक करणे शक्य होईल. या रेल्वेमार्गांद्वारे भारत आपले मुख्य युद्ध रणगाडे (टी-९० आणि अर्जुन), तोफखाना तोफा , क्षेपणास्त्र प्रक्षेपक आणि हवाई संरक्षण प्रणाली भूतान-चीन सीमेवरदेखील वाहून नेऊ शकेल. यामुळे कोणत्याही अचानक हल्ल्याच्या बाबतीत चीनला जलद प्रत्युत्तर देता येईल. सिलिगुडी कॉरिडॉरची सुरक्षा मजबूत केली जाईल. ही रेल्वे कनेक्टिव्हिटी भारताला हवाई मार्गावर पूर्णपणे अवलंबून राहण्यापासून रोखेल. हवाई पुरवठा जलद असला तरी महाग आणि हवामानावर अवलंबून असतो. रेल्वे केवळ किफायतशीरच नाही तर एक विश्वासार्ह पुरवठा साखळीदेखील तयार करेल. हे रेल्वे नेटवर्क सिलिगुडी कॉरिडॉर ची सुरक्षादेखील मजबूत करेल. हा अरुंद मार्ग भारताच्या ईशान्येकडील राज्यांना उर्वरित भारताशी जोडतो. चीनने हा कॉरिडॉर तोडण्याची धमकी दिल्यास भारत या रेल्वेमार्गांचा वापर करून जलदगतीने सैन्य आणि शस्त्रे तैनात करू शकेल. या रेल्वे मार्गामुळे केवळ लष्करी दृष्टिकोनातूनच नव्हे, तर भारत आणि भूतानमधील आर्थिक आणि राजनैतिक संबंध दृढ होतील. यामुळे दोन्ही देशांमधील परस्परविश्वास वाढेल आणि चीनच्या विस्तारवादी रणनीतीला आळा बसेल.भूतानमध्ये भारताची उपस्थिती चीनसाठी नेहमीच एक संवेदनशील मुद्दा राहिला आहे. भूतानचे रक्षण करण्याच्या भारताच्या वारंवार प्रयत्नांबद्दल तो नेहमीच चिंतेत राहिला आहे. २०१७ मध्ये चिनी सैन्याने डोकलाम ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा भूतानच्यावतीने चीनला आव्हान देणारे भारतीय सैन्य होते. भविष्यात पुन्हा असे तणाव निर्माण झाल्यास रेल्वेने जलद गतीने सैन्याला सीमेवर पोहोचवणे खूप सोपे होईल. देशाच्या संरक्षण व्यवस्थांमध्येही बुद्धिबळाचा आधार घेतला जात असतो. शत्रूपक्ष कुठले प्यादे कधी हलवेल आणि त्याला कसे मारायचे, याची व्यूहनीती आखली जात असते. त्याला 'स्ट्रॅटेजिक' व्यूहनीती म्हटले जाते. भूतानमध्ये सध्या कोणतीही रेल्वेलाइन नाही. आता भारत भूतानला रेल्वेने जोडणार आहे. त्यावर अंदाजे चार हजार कोटी रुपये खर्च केले जातील. इतक्या वर्षांनंतर हे का घडत आहे आणि त्याचा अर्थ आणि उद्देश काय आहे हे समजून घेतले पाहिजे. या रेल्वे लाइन्स कुठे बांधल्या जातील ते पाहिले पाहिजे. भूतान आणि भारताची सीमा सुमारे ७०० किलोमीटर आहे. एका बाजूला, भूतानची भारताशी असलेली सीमा पश्चिमेला सिक्कीममध्ये सुरू होते; पण सिक्कीमची सीमा फक्त ३२ किलोमीटर आहे. त्यानंतर भूतानच्या खाली, म्हणजेच भूतानच्या दक्षिणेला पश्चिम बंगालचा दार्जिलिंग-सिलीगुडी परिसर आहे. पश्चिम बंगाल आणि भूतानची सीमा १८३ किलोमीटर आहे. भूतानच्या अगदी खाली, म्हणजेच दक्षिणेला आसाम आहे. आसाम आणि भूतानची सीमा २६७ किलोमीटर आहे. त्यानंतर भूतानच्या पूर्वेला अरुणाचल प्रदेशचा तवांग परिसर आहे. भूतानची अरुणाचल प्रदेशशी असलेली सीमा २१७ किलोमीटर आहे. याचा अर्थ असा, की भूतान तीन बाजूंनी भारताने वेढला आहे. पश्चिमेला सिक्कीम, दक्षिणेला पश्चिम बंगाल आणि आसाम आणि पूर्वेला अरुणाचल. उत्तरेला तिबेट आहे. म्हणजेच चीन. भूतानच्या पश्चिमेला संपूर्ण सीमा सिक्कीमशी नाही. ती फक्त ३२ किलोमीटर आहे. सिक्कीम आणि भूतानमध्येदेखील तिबेट किंवा चीनचे एक खोरे आहे. पर्वतांमध्ये रेल्वेमार्ग बांधणे हे मैदानी भागात रेल्वेमार्ग बांधण्यापेक्षा पूर्णपणे वेगळे असते. ती अभियांत्रिकीही गुंतागुंतीची असते. त्याची तुलना मैदानी भागातील रेल्वेमार्गाशी करता येत नाही. भूतानला जाणारी रेल्वेलाइन हा केवळ एक प्रकल्प नाही, तर दोन देशांना जोडणारा महापयोगी उपक्रम आहे. दुसरी मार्गिका पश्चिम बंगालमधील बनारहाट ते भूतानमधील समत्सेपर्यंत धावेल. ती फक्त २० किलोमीटर आहे; पण हे २० आणि ७० किलोमीटरचे रेल्वेमार्ग भूतानला भारताच्या ७० हजार किलोमीटरच्या रेल्वेमार्गांशी जोडतील.

# नक्षलवादाच्या अंताकडे

**अलीकडेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ठामपणे सांगितले की, भारत आता नक्षलवाद, ईशान्य बंडखोरी आणि काश्मीर दहशतवाद या तिन्ही मोर्चांवर निर्णायक विजयाच्या मार्गावर आहे. दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णतः नक्षलवादमुक्त भारत म्हणून उभा राहील. अलीकडेच वरिष्ठ नक्षल नेते मल्लोजुला वेंगुपाल राव ऊर्फ 'भूपती' यांनी महाराष्ट्रातील गडचिरोली येथे ६० सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण केले असून यामुळे महाराष्ट्राच्या नक्षलविरोधी मोहिमेला मोठी बळकटी मिळाली आहे.**

कोणत्याही लढाईमध्ये किंवा युद्धामध्ये विजय मिळवण्यासाठी चार महत्त्वाच्या गोष्टी गरजेच्या असतात. एक म्हणजे सामरिक सज्जता, दुसरे म्हणजे रणनीती, तिसरे म्हणजे अचूक नियोजन आणि चौथे सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नेतृत्वाकडे असणारा कणखरपणा आणि विजयाची महत्त्वाकांक्षा! जगभरातील लढायांचा, युद्धाचा इतिहास आपल्याला हेच सांगत आला आहे की, या चतुःसूत्रीच्या आधारे विजयाच्या शक्यता बळावत जातात. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षिततेला असणाऱ्या बाह्य आणि अंतर्गत आव्हानांचा मुकाबला करताना मोदी सरकारने या चतुःसूत्रीच्या आधारे वाटचाल करत आज एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून पाकिस्तानला तडाखा दिल्यामुळे भविष्यात हा भिकेकंगाल देश भारताविरुद्ध कारवाई करताना दहा नव्हे शंभर वेळा विचार करेल, यात शंकाच नाही. दुसरीकडे, अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने दशकभरापूर्वीपर्यंत सर्वांत मोठे आव्हान होते ते म्हणजे नक्षलवादाचे. नक्षलवादी चळवळींचा इतिहास बराच जुना आहे. एकेकाळी देशातील १० हून अधिक राज्यांमध्ये नक्षलवाद्यांच्या रक्तरंजित हिंसाचाराने काळजीचे मळभ दाटले होते. यूपीए सरकारचा कालखंड आठवून पाहिल्यास सातत्याने काही महिन्यांनी नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यांमध्ये पोलिस दल, सुरक्षा दल आणि निष्पाप नागरिकांचा बळी गेल्याचे दिसून येत असे. असे असूनही भारतातील काही बुद्धिजीवी नक्षलवाद्यांच्या समर्थनार्थ आक्रोश करताना दिसत असत.

मोदी सरकारने सत्तेत आल्यानंतर एकीकडे विकास कामांचा, आदिवासींसाठीच्या कल्याणकारी योजनांचा वेग वाढवातानाच दुसरीकडे नक्षलवाद्यांना लष्करी ताकदीने शह देण्यास सुरुवात केली. विशेषतः अमित शहा यांनी



केंद्रीय गृहमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी एक महत्त्वाची भूमिका मांडली, ती म्हणजे भारतीय समाज नक्षलवादाला वैचारिक, कायदेशीर आणि आर्थिक आधार देणाऱ्यांना ओळखून त्यांचा पर्दाफाश करणार नाही तोवर नक्षलवादाविरुद्धची लढाई संपणार नाही. गतवर्षी त्यांनी भारत दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्णपणे नक्षलवादमुक्त होईल अशी एक प्रकारची भीष्मप्रतिज्ञा केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पदभार स्वीकारला, तेव्हा जम्मू-काश्मीर, ईशान्य भारत आणि लेफ्ट विंग कॉरिडॉर हे तीन मोठे अंतर्गत सुरक्षा हॉटस्पॉट देशासमोर होते. गेल्या चार-पाच दशकांपासून या तिन्ही भागांत हजारो लोकांनी आपले प्राण गमावले. अफाट मालमत्तेचे नुकसान झाले. देशाच्या अर्थसंकल्पातील मोठा हिस्सा गरिबांच्या विकासाऐवजी या भागांच्या सुरक्षेसाठी खर्च करावा लागला. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी या तिन्ही क्षेत्रांवर दीर्घकालीन आणि ठोस धोरण राबवून देशाच्या अंतर्गत सुरक्षेत ऐतिहासिक बदल घडवून आणला. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीस भारतात सशस्त्र नक्षल चळवळ उभी राहिली. १९७१ मध्ये ३,६२० हिंसक घटना नोंदल्या गेल्या होत्या. १९८० नंतर पीपल्स वॉर ग्रुपने महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार आणि केरळपर्यंत आपला विस्तार केला. २००४ मध्ये विविध डाव्या संघटनांचे एकत्रीकरण होऊन सीपीआय (माओवादी) या प्रमुख संघटनेची निर्मिती झाली आणि नक्षलवादाने अत्यंत धोकादायक रूप धारण केले.

त्या काळी 'पशुपतिनाथ ते तिरुपती' असा लाल कॉरिडॉर म्हणून ओळखला जाणारा भाग देशाच्या १७ टक्के भूभागावर पसरला होता आणि जवळजवळ १२ कोटी लोक या दहशतीखाली जगत होते. मोदी सरकारने संवाद, सुरक्षा आणि समन्वय या तीन पातळ्यांवर काम सुरू केले आणि त्या माध्यमातून नक्षलवादाच्या अंताचा प्रारंभ झाला. यूपीए सरकारचा नक्षलवादाबाबतचा दृष्टिकोन विस्कळीत होता. मोदी सरकारने विखुरलेल्या धोरणाऐवजी एकसंध आणि कठोर धोरण स्वीकारले. निष्पाप नागरिकांविरुद्ध बंदुका चालवणाऱ्यांना त्यांच्याच भाषेत कठोर प्रत्युत्तर देतानाच जे शस्त्र खाली ठेवून आत्मसमर्पण करू इच्छितात त्यांच्यासाठी सरकारने लाल गालिचा अंथरला. याचा परिणाम म्हणजे, गेल्या चार-पाच वर्षांमध्ये नक्षली चळवळींना अलविदा करून सरकारकडे शरणागती पत्करणाऱ्यांची संख्या पाहता पाहता वाढत गेली.

२०२५ मध्ये भारतात नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणाचा वेग अभूतपूर्वरीत्या वाढला असून गृह मंत्रालयाच्या अधिकृत आकडेवारीनुसार दि. १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत देशभरात एकूण १,६३९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. गुप्तचर माहितीवर आधारित कारवाया, विकासाभिमुख उपक्रम आणि आत्मसमर्पण या मोदी सरकारच्या बहुआयामी धोरणाचे हे सर्वांत मोठे यश आहे. यंदाच्या वर्षीचा नक्षलवाद्यांच्या समर्पणाचा आकडा गेल्या वर्षाच्या तुलनेत जवळजवळ दुप्पट झाला आहे. या यादीत सीपीआय (माओवादी) संघटनेच्या राजकीय ब्युरो सदस्य आणि केंद्रीय समिती सदस्याचा समावेश आहे. अलीकडेच वरिष्ठ नक्षली नेते मल्लोजुला वेंगुपाल राव ऊर्फ 'भूपती' यांनी महाराष्ट्रातील गडचिरोली येथे ६० सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण केले असून यामुळे महाराष्ट्राच्या नक्षलविरोधी मोहिमेला मोठी बळकटी मिळाली. जुलै २०२५ च्या मध्यात छत्तीसगड सरकारने सांगितले की, मागील १५ महिन्यांत राज्यात १,५२१ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. २००० ते जुलै २०२४ दरम्यान केवळ छत्तीसगड राज्यातच सुमारे १६,७८० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. २०२४ मध्ये एकूण ८८१ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले होते. त्याच वर्षी २९० नक्षलवादी ठार करण्यात आले आणि १,०९० जणांना अटक करण्यात आली होती.

अलीकडेच महाराष्ट्राच्या गृह विभागाच्या माओवाद विरोधातील लढाईला आजवरचं सर्वात मोठे यश प्राप्त झाले. माओवाद्यांचा पॉलिट ब्युरो मेंबर तसेच सेंट्रल कमिटी मेंबर मल्लोजुला वेणुगोपाल राव ऊर्फ सोनू ऊर्फ भूपती याने त्याच्या ५० सहकाऱ्यांसह गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. १४ ऑक्टोबरच्या रात्री दक्षिण गडचिरोली जिल्ह्यातील घनदाट जंगलात छत्तीसगड सीमेलगत महाराष्ट्राच्या बाजूने हे सामूहिक आत्मसमर्पण झाले आहे. गडचिरोलीच्या इतिहासातील ही आजवरची सर्वांत मोठी शरणागती आहे. यामध्ये तब्बल सहा कोटींचे बक्षीस असलेल्या मल्लोजुला रावसह ५०हून अधिक नक्षलवाद्यांचा समावेश आहे. यामुळे नक्षल चळवळीला मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऐनवेळी सोलापूरचा विमानप्रवास टाळून मोर्चा गडचिरोलीकडे वळवला आणि ते गडचिरोलीत या कार्यक्रमाला स्वत: उपस्थित राहिले. यामागचे एक कारण म्हणजे, मुख्यमंत्री उपस्थित राहणार असतील, तर शरणागती पत्करू, अशी अटच वेणुगोपाल राव ऊर्फ सोनू ऊर्फ भूपती याने टाकली होती.

राजकीय नेतृत्वाबाबतचा अशा प्रकारचा विश्वास राजकारणात दुर्मीळपणे पाहायला मिळतो. भूपती हा नक्षल चळवळीत केंद्रीय समिती पॉलिट ब्युरो मेंबर तसेच सेंट्रल कमिटीमध्ये सदस्य होता. अनेक हिंसक हल्ल्यांचा तो सूत्रधार आहे. नक्षली चळवळीच्या थिंक टँकमध्येही तो होता. अनेक वर्षांपासून नक्षल चळवळीची भूमिका आणि धोरणे 'अभय' या नावाने पत्रकातून मांडत होता. तो मूळचा तेलंगणा राज्यातील पेदापल्ली जिल्ह्याचा रहिवासी आहे. १९८० च्या दशकात भूपतीने त्याचा मोठा भाऊ मल्लोजुला कोटेश्वर राव ऊर्फ किशनजी याच्यासह तत्कालीन पीपल्स वॉर ग्रूपमध्ये प्रवेश केला होता. २००४ मध्ये माओवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाल्यानंतर दोघेही केंद्रीय समिती सदस्य झाले. किशनजीला पश्चिम बंगालचा प्रभारी करण्यात आले, तर भूपतीला दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी मेंबर बनविण्यात आले. दक्षिण भारतात गुरिल्ला झोन तयार करण्याची जबाबदारीही भूपतीवर सोपविण्यात आली होती. पुढे नक्षलवाद्यांचा प्रसिद्धी विभागप्रमुख म्हणूनही भूपती काम पाहत होता. २०१० च्या एप्रिल महिन्यात छत्तीसगडमध्ये केंद्रीय राखीव दलाचे ७६ जवान शहीद झाले होते. या घटनेचा मास्टरमाईंड भूपती हाच होता. नक्षल चळवळीत असतानाच भूपतीने गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील रहिवासी असलेल्या विमला सिडाम ऊर्फ ताराक्का या नक्षलीशी विवाह केला. चालू वर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे दि. १ जानेवारी २०२५ रोजी भूपतीची पत्नी तारक्का हिने आत्मसमर्पण केले. त्यानंतर सप्टेंबर २०२५ मध्ये किशनजीची पत्नी म्हणजेच भूपतीची वहिनी तथा केंद्रीय समिती सदस्य सुजाता हिने तेलंगणा पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले.

नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण एकाएकी वाढण्यामागचे एक कारण म्हणजे, माओवादी विचारसरणीबद्दल नक्षलवाद्यांचा झालेला भ्रमनिरास आणि त्यातून वाढत चाललेली निराशा. तसेच अंतर्गत कलह आणि नेतृत्व संघर्षाचेही कारण त्यामागे आहे; पण मुख्यत्वे करून केंद्र व राज्य सरकारांनी राबवलेल्या सुधारित आत्मसमर्पण आणि पुनर्वसन योजनांवर नक्षलवाद्यांचा विश्वास वृद्धिंगत होत आहे. आज केंद्र सरकारच्या सुनियोजित प्रयत्नामुळे देशातील सर्वाधिक नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या सहा वरून केवळ तीन (सर्व छत्तीसगडमध्ये) इतकी घटली आहे, तर एकूण नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या १८ वरून ११ इतकी कमी झाली आहे. यावरून केंद्र सरकारच्या गुप्तचर आधारित कारवाया आणि विकासोन्मुख धोरणांचा परिणाम स्पष्टपणे दिसतो. एकीकडे कठोर सुरक्षा कारवाया सुरू असताना, दुसरीकडे विकास, पुनर्वसन आणि विश्वास पुनर्स्थापनेच्या माध्यमातून नक्षलवाद आता आपल्या अंतिम टप्प्यात पोहोचला असल्याचे संकेत दिसत आहेत.

केंद्र सरकारने ज्या योजनाबद्धरितीने देशाच्या अंतर्गत सुरक्षेपुढील हे आव्हान मोडीत काढत आणले आहे, ते खरोखरीच प्रशंसनीय आहे. यासाठी केंद्राकडून राज्य पोलीस आणि केंद्रीय सुरक्षा दलांना स्वातंत्र्य देण्यात आले. गुप्तचर आणि माहिती विनिमय तसेच संयुक्त कारवाईसाठी केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये व्यवहार्य पूल उभारण्यात आला. २०१९ नंतर शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्यावर ९० टक्क्यांहून अधिक नियंत्रण मिळवले गेले. एनआयए आणि ईडीने नक्षलवादाला आर्थिक मदत करणाऱ्यांवर कडक कारवाई केली. 'अर्बन नक्षल' समर्थन गटांवर, त्यांच्या कायदेशीर नेटवर्क्सवर आणि मीडिया कथानक तयार करणाऱ्यांवरही सरकारने लक्ष केंद्रित केले.

ऑगस्ट २०१९ पासून आतापर्यंत केंद्रीय समितीचे १८ पेक्षा अधिक सदस्य निष्प्रभ करण्यात आले आहेत. 'ऑपरेशन ऑक्टोपस' आणि 'ऑपरेशन डबल बुल'सारख्या लक्ष्यित कारवायांमुळे सुरक्षा पोकळी भरून काढण्यात आली. डीआरजी, एसटीएफ, सीआरपीएफ आणि कोब्रा दलांचे संयुक्त प्रशिक्षण सुरू झाले असून या एकत्र प्रशिक्षणामुळे यशाचे प्रमाण वाढले आहे. वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्थान शोध प्रणाली, मोबाईल अ?क्टिव्हिटी ट्रॅकिंग, कॉल लॉग विश्लेषण आणि सोशल मीडियावरील गुप्त समर्थकांचा शोध घेण्यात आल्यामुळे मोहिमा जलद, अचूक आणि परिणामकारक ठरल्या. तेलंगणा-छत्तीसगड सीमेवरील कर्रगुट्टा टेकड्यांवर नक्षलवाद्यांचा एक मोठा कॅम्प होता, जिथे शस्त्रांचा साठा, दोन वर्षांचा अन्नसाठा आणि आयईडी बनवण्याचा कारखाना होता. हा कॅम्प दि. २३ मे २०२५ रोजी 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट'मध्ये उद्ध्वस्त करण्यात आला आणि २७ कठोर नक्षलवादी ठार झाले. त्यानंतर विजापूर येथे आणखी २४ नक्षलवादी ठार झाले. या कारवाईनंतर छत्तीसगडमधील उरलेल्या नक्षलवाद्यांचा कणा मोडला.

**डॉ. योगेश प्र. जाधव**

## प्रोटीन पावडरचा अतिरेक टाळा

मागील काही दशकांपासून प्रोटीन पावडरचा उपयोग शरीरसौष्ठव आणि शारीरिक तंदुरुस्ती यांबरोबर सामान्य पोषण आणि वजन वाढवण्यासाठी केला जात असे.परंतु दिवसेंदिवस केल्या जात असलेल्या देशोदेशीच्या संशोधनांत असे आढळून आले आहे की, अशा प्रोटीन पावडरमध्ये अतिरिक्त प्रमाणात 'शिसे'चे प्रमाण वाढत्या प्रमाणात आढळल्याचे कन्झुमर रिपोर्ट्सचे संशोधक २३ प्रोटीन पावडर आणि त्यासह बनविलेल्या 'शेक' मध्ये दोन तृतीयांशांहून अधिक उत्पादनांच्या एका सर्विंगमध्ये अन्न सुरक्षा तज्ञांनी एका दिवसासाठी सुरक्षित मानलेल्या प्रमाणापेक्षा जास्त असल्याच्या निष्कर्षापर्यंत आलेत. संशोधनाच्या अहवालात असे निर्देशनास आले की प्रोटीन पावडरच्या सेवनामुळे मुलांच्या मेंदूला धोका होण्याचा धोका असतो तर प्रौढांना उच्च रक्तदाब, मज्जातंतूंचे नुकसान, मूत्रपिंडाच्या समस्या, पुनरुत्पादकता या सारख्या समस्यांना कारणीभूत ठरू शकतो. आर्सेनिक आणि कॅडमियमची वाढलेली पातळी कोणत्याही वयात कर्करोगाच्या वाढीव जोखमीशी संबंधित असल्याचे रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. अशी जोखीम आणि धोके टाळण्यासाठी प्रोटीन पावडरच्या पॅकिंगवर दिलेले धोके पूर्णपणे वाचून त्या उत्पादनांचा वापर करणे टाळावे. प्रोटीन्सच्या गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गात उपलब्ध असलेली अन्न धान्ये जशी की मसूर, दही, बीन्स किंवा मासे चिकन, अंडी यांचा आहारात समावेश करावा असे सुचविण्यात आले आहे.

**राजन पांजरी**

## राजकारणाची घसरलेली पातळी

काँग्रेस खासदार राहुल गांधी सातत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप वर बेछूट आरोप करत असतात. नुकत्याच झालेल्या अमेरिका भेटी दरम्यानही त्यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान मोदींवर टीका केली होती. राहुल गांधींनी पंतप्रधान मोदी 'डोनाल्ड ट्रम्प यांना घाबरतात' असे विधान केले होते. या आरोपांवर अमेरिकेची पॉप गायिका मेरी मिलबेन यांनी जोरदार प्रतिक्रिया दिली आहे. राहुल गांधींनी राजकीय मर्यादा कधीच ओलांडल्याचे दिसून येते, याचे दर्शन वेळोवेळी संसदेतील त्यांच्या वागणुकीतूनही घडते. मध्यंतरी, मध्य प्रदेशातील भोपाळ येथे काँग्रेस कार्यकर्त्यांना संबोधित करताना राहुल गांधींनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदींना 'लोक डंडे मारतील' अशा प्रकारचे राहुल गांधींचे उदगार लोकांना आवडले नाहीत. विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधींनी देशात अराजकता पसरवणाऱ्या शक्तींविरुद्ध कठोर भूमिका घेऊन आवाज उठवणे आवश्यक आहे, परंतु त्याऐवजी ते मुस्लिम तुष्टीकरणाचे राजकारण करत सत्ता कशी हस्तगत करता येईल, यातच गुंतले असल्याचे दिसते.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
संवाद
वाचकांनी आपल्या प्रतिक्रीया, मत-मतांतरे ९८२२६६४०६७ क्रमांकावर पाठवा.

## प्रदूषणकारी फटाके

वाढते प्रदूषण आणि हवामानातील बदल लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने यंदा केवळ हरित फटाके फोडण्यास अनुमती दिली आहे. असे असले तरी मोठ्या आवाजाचे आणि धुराचे प्रदूषणकारी फटाके दिवाळीच्या आधीपासून सर्रासपणे विकले जात आहेत. फटाके फोडण्यासाठी न्यायालयाने प्रतिवर्षाप्रमाणे याही वेळेस वेळेची मर्यादा आखून दिली आहे; मात्र ती कुठेच पाळली जात नाही हेही तितकेच खरे आहे. फटाक्यांमुळे प्रदूषणात वाढ होऊन केवळ माणसाच्याच नव्हे तर पक्षी आणि प्राण्यांच्या आरोग्याचीही अपरिमित हानी होते. फटाके फोडणे म्हणजे केवळ धनाचाच अपव्यय नव्हे, तर फटाक्यांमुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात जैविक आणि वित्तीय हानी होत असते. क्षणिक सुखाव्यतिरिक्त कोणतेही लाभ नसणारी फटाके फोडण्याची प्रथा ही मुळात भारतीय संस्कृतीचाच भाग नाही. दिवाळी आणि फटाके फोडणे यांचा तर तिळमात्र संबंध नाही. मग या विषवल्लीच्या छोट्या छोट्या फांद्या छाटण्यात वेळ घालवण्यापेक्षा प्रदूषणकारी फटाक्यांवर बंदी आणून मुळावरच का घाव घातला जात नाही ?

**मोक्षदा घाणेकर**

## ऊस दराची कोंडी कोण फोडणार?

संपूर्ण ऊस उत्पादकांसह साखर नुकताच शेतकरी संघटनेचे संस्थापक, माजी खासदार राजू शेट्टींची जयसिंगपूर येथे २४ वी ऊस परिषद संपन्न झाली.यावेळी त्यांनी मागील वर्षी तुटलेल्या उसाला २०० आणि यंदाच्या हंगामात ३७५१ रुपये विनाकपात एकरकमी दर मिळावा म्हणून रणशिंग फुंकले आहे.त्यामुळे यंदाच्या हंगामातील ऊस दराची कोंडी कोण फोडणारं? असा सवाल उपस्थित होतो.१० नोव्हेंबर पर्यंत ऊस दराचा निर्णय न झाल्यास ११ पासून शेतकरी ऊसाचा बुडका हातात घेवून रस्त्यांवर उतरेल अशी गर्जना केली आहे. त्यामुळे साखर कारखानदार काय भूमिका घेतात याकडे संपूर्ण ऊस उत्पादकांसह साखर उद्योगाचे लक्ष लागून राहिले आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार साखर उद्योगात दुर्लक्ष करू लागल्याने साखरेसह उपपदार्थाबाबत चुकीचे निर्णय होवू लागले आहेत.जागतिक बाजारपेठेत साखर आणि इथेनॉलला मागणी मोठी असून गॅस व वीज निर्मितीतून मोठ्या प्रमाणात रक्कम मिळते.

**राजू जाधव**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मध्यवर्ती सहकारी बँकेतील गोरखधंदे तात्काळ रोखा

## हजारो शेतकऱ्यांच्या कोट्यावधीच्या लुटीवर किशोर तिवारी यांची आरबीआई, सीबीआय, सहकार सचिव यांचेकडे पुराव्यासह याचिका

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील आर्थिक गैरव्यवहार, SLR डिफॉल्ट आणि 53 टक्क्यांपेक्षा जास्त एनपीए असलेल्या या बँकेने आता पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर नोकर भरती प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र या भरतीसाठी तब्बल 35 ते 50 लाख रुपये मागण्यात येत आहे. या संदर्भात गंभीर तक्रारींचे शपथपत्र व सर्व दस्तावेज मिळाल्यानंतर या अभूतपूर्व भ्रष्टाचार प्रकरणात सहकार विभाग व जिल्हा प्रशासन यांच्या संगममताने अनियंत्रितपणे सुरु असलेल्या भ्रष्टाचार प्रकरणी शेतकऱ्यांचे मागील ४० वर्षापासुन हितासाठी लढा देणारे किशोर तिवारी यांनी आरबीआई सीबीआय सहकार सचिव यांचेकडे शपथपत्रावर कायदेशीर याचीका दिनांक १५ व १६ ऑक्टोबरला अधिकृतपणे दाखल करून कारवाईची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी स्व वसंतराव नाईक व स्वर्गीय उत्तमराव पाटील यांनी यवतमाळची मध्यवर्ती सहकारी बँक महाराष्ट्रात शिखरावर ठेवली होती. ३० सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बँकेने सादर केलेल्या अहवालानुसार, बँकेचे NPA प्रमाण ५४ टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचे बँकेने अधिकृतपणे सादर केले आहेत त्यातच भरतीसाठी ठरविलेल्या नियमांनुसार बँकेचा NPA दर १५ टक्क्यांपेक्षा जास्त नसावा, अशी स्पष्ट अट असताना बँकेने ही मर्यादा मोडली असून, अशा परिस्थितीत भरती प्रक्रिया सुरू करणे हे बँक नियमानुसार बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट होत आहे व हा प्रकार भाजपच्या राज्यात सुरु असुन याला स्वर्गीय उत्तमराव पाटील यांचे सुपूत्र मस्तवाल भ्रष्ट निकामी अध्यक्ष मनीष पाटील व अलिबाबाची ४० संचालकांची टीम जबाबदार आहे असे या याचिकेत किशोर तिवारी यांनी शपथपत्रावर म्हटले आहे. आपल्या याचिकेत मागील काही वर्षांत या बँकेत झालेल्या भरतींपैकी ९५ टक्के भरती बोगस झाल्याचे उघड झाले आहे. २०२०-२१ सालीही एका खाजगी कंपनीमार्फत झालेली भरती नंतर वादग्रस्त ठरली होती. आश्चर्य म्हणजे याच वादग्रस्त कंपनीलाच पुन्हा २०२५ साली भरतीसाठी कंत्राट



देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पुन्हा मोठ्या रकमेची मागणी होत असल्याने भरतीत मोठा आर्थिक घोटाळा होत असल्याचे म्हटले आहे. शिपाई पदासाठी सुमारे ३५ लाख, तर लिपिक पदासाठी ५० लाख मागितले जात असल्याचे आरोप समोर आले आहेत. गावागावात फिरणारे काही दलाल बेरोजगार तरुणांना नोकरी मिळवून देण्याच्या आमिषाने आपल्या जाळ्यात ओढत आहेत. अनेक शेतकरी आपली शेती गहाण ठेवून किंवा विकून मुलांना नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत, ही परिस्थिती अत्यंत विनाशकारी आणि शोषण करणारी असल्याचे तिवारी यांनी म्हटले आहे. गेल्या दोन वर्षांत बँकेकडून SLR डिफॉल्ट झाल्याने RBI ने मोठा दंड लावला होता. हा दंड संबंधित अधिकाऱ्यांकडून न वसूल करता शेतकऱ्यांच्या ठेवीतून भरल्याचा धक्कादायक आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार म्हणजे ठेवीदारांवर अन्याय असून, दोषी अधिकारी व संचालकांकडूनच ही रक्कम वसूल करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. बँकेचे वैधानिक लेखापरीक्षण चंद्रपूर येथील वादग्रस्त सीए फर्मकडून करण्यात येते. हीच संस्था गेल्या काही वर्षांपासून संचालक मंडळाच्या म्हणण्यानुसार लेखापरीक्षण करत असल्याचा आरोप आहे. आश्चर्य म्हणजे २०२५-२६ या वर्षासाठीही त्याच लेखापरीक्षकांची फेरनिवड करण्यात आली, ज्यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बोगस कर्ज वितरण आणि अपहार प्रकरणे मोठ्या प्रमाणात घडले आहे. बँकेकडून दिलेल्या तारकुंपण कर्जांपैकी ९५ टक्के कर्जे बोगस असल्याचे स्पष्ट झाले असूनही, दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच पुसद येथील विभागीय कार्यालयात झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या अपहार प्रकरणात ठोस कारवाई झालेली नाही. या सर्व प्रकरणांवर शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी थेट आरबीआई सीबीआय सहकार सचिव यांचेकडे तक्रार दाखल केली असून, बँकेतील घोटाळ्याची संपूर्ण चौकशी करून दोषी संचालकांना गजाआड टाकण्याची मागणी त्यांनी केली आहे. ही बँक आर्थिकदृष्ट्या डबघाईस आलेली असून, ती कधीही बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या काही वर्षात संचालकांनी या ठिकाणी कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केला आहे. वर्धा येथील सहकारी बँक अशीच बंद पडली. ही बँक बंद पडल्यास शेतकऱ्यांना प्रचंड अडचणीचा सामना करावा लागेल यासाठी हा प्रामाणिक प्रयन्त असुन या लढ्यात आमदार बाळासाहेब मांगुळकर, काँग्रेस नेते संतोष बोरले, बॅरीस्टर विनोद तिवारी यांच्या यापुर्वी सादर तक्रारींचा संच व बँकेने उच्च न्यायालयात सादर केलेल्या खोट्या शपथपत्राची जोड आपल्या याचिकेत केल्याची माहीती किशोर तिवारी यांनी केली आहे.

# नॅचरल शुगर कारखान्याचे ८ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - गुंज नॅशनल शुगर अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड युनिट नंबर २ च्या १० व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदिपन समारंभ मागील गळीत हंगामात सर्वाधिक ऊस तोडणी वाहतूक करणारे कंत्राटदार श्री सुनील तुकाराम पवार व त्यांच्या सुविध पत्नी सौ मलाताई व श्री सुनील पवार यांचे शुभ हस्ते व माननीय श्री अनिल ढोंबरे संचालक नॅचरल शुगर यांचे अध्यक्षतेखाली आणि माननीय श्री संभाजीराव रेड्डी संचालक व माननीय श्री डॉक्टर सर्जेराव साळुंके प्रवर्तक यांचे उपस्थितीत धनत्रयोदशी चे मुहूर्तावर शनिवारी दिनांक १८/ १०/२०२५ रोजी दुपारी तीन वाजता संपन्न झाला.

यावेळी श्री अनिल ढोंबरे म्हणाले की आपल्या सर्वांच्या सहकार्याने गेल्या वर्षी नॅचरल, शुगरने विदर्भातील उच्चांकि पाच लाख बत्तीस हजार मॅट्रिक टन उसाचे करून ११.४१ टक्के उच्च अंकी साखर उतारा मिळविला आहे. मागील वर्षी गाळपास आलेल्या उसाला नॅचरल शुगर ने विदर्भातील सर्वाधिक प्रति टन रुपये २८०० प्रमाणे ऊस दर शेतकऱ्यांना अदा केला आहे. यावर्षी शेतकऱ्यांनी कारखान्याकडे एकूण 9300 हेक्टरच्या



ऊस नोंदी केलेल्या असून एकूण आठ लाख मेट्रिक टन गळापाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. उद्दिष्ट प्रमाणे नोंदीचा संपूर्ण ऊस दिनांक 31 मार्च 2026 पर्यंत गाळप करण्याचे नियोजन केले आहे. कारखान्याने गेले वर्षीपासून गाळप क्षमतेत प्रतिदिन पाच हजार मीटर प्रमाणे वाढ केलेली आहे. कारखान्याने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सक्षम तोडणी व वाहतूक यंत्रणा भरणा केली असून दररोज किमान 5500 मीटर उसाचे गाळप होणार आहे. कारखान्याचा येत्या गळीत हंगाम शुभारंभ शासनाचे धोरणाप्रमाणे दिनांक एक नोव्हेंबर चे दरम्यान करण्याचे निश्चित आहे. कारखान्याची गाळप क्षमता वाढल्यामुळे यापुढे कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ऊसाची लागवड करावी यासाठी कारखान्याने शेतकऱ्यांना सुधारित ऊस जातीची प्रमाणित ऊस रोपे आणि नॅचरल ऑर्गानिक फर्टीलायझर सेंद्रिय खत सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले आहे. तसेच दिवाळी सणानिमित्त कारखान्याचे कर्मचाऱ्यांना सुद्धा सर्वाधिक 25 टक्के बोनस व बक्षीस म्हणून दिल्याचे यावेळी श्री ढोंबरे यांनी सांगितले. याप्रसंगी कारखाना परिसरातील मान्यवर सर्वश्री शिवाजीराव देशमुख, माझी प.स.सदस्य साहेबराव पाटील कदम, माझी संचालक, विशाल पवार, अध्यक्ष खरेदी विक्री संघ, शेषराव पाटील खंदारे माजी उपाध्यक्ष बाबासाहेब नाईक सहकारी सूतगिरणी, सिताराम पाटील ठाकरे माजी संचालक, गोविंदराव शिंदे वेणी, तातेराव गावंडे, उटी, तानाजी जाधव गुंज, विठ्ठलराव गावंडे सवना, बाळासाहेब येणकर, बाळासाहेब खंदारे तसेच कारखाना परिसरातील शेतकरी कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतक-यांची दिवाळी अंधारात..! सरकारच्या आश्वासनांचा दिवा विझला!

## अतिवृष्टीने उद्ध्वस्त शेती, अपुऱ्या मदतीमुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर निराशेचे सावट

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - पांढऱ्या सोन्याचा जिल्हा म्हणून ओळख असलेला यवतमाळ जिल्हा आज निराशेच्या छायेत बुडालेला दिसतोय. अतिवृष्टीमुळे कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, सरकारने दिलेली मदतीची आश्वासने फोल ठरल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अक्षरशः अंधारात गेली आहे.




दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा करण्याचे सरकारचे आश्वासन होते. मात्र दिवाळीच्या उंबरठ्यावरसुद्धा ती मदत अनेकांच्या खात्यात जमा झालेली नाही. बाजारपेठेत सणाचा उत्साह दिसत असला, तरी शेतकऱ्यांच्या घरात मात्र अंधाराचे साम्राज्य आहे. "नुकसान लाखोत, मदत हजारात" शेतकऱ्यांची नाराजी व्यक्त केली जात आहे.जिल्ह्यातील सुमारे पाच लाख हेक्टरवरील शेतीचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सरकारने हेक्टरी १८ हजार रुपयांची मदत जाहीर केली असली तरी प्रत्यक्षात अनेकांना केवळ चार ते पाच हजार रुपयांपर्यंतचीच मदत मिळाली आहे. आर्णी तालुक्यातील सुकळी येथील एका शेतकऱ्याच्या खात्यात फक्त साडेचार हजार रुपये जमा झाल्याने संतप्त शेतकऱ्याने ती रक्कम तहसीलदारांना परत केली. "या मदतीपेक्षा ही परत करणंच योग्य," अशी भावना त्याने व्यक्त केली. सोयाबीनच्या भावात घसरण, तोटा दुपटीने वाढला असून सोयाबीन उत्पादन यंदा अतिवृष्टीमुळे कमी आले असून, मिळकतीपेक्षा खर्च अधिक झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

सध्या बाजारात सोयाबीनचे दर २८०० ते ३५०० रुपये प्रति क्विंटल इतके असून, मागील वर्षीपेक्षा जवळपास १५०० ते २००० रुपयांनी कमी आहेत. व्यापाऱ्यांकडून कमी भावात खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांचे कर्ज फेडणे, दिवाळीसाठी घरात थोडंफार सामान आणणे सुद्धा अवघड झाले आहे. शेतकऱ्यांच्या तोंडी एकच प्रश्न दिवाळी साजरी करायची तरी कशी? तीन एकर शेती असलेल्या एका शेतकऱ्याने सांगितले की"अतिवृष्टीमुळे शेती पाण्याखाली गेली. फक्त चार क्विंटल सोयाबीन मिळाले. बाजारात नेलं तर २८०० रुपये भाव. लागवड खर्च ३६ हजार, आणि मिळकत १५ हजार. उरलं काय? सरकारकडून ना योग्य मदत, ना भाव. ही दिवाळी आमच्यासाठी काळी ठरली आहे." शेतकऱ्यांचा आर्त टाहो 'ही दिवाळी सरकारने काळी दिवाळी घोषित करावी' एकीकडे शहरांमध्ये रोषणाई आणि बाजारपेठांतील गर्दीने दिवाळीचा उत्साह वाढला आहे, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या घरातील चूल विझली आहे.

सरकारच्या पोकळ घोषणांनी शेतकऱ्यांच्या मनातील आशेचा दिवा मालवला आहे. "आमचं पीक गेलं, भाव नाही, मदत नाही... तरी दिवाळी साजरी करायची कशी?" असा आर्त प्रश्न आता ग्रामीण भागातून राज्य शासनाला शेतकऱ्यांकडून केल्या जात आहे.

# यवतमाळ येथे 'श्यामा' हिंदी हॉरर फिल्मचे ऑडिशन संपन्न



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : पराते सांगळे फिल्म प्रस्तुत 'श्यामा' या हिंदी हॉरर चित्रपटासाठी यवतमाळ येथे भव्य ऑडिशनचे आयोजन करण्यात आले. या ऑडिशन कार्यक्रमाला स्थानिक तसेच विदर्भातील कलावंतांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या प्रसंगी अभिनेत्री शाम राज व अभिनेता सिकंदर खान (मुंबई) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच मंचावर गोपाळ ढोमणे, प्रशांत गोळे, चारुलता पावसेकर, इंजि. अरुण सांगळे, निलेश पराते, कोमल पराते, दशरथ मडावी, काशिनाथ लाहोरे, अविश बनसोड, प्रतिभा पवार आणि सरला इंगळे या मान्यवर पाहुण्यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या शुभहस्ते नटराज व गणेश प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. ऑडिशनसाठी यवतमाळ जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील अनेक कलावंतांनी सहभाग नोंदवला.

या चित्रपटाचे दिग्दर्शक निलेश पराते असून प्रोड्यूसर इंजि. अरुण सांगळे आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजि. प्रतिभा पवार आणि श्री. अंगाइतकर यांनी उत्कृष्टरीत्या केले. 'श्यामा' या हिंदी हॉरर चित्रपटाच्या ऑडिशनमध्ये कलाकारांनी आपल्या अभिनयातून उत्तम कौशल्य सादर केले. यवतमाळसह संपूर्ण विदर्भातील कलाकारांनी या संधीला दिलेला प्रतिसाद उल्लेखनीय ठरला असून लवकरच या चित्रपटाचे शूटिंग सुरू होणार आहे.

# सुरुंग हा काव्यसंग्रह साहित्य विश्वात माईल स्टोन ठरेल : प्रो. डॉ. अनिल काळबांडे

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : वयाच्या ऐंशी वर्षाच्या वयात जिवनाचे विविध पैलू वर आलेले सुख दुःखाचे अनुभव ज्या भावनेसह ' हरीश कुमार भवरे यांनी सुरंग ' काव्यसंग्रहात लिहिले ते फुले शाहू आंबेडकरी वैचारिक मंथन असून आधुनिक मराठी साहित्य हा काव्यसंग्रह माईल स्टोन ठरेल व नविन पीठीला मागदर्शक ठरेल असे प्रतिपादन जागतीक साहित्यिक प्रो डॉ अनिल काळबांडे यांनी केले. रविवार दिनांक १२नोव्हेंबर ना २०२५ला स्मृतीशेष वेणूताई हरिशकुमार भवरे यांच्या प्रथम स्मृतिदिनाचे औचित्य साधून अक्षर साहित्य व कला अकादमी यवतमाळ च्या वतीने येथील शिव महाविद्यालयाच्या प्रशस्त दालनात




सुरुंग या काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न झाले. या प्रकाशन प्रसंगी काव्यसंग्रहाचे प्रमुख भाष्यकार म्हणून ते बोलत होते.


पुढे बोलताना ते म्हणाले की, कवी हरीश कुमार भवरे यांनी वयाच्या ८१ व्या वर्षी कवितासंग्रह प्रकाशित करावा ही फारच भूषणावह बाब आहे. भवरे सरांची कविता अनुभवाने संपन्न आहे ती चपलखपणे तत्त्वज्ञान सांगून जाते. आंबेडकरी चळवळीचा चढ उतार पाहिलेल्या कवीने या काव्यसंग्रहाद्वारे लोक जागृती करण्याचे मौलिक काम होणार असल्याची भावना डॉ काळबांडे यांनी व्यक्त केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रा अंकूश वाकडेयांनी या कवितेवर सखोल भाष्य केले. मराठी साहित्यात समकालीन कवितेमध्ये भवरे सरांची कविता वेगळे आयाम घेऊन आली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. दिलीप घावडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शीव महाविद्यालयाचे प्राचार्य चंदन काळे यांच्याहस्ते कविता संग्रहाचे प्रकाशन झाले तर अध्यक्ष स्थानी इंजि. मनोहर शहारे होते. या संग्रहाची निर्मिती हेमंतकुमार कांबळे यांच्या श्रावस्ती प्रकाशन संस्थेने केली. या कार्यक्रमाचे संचालन युवा कार्यकर्ते सुरज खोब्रागडे यांनी तर आभार प्रदर्शन सुनील खरतडे यांनी केले.

# दिवाळी आली तरी 'आनंदाचा शिधा' गायब : जनतेत नाराजी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा : दरवर्षीप्रमाणे दिवाळीच्या आगमनानिमित्त गरजू व अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांना दिला जाणारा 'आनंदाचा शिधा' या वर्षी अद्यापही वाटप झालेला नाही. परिणामी गरीब कुटुंबांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिवाळी हा आनंद,ऐक्य आणि वाटण्याचा सण. पण या वर्षी अनेकांना प्रश्न पडला आहे, "आनंदाचा शिधा साहेब कुठे गेला?" दरवर्षी स्थानिक प्रशासन, पंचायत समित्या, जिल्हा परिषद तसेच काही स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना तांदूळ, गहू, तेल, साखर, रवा,मसाले अशा जीवनावश्यक वस्तूंचा शिधा दिला जातो. या उपक्रमामुळे दिवाळीच्या काळात आर्थिकदृष्ट्या कमजोर कुटुंबांनाही सण साजरा करता येतो. मात्र, यंदा या वाटपाची कुठलीही हालचाल प्रशासनाच्या स्तरावर दिसून आली नाही.




स्थानिक नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेत सांगितले की, "गेल्या दोन–तीन वर्षांत 'आनंदाचा शिधा' योजनेमुळे हजारो कुटुंबांना आधार मिळाला होता. पण या वर्षी अचानक वाटप बंद झाल्याने निराशा पसरली आहे. दिवाळी जवळ आली असूनही प्रशासन गप्प आहे. योजनेचा निधी आला का नाही, हे सुद्धा कुणालाच माहित नाही." काही सामाजिक कार्यकर्त्यांनी सांगितले की, या वर्षी निवडणूक कोड, निधी वितरणातील अडचणी आणि प्रशासनातील बदल यामुळे योजना थांबली असावी. परंतु, सणाच्या काळात सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळावा म्हणून प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. दरम्यान, नागरिकांनी शासन व प्रशासनाला आवाहन केले आहे की, "आनंदाचा शिधा" हा फक्त अन्नधान्याचा नव्हे, तर आनंद वाटण्याचा उपक्रम आहे, तो कायम ठेवावा.

# महिला उद्योजकता व कौशल्य उन्नतीसाठी भव्य उपक्रम, शिलाई मशीन व एम्ब्रॉयडरी टूलकिट चे वाटप

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि स्थानिक हस्तकला व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी, एमआयडीसी बंजारा आर्ट्स फाऊंडेशन यवतमाळ येथे एक महत्त्वपूर्ण उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाचे प्रायोजक हस्तशिल्प विकास कार्यालय, नागपूर, यांच्या सौजन्याने व स्नेहदीप बहुउद्देशीय संस्थे अंतर्गत, ५० महिलांना शिलाई मशीनचे वितरण करण्यात आले.


या उपक्रमाचा उद्देश महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, तसेच त्यांचे कौशल्य वाढवणे हा आहे. हा कार्यक्रम केंद्र शासनाच्या हस्तशिल्प विभागाच्या महिला उद्योजकता व कौशल्य उन्नती



कार्यक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात आला होता. या विशेष प्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थान माजी प्राचार्य डॉ. लक्ष्मण उत्तरवार यांनी भूषवले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून हस्तशिल्प विकास कार्यालय, नागपूर येथील अससिस्टन्स डायरेक्टर श्री. अवधेश ठाकूर साहेब उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शन आणि सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला. राजेश जाधव यांची उपस्थिति मोलाची ठरली. या कार्यक्रमास यवतमाळ ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. सुनील नाईक साहेब विशेष अतिथी म्हणुन लाभले. तसेच प्राध्यापक डॉ. ओंकार सर आदर्श महाविद्यालय धामणगांव हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री. यश उत्तरवार यांच्या प्रभावी प्रास्ताविकाने झाली. त्यांनी उपस्थितांना कार्यक्रमाचे उद्दिष्ट याची माहिती दिली व हस्तशिल्प क्षेत्रातील संधींबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. आकाश राठोड यांनी केले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांना आधुनिक शिलाई मशीन व एम्ब्रॉयडरी टूलकिट वाटप करण्यात आले. या मशीनद्वारे त्या महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळणार असून, स्थानिक बाजारपेठेत शिवणकाम, फॅशन डिझाईन, हातकागद वस्त्रनिर्मिती यासारख्या क्षेत्रांत आपला ठसा उमठविता येईल. हा उपक्रम ग्रामीण व निमशहरी भागातील महिलांमध्ये आत्मनिर्भरता जागवणारा असून, भविष्यात अधिक महिलांपर्यंत असे उपक्रम पोहोचावेत अशी अपेक्षा मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हस्तशिल्प विकास कार्यालय, नागपूर, व स्नेहदीप संस्था यांनी आयोजन केले.

# अब्दुल गफूर शाह नगर परिषद उर्दू उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेत बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न



**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - येथील अ गफुर शाह न प उर्दु उच्च प्राथ व माध्यमीक शाळा क्रमांक २, ताजपुरावार्ड, या शाळेमध्ये "रंगोत्सव सेलिब्रेशन" स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. रंगोत्सव सेलिब्रेशन ही एक राष्ट्रीय स्तरावरची स्पर्धा आहे. यामध्ये विविध प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जातात जसे-- रंगभरण ,हस्ताक्षर, कोलाज, स्केचिंग, टॅटू इ.अशा विविध स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव दिला जातो. यामध्ये सदर शाळेचे 578 विद्यार्थी सहभागी झाले होते यामधून 143 विद्यार्थ्यांनी मेडल मिळविले आहे. (गोल्ड ,सिल्वर ,ब्रांन्झमेडल) काही विद्यार्थ्यांना ट्रॉफी, कलरिंग संच, सरप्राईज गिफ्ट प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीला स्केट स्कूटर , ट्रॉफी मिळाली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते मझहरउल्ला खान व प्रमुख पाहुणे म्हणून अमानउल्ला जागीरदार ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य समीर अहेमद सर व नगरपरिषद उमरखेडचे उपमुख्यधिकारी तथा प्रशासन अधिकारी श्री नितीन चव्हाण अग्निबाण लाईव्ह न्युज चैनल चे संपादक डॉ आंबेजोगाईकर जलील सर तसेच सेवानिवृत्त शिक्षक व मुख्याध्यापकांना आमंत्रित केले होते यामध्ये याकूब सर इमाम सर बशीर सर रशीद सर व शिक्षण तज्ञ हाजी मतीन अहमद सर्वांनी उपस्थित राहून बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे कोडकौतूक केलेव व पुढील कार्यासाठी शुभेच्छां दिल्या.

## वेचक

### राज्यमंत्री इंद्रनील नाईक आता गोंदियाचे पालकमंत्री



यवतमाळ : उद्योग, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 17 ऑक्टोबर रोजी याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. त्यानुसार प्रशासकीय कारणास्तव पालकमंत्र्यांच्या नियुक्त्यांमध्ये अंशतः बदल करण्यात आला आहे. राज्यमंत्री श्री. नाईक यांच्याकडे उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण आदी खात्यांच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी आहे. नवीन निर्णयानुसार त्यांना गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यापूर्वी मंत्री बाबासाहेब मोहनराव पाटील हे गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री होते. सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अ. रा. रेडेकर यांच्या स्वाक्षरीने शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे.

### हक्काच्या पट्ट्यांसाठी आमरण उपोषण करणारे सामाजिक कार्यकर्ते चंदन हातागडे यांनी घेतले उपोषण मागे

यवतमाळ : हक्काच्या पट्ट्यांच्या मागणीसाठी आमरण उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते चंदन हातागडे यांनी आज आपले उपोषण मागे घेतले आहे. नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी तीन महिन्यांच्या आत सर्व पात्र नागरिकांना हक्काचे पट्टे देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर त्यांनी उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला. यावेळी नगरपरिषदचे अधिकारी, चंदन हातागडे यांचे सहकारी व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक न्यायाच्या लढ्यात शांततामय मार्गाने आपला आवाज उठवणाऱ्या हाताकडे यांनी शेवटपर्यंत ठामपणे भूमिका मांडली होती. नगरपालिकेकडून मिळालेल्या आश्वासनामुळे परिसरातील जनतेमध्येही समाधानाचे वातावरण आहे. चंदन हातागडे यांनी सांगितले की, "जनतेचा हक्क मिळवण्यासाठी लढा सुरूच राहील, आणि दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन केले जाईल." या घटनेमुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने दिलेल्या वचनांची वेळेत पूर्तता व्हावी अशी सर्वांची अपेक्षा आहे.

### उमरखेडच्या सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळाला 'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत द्वितीय पारितोषिक

उमरखेड - यवतमाळ जिल्हा पोलीस दल आयोजित 'ऑपरेशन प्रस्थान – आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळ स्पर्धा २०२५' या उपक्रमांतर्गत उमरखेड येथील सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळाने उत्कृष्ट सामाजिक उपक्रम, शिस्तबद्ध आयोजन आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक केल्याबद्दल द्वितीय पारितोषिक पटकावले आहे. या पुरस्कारात मंडळाला ₹१,०००/- रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. गुरुवार, दिनांक १६ ऑक्टोबर रोजी यवतमाळ येथे पार पडलेल्या या सन्मान सोहळ्याला जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, तसेच उमरखेडचे पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम स्थळी मंडळाच्यावतीने मनोज पांडे, अर्चना लिगदे, प्रणव एकबोटे, मनिषा काळेश्वरकर, शुभदा देशपांडे हे सदस्य उपस्थित होते. मंडळाची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे. अध्यक्ष : प्रणव एकबोटे, उपाध्यक्ष : संतोष गावंडे, अर्चना लिगदे, पुंडलिक कुबडे, कार्याध्यक्ष : योगेश बोकन, सचिव : शुभम अयाचित, सहसचिव : मंगल पांडे, कोषाध्यक्ष : मनोज पांडे, सहकोषाध्यक्ष : गणेश शिंदे, सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळ गेल्या चार दशकापासून लोकोपयोगी उपक्रम, सामाजिक जनजागृती आणि साधेपणाने उत्सव साजरा करण्याची परंपरा जपत आहे. यावर्षी ज्ञानेश्वरी ग्रंथाला ७५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मंडळाने ज्ञानेश्वर माऊलीचा देखावा साकारला होता. वारकरी वेषातील टाळ-मृदंग मिरवणुकीने उत्सवाला भक्तिमय आणि संस्कारपूर्ण रूप दिले. या उपक्रमातून समाजात शिस्त, स्वच्छता आणि सामंजस्याचा संदेश दिल्याबद्दल पोलीस प्रशासनाने मंडळाचा गौरव केला. मंडळाच्या या यशाबद्दल उमरखेड शहरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### सरपंच संघटना मोर्शी तालुक्याची महिला आघाडी कार्यकारिणी गठीत



**अंजनगाव बारी-** तालुक्यातील सरपंचांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला मार्गदर्शन करण्यासाठी सरपंच संघटनेची जिल्हाध्यक्ष मोहम्मद गुलाब नबी इंगलेकर तसेच महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रक्षणा सरदार तसेच जिल्हा कार्याध्यक्ष सुनील डहाके उपस्थित होते.या बैठकीमध्ये लेहगाव येथील उपसरपंच रेर्खा वासनिक यांना मोर्शी तालुकाध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले,जयश्री वानखडे सरपंच मंगरूळ, कल्पना चरपे सरपंच विष्णोरा, रंजना भुयार यांना उपाध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले. तर सचिव म्हणून ज्योत्स्ना वानखडे यांची नियुक्ती करण्यात आली. नियुक्तीपत्र हे महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रक्षणा संघपाल सरदार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले तसेच यावेळी मार्गदर्शन सुद्धा करण्यात आले.बैठकीला मोर्शी तालुक्यातील अनेक गावचे सरपंच तथा उपसरपंच व सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन लेहगावच्या उपसरपंच रेखा वासनिक यांनी तर आभार प्रदर्शन कार्याध्यक्ष सुनील डहाके यांनी केले.

### विद्यादिप स्पेशल स्कूल व नूतन मूक-बधिर विद्यालयात शालेय नामवाचन सोहळा




**अमरावती-** स्थानिक मंदबुद्धी व शारीरिक अपंग विकास संस्था यांच्या वतीने संचालित विद्यादिप स्पेशल स्कूल आणि नूतन मूक-बधिर विद्यालय, इंदला फाटा, मार्डा रोड, अमरावती येथे आज महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या प्रमुख उपस्थितीत शालेय नामवाचन सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष प्रा. संजय गुडधे, संस्था सचिव अभिजित देशमुख, कार्याध्यक्ष अजिंक्य गुडधे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पुंड, कर्नल गाडे, विजय कान्हेकर, तसेच विद्यादिप विद्यालयाचे मुख्याध्यापक जितेंद्र ढोले आणि नूतन मूक-बधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन तामस्कर सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या दिवाळी ग्रिटींग, पुष्पगुच्छ व आकाशकंदील देऊन मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर मुख्याध्यापक जितेंद्र ढोले यांनी उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. आपल्या मनोगतात आयुक्त चांडक यांनी दोन्ही शाळांचे आणि विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान कर्नल गाडे यांनी संस्थेला २५,००० रुपयांचा धनादेश देणगी स्वरूपात प्रदान करून उदार मदत केली. अध्यक्ष प्रा. संजय गुडधे यांनी अध्यक्षीय भाषणातून शाळेच्या प्रगतीसाठी समाजातील दानशूर व्यक्तींच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.या कार्यक्रमात दोन्ही शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षिका दुधे यांनी केले, तर व्दिभाषिकाचे कार्य तिवारी यांनी पार पाडले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार प्रदर्शन नूतन मूक-बधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन तामस्कर यांनी मानले.

## आचार्य कक्षाच्या कार्यवाहीतील अनियमिततेबाबत

# अ.भा.राष्ट्रीय शैक्षिक महासंघाची मा. प्र-कुलगुरु यांच्या कार्यालयात धडक

### चुकीच्या शुल्क आकारणी बाबत आंदोलनाची भूमिका घेणार-शैक्षिक महासंघ

**अमरावती/का.प्र.**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आचार्य कक्षाच्या कार्यवाहीत सातत्याने होत असलेल्या अनियमिततेविषयी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विभागीय संघटनेतर्फे मा. प्र-कुलगुरु डॉ. महेंद्रजी ढोरे यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात रेग्युलेशन २०२२ अंतर्गत अपेक्षित प्रक्रियांना अनुसरून पारदर्शक, सुसंगत व संशोधक-हितकारक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महासंघाच्या विभागीय अध्यक्षा प्राचार्य डॉ. मीनल भोंडे आणि विभागीय महामंत्री प्रा. डॉ. मंगेश अडगोकर यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या या निवेदनात विद्यापीठाच्या निदेश क्रमांक ४१/२०२५ आणि अधिसूचना क्रमांक १५७/२०२४ च्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी असल्याचे नमूद करण्यात आले



आहे.रेग्युलेशन २०२२ नुसार मूल्यमापन प्रक्रिया न करणे, संशोधन केंद्र मान्यता शुल्कातील विसंगती,प्लॅगरिझम तपासणीतील तांत्रिक त्रुटी,रिव्ह्यूपेपर संदर्भातील अट,प्रबंध सादरीकरणासाठी मुदतवाढ,संशोधन केंद्र मान्यता प्रक्रिया, प्राध्यापकांच्या संधींबाबत महासंघाची भूमिका आदाविषयी बैठकीदरम्यान चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान महासंघाने काही प्राध्यापकांच्या प्लेसमेंट आणि समित्यांवर वारंवार नियुक्त्या होत असून इतर पात्र प्राध्यापकांना संधी मिळत नसल्याची तक्रार केली. यावर प्र-कुलगुरूंनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे सांगितले. महासंघाने प्र-कुलगुरू डॉ. महेंद्रजी ढोरे यांचे आभार मानले आणि सर्व मुद्द्यांवरील सकारात्मक दृष्टीकोनासाठी विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन केले. यावेळी महासंघाच्या शिष्टमंडळात महासंघाचे विभागीय महामंत्री डॉ. मंगेश अडगोकर, विभागीय कोषाध्यक्ष डॉ. दिनेश खेडकर, अमरावती शहर महामंत्री डॉ. अरुण हरणे, शैक्षिक प्रकोष्ठ प्रमुख डॉ. हेमंत चांडक, अमरावती जिल्हा (ग्रामीण) महिला प्रमुख डॉ. निलिमा अंबाडकर, यांच्यासह डॉ. सुमेरसिंग ठाकूर, प्राचार्य डॉ. उदय मांजरे, डॉ. वामन जवंजाळ, प्रा. डॉ. किशोर पूरी आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात परिचय प्रशिक्षण कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**
स्थानिक श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात बी.एड. प्रशिक्षणार्थींकरिता सहा दिवसीय परिचय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन हेमंतराव काळमेघ (कार्यकारणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय राऊत होते. यावेळी समन्वयक ग्रंथपाल डॉ. माधुरी देशमुख, प्रा. डॉ. वनिता काळे आणि डॉ. अंजली ठाकरे विचारमंचावर उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी हेमंतराव काळमेघ यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षक घडविण्याची आवश्यकता मांडली. 'आजचा शिक्षक तंत्रज्ञान साक्षर, सकारात्मक विचारसरणीचा आणि आरोग्यदायी जीवनशैली असलेला असावा,असे ते म्हणाले. उद्घाटन सत्राचे



प्रास्ताविक डॉ. अंजली ठाकरे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. माधुरी देशमुख आणि आभार प्रदर्शन डॉ. वनिता काळे यांनी केले. कार्यक्रमातील विविध पुष्पांमध्ये नामवंत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. पर्यावरण व स्पर्धा परीक्षा पांडुरंग व-हाडे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करत स्पर्धा परीक्षेच्या तयारीसंबंधी मार्गदर्शन केले. प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व व मानसिक स्वास्थ्य प्रसिद्ध वक्ते शिवाजी कुचे यांनी सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि ध्यान साधनेचे महत्त्व विशद केले. विद्यार्थिनींचे संरक्षण व आरोग्य पोलीस निरीक्षक विजया पंधरे यांनी पोलीस हेल्पलाइन क्रमांकांची माहिती दिली, तर डॉ. दीपाली गुडधे (MD) यांनी महिला आरोग्याविषयक जागरूकतेवर भर दिला. संविधान व शिक्षकांची भूमिका – प्रा. डॉ. संतोष बनसोड यांनी '७५ वर्षांचा संविधान प्रवास आणि भविष्यातील आव्हाने' या विषयावर संवाद साधला. शाळा व्यवस्थापन व आधुनिक शिक्षण दृष्टिकोन – डॉ. गजानन नारे (संस्थापक, प्रभात किड्स अकोला) आणि डॉ. अविनाश बोर्डे (सदस्य, व्यवस्थापन परिषद, संत गाडगेबाबा विद्यापीठ) यांनी 'शाळा व्यवस्थापन' या विषयावर महत्त्वपूर्ण विचार मांडले.

बी.एड. अभ्यासक्रम, विभागीय कार्यपद्धती व उपक्रमांची सविस्तर माहिती प्राध्यापक वर्ग डॉ. वनिता काळे, डॉ. किशोर क्षत्रिय, डॉ. अंजली ठाकरे, डॉ. संगीता बिहाडे, डॉ. माधुरी देशमुख, डॉ. वैशाली कडू, सुकेसिनी घोडेस्वार, डॉ. शिल्पा येळणे यांनी विद्यार्थ्यांना दिली. कार्यालयीन मुख्य लिपिक राजू जामणीक व वरिष्ठ लिपिक श्रीमती सुनीता गावंडे यांनीही सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रमात प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन यामध्ये डॉ. माधुरी देशमुख, डॉ. वैशाली कडू, रोशन गायगोले, अशफिन खान, सुरज फुले, डॉ. शिल्पा येडणे, उज्वला पद्धेवार, शिवानी खोहरे आदींनी आपली भूमिका समर्थपणे पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे संजय बोबडे, प्रतीक वानखडे, आयुष धनवटे आदींनी विशेष मेहनत घेतली. बी.एड. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालयाचा इंद्रधनुष्य सांस्कृतिक महोत्सव



**अमरावती/का.प्र.**
सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालय, अमरावती येथील विद्यार्थ्यांनी 'इंद्रधनुष्य २०२५-२०२६' या आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक युवक महोत्सवाच्या निवड फेरीमध्ये विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि आपली बहुमुखी प्रतिभा सिद्ध करत अनेक स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला.वादविवाद व प्रश्नमंजुषा स्पर्धा साक्षी पवार आणि शुभम आठिया यांनी चमकदार प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला.

शॉर्ट फिल्म स्पर्धा गणेश धिकार, रतन बोरकर व करण डोंगरे यांच्या टीमने उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक मिळवला. कथ्थक नृत्य स्पर्धा - सृष्टी प्रकाश तायडे हिने आपल्या अद्वितीय नृत्यकौशल्याने प्रथम क्रमांक पटकावला.स्किट स्पर्धा - राज बोरकर, रतन बोरकर, सूरज वहाणे, पलक खंडारे, राखी सोनार व आदेश छापाने यांच्या टीमने प्रभावी अभिनय सादर करत प्रथम क्रमांक मिळवला.

इन्स्टॉलेशन स्पर्धा विक्रमसिंग टांक व गणेश धिकार यांनी उत्साही सहभाग नोंदवला.

मुकनाट्य स्पर्धा - सानिया सौदागर, रसिका, श्रावणी सावरकर, प्रणव ढोमणे, वैष्णवी घनमोडे यांनी प्रभावी सादरीकरण करत प्रथम क्रमांक प्राप्त केला.फोटोग्राफी - या स्पर्धेमध्ये ओम गिरी या विदयार्थ्याने तृतिय क्रमांक प्राप्त केला आहे.

भारतीय शास्त्रीय नृत्य स्पर्धा प्रियंका लोखंडे, निशा सपाटे, तन्वी वेलुकार, डिंपल लोंढे यांनी सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडवत उत्साही सहभाग नोंदवला. त्याच प्रमाणे या या यशस्वी विद्यार्थ्यांची निवड आता राज्यस्तरीय अंतिम फेरीसाठी जळगाव खान्देश विद्यापीठ येथे करण्यात आली आहे.

या यशस्वी सहभागाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.सिकंदर मनवरे महाविद्यालयाचे प्राचार्य संजीवनी मनवरे प्रा. शांता गाडगे, प्रा. सुमेध गावंडे, प्रा. कल्पना राऊत, प्रा. प्रणव मनवरे प्रा. स्वप्नील इखार, प्रा. शिल्पा गजभिये, श्री पंकज गजभिये, श्री आकाश मेश्राम,बाळू सोळंके तसेच संपूर्ण संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

### दिवाळी असूनही आसेगाव पूर्णाच्या बाजारपेठेत दुष्काळाचे सावट



**दिवाळीची धामधूम सुरू झाली असली तरी, आसेगाव पूर्णाच्या मुख्य बाजारपेठेत मात्र अद्याप म्हणावी तशी बाजारपेठेत खरेदीची लगबग दिसून येत नाही. बाजारपेठेतील हा शुकशुकाट थेट तालुक्यातील ग्रामीण अर्थकारणाशी जोडला गेला असून, मागील आठवड्यापूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले. यामुळे शेतकऱ्याचे अर्थकारण बदलले. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्यानेच ही परिस्थिती उद्धवल्याचे चित्र असून नेहमी गजबजलेली मुख्य बाजारपेठत शुकशुखाट दिसून येत आहे.**
(छायाचित्र:- किशोर मोकलकर आसेगाव पूर्णा)

## निराधारांना आधार देत प्रविण पोटे पाटील यांची दिवाळी



**अमरावती/का.प्र.**
दिवाळीचा सण हा आनंदाचा, प्रकाशाचा आणि आपुलकीचा असतो. या सणाचे खरे स्वरूप समाजातील दुर्लक्षित आणि निराधार घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी माजी राज्यमंत्री प्रविण पोटे पाटील, श्रेयस पोटे पाटील व श्रुती पोटे पाटील यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही आगळ्या-वेगळ्या पद्धतीने दिवाळी साजरी केली. अमरावती महानगर पालिकेच्या आधार केंद्रात वास्तव्य करणाऱ्या निराधार नागरिकांसोबत दिवाळी साजरी करत पोटे पाटील कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण समोर ठेवले. कार्यक्रमाची सुरुवात अभ्यंगस्नान करून करण्यात आली. हा उपक्रम केवळ सामाजिक मदतीपुरता मर्यादित नसून, त्यांच्या आयुष्यात थोडासा का होईना, आनंद आणि उजाळा निर्माण करणारा होता. तसेच दिवाळीच्या दिवशी पुरणपोळीचे जेवणाचे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे. प्रविण पोटे पाटील म्हणाले, निराधार व वयोवृद्ध नागरिकांना आधार देणं हे आपल्या सामाजिक जबाबदारीचं एक रूप आहे. एक पणती लावून आपण त्यांच्या आयुष्यात प्रकाश टाकू शकतो. अनेक वर्षांपासून अशा प्रकारे दिवाळी साजरी करत असताना जे आत्मिक समाधान मिळतं, श्रेयस पोटे पाटील यांनी देखील उपस्थितांना उद्देशून भाषण करताना सांगितले की, सामाजिक बांधिलकी ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. युवा पिढीने अशा उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, हाच खरा परिवर्तनाचा मार्ग आहे.यापूर्वीही प्रविण पोटे पाटील यांनी या आधार केंद्रासाठी टीव्ही संच, वॉटर कूलर, डेझर्ट कुलर आणि विविध जीवनावश्यक वस्तू भेट दिल्या असून, गरजूंना मदतीचा हात देण्यात ते नेहमी अग्रेसर असतात.कार्यक्रमावेळी शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, तुषार भारतीय, चेतन पवार, ॲड. प्रशांत देशपांडे, चेतन गावंडे, सुरेर्खा लुंगारे, लर्ता देशमुख, रश्मी नावंदर, स्वाती निस्ताने, भारती गुहे, सतीश करेसीया, प्रकाश पुंड, डॉ बबन लायदे, मनीष चौबे, अभिजित वानखडे, अंकित कावळे संजय कटारिया आदी मान्यवर उपस्थित होते.

# पिककर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांचे खाते गोठवले

### भाजपा किसान मोर्चाने बँकेला निवेदन देताच झाले सुरू

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
शेतकऱ्यांनी पीक कर्ज परतफेड न केल्याने बँकेने खाते होल्ड केले होते. बँकेच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली. शेतकऱ्यांनी स्थानिक भाजपा पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. याबाबत पदाधिकाऱ्यांनी दखल घेत. शनिवारी १८ ऑक्टोबरला इंडियन बँक शाखा आसेगाव पूर्णा यांना शेतकऱ्यांचे पीक कर्ज थकीत असल्यामुळे गोठवलेले बचत खाते सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन दिले व दिलेल्या निवेदनाची बँकेने त्वरित दखल घेत होल्ड केले खाते त्वरित सुरू केले. इंडियन बँक आसेगाव पूर्णा येथील शेतकऱ्यांची खाती थकीत पीक कर्जामुळे गोठवण्यात आली होती. याबाबत भाजपा किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस मेळघाट जिल्हा (अमरावती ) चे आशिष मेहत्रे यांच्याकडे शेतकऱ्यांच्या प्राप्त तक्रारीवरून माधव अवघड जिल्हाध्यक्ष भाजपा किसान मोर्चा मेळघाट जिल्हा अमरावती, यांच्या नेतृत्वात इंडियन बँक शाखा आसेगाव



पूर्णा येथे शेतकरी व भाजपा कार्यकर्ते यांच्या उपस्थित शाखा व्यवस्थापक यांच्याशी चर्चा करून उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे गोठवलेली बचत खाती नियमित सुरू करण्याचा भाजपा किसान मोर्चाच्या वतीने आग्रह केल्याने लगेच सर्व उपस्थित खातेदारांचे बचत खाते नियमित सुरू करण्यात आले. शेतकऱ्यांची ५ ते ६ वर्षापासून गोठवलेली बचत खाती सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले व दिवाळी सारख्या सणाला शेतकऱ्यांच्या खात्यात असलेले पैसे शेतकऱ्यांना काढता आले.

यावेळी माधव अवघड जिल्हाध्यक्ष भाजपा किसान मोर्चा मेळघाट जिल्हा अमरावती, आशिष मेहत्रे सरचिटणीस भाजपा किसान मोर्चा मेळघाट जिल्हा अमरावती, अंकुश घुलक्षे सरचिटणीस भाजपा किसान मोर्चा मेळघाट जिल्हा अमरावती, प्रशांत धवे तालुका सरचिटणीस भाजपा चांदूर बाजार, अनिकेत वाठ तालुका अध्यक्ष युवा मोर्चा चांदूर बाजार, निर्मल सोळंके, प्रफुल्ल खैरकर, अभिषेक रघुवंशी, गजानन नांदने तसेच अनेक भाजप कार्यकर्त्यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## सनलाईट प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे 'दिपोत्सव २०२५'

**अमरावती/का.प्र.**
स्थानिक खोलापुरी गेट हनुमान नगर स्थित प्रभात एज्युकेशन सोसायटी, अमरावती द्वारा संचालित सनलाईट प्रायमरी इंग्लिश स्कूल, अमरावती येथे 'दिपोत्सव २०२५' मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभात एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वि. दा. पवार होते, तर मुख्य अतिथी म्हणून माळी समाज बचत गट, साई नगर व होमिओ डॉक्टर असोसिएशन, अमरावती जिल्हा यांचे अध्यक्ष डॉ. अशोकराव उपम उपस्थित होते. कार्यक्रमाचे



उद्घाटन माळी समाज बचत गटाचे सचिव संतोष कुऱ्हेकर यांच्या हस्ते झाले.प्रमुख उपस्थितीमध्ये प्रभात एज्युकेशन सोसायटीच्या सचिव कविता पवार, सनलाईट प्रायमरी इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष नरेंद्र पाटणे, माळी समाज बचत गटाचे संचालक व सल्लागार मंडळाचे सदस्य, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक एल.के.व्ही पवार यांनी प्रास्ताविकातून संस्थेद्वारा राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.उषा जैन, फुकटे यांनी धनतेरस व धन्वंतरी जयंती, हर्षदा अनासाने यांनी वसुबारस वगोवत्सद्वादशी, वैशाली कांडलकर यांनी नरक चतुर्दशी, माधुरी नेरकर यांनी लक्ष्मीपूजन, महेक अंजुम यांनी दिपावली पाडवा, पूजा गुल्हाने यांनी भाऊबीज या सणांविषयी माहिती दिली. संचालन सहाय्यक शिक्षिका वर्षा कुणाल मावदे यांनी तर आभार प्रदर्शन सहाय्यक शिक्षिका अमृता जुनघरे यांनी केले. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले आकर्षक आकाशकंदील, दिवे आणि शुभेच्छा ग्रीटिंग कार्ड यांच्या माध्यमातून दीपोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.'दिपोत्सव २०२५' हा कार्यक्रम शाळेतील शिक्षकवर्ग, विद्यार्थी, पालक आणि समाजातील मान्यवरांच्या सहभागातून अतिशय उत्साहात पार पडला.

## पंचायतराज अभियानांतर्गत श्रमदान



**मोर्शी-** तालुक्यातील दुर्गवाडा ग्रामपंचायत च्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत श्रमदान ग्रामस्वच्छता राबविण्यात आले ग्रामपंचायत कार्यालय परिसरामध्ये साफसफाई करण्यात आली तसेच समाज मंदिर वाटर सप्लाय पाण्याच्या टाकीजवळील परिसर स्वच्छ करण्यात आला. हा उपक्रम श्रमदान करून राबवण्यात आला या श्रमदानाकरिता दुर्गवाडा गावचे सरपंच विलास इंगळे उपसरपंच अमोल सोलो व सर्व सदस्य ग्रामपंचायत कर्मचारी रोजगार सेवक मंगेश गहरवाल दुर्गवाडा गावातील माजी उपसरपंच्या बबीता इंगळे एकता कोरे अर्चना इंगळे करुणा सरदार कोमल इंगळे किरण मोहोळ रत्नाबाई मोहोळ भगवंता आठवले सामाजिक कार्यकर्ता सुनील ढोंगे दुर्गवाडा गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आत्मनिर्भर भारताच्या ध्येयाकडे मजबूत पाऊल...

आत्मनिर्भर भारत संकल्पनेला बळ देणारी ऐतिहासिक घटना नाशिककर नव्हे तर संपूर्ण देशवासीयांनी अनुभवली.सरकारी मालकीच्या एरोस्पेस कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) द्वारे निर्मित स्वदेशी बनावटीचे लढाऊ विमान, तेजस मार्क-१ए ने शुक्रवारी १७ रोजी नाशिक येथील HAL प्लांटमधून आपले पहिले उड्डाण यशस्वीरित्या पूर्ण केले. संरक्षण क्षेत्रात भारताच्या स्वावलंबी होण्याच्या दिशेने हे उड्डाण आणखी एक मोठे पाऊल मानले जाते. बंगरूळ नंतरची ही दुसरी उत्पादन सुविधा असून स्वदेशी संरक्षण क्षमतेच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण घडी ठरली आहे पूर्ण भारतीय बनावटीचे तेजस विमान सर्वात हलके लढाऊ विमान आहे ताशी दोन हजार किलोमीटर वेग आणि हवेतच इंधन भरण्याची क्षमता आहे ध्वनीच्या वेगाने १.६ पट म्हणजे सुमारे २०००किमी प्रति तास वेगाने उड्डाण करण्यास हे विमान सक्षम आहे. सर्व दिशांनी लक्ष साधण्याची क्षमता असलेले हे लढाऊ विमान आहे रडार मुळे एकाच वेळी अनेक लक्ष ओळखणे आणि ट्रॅक करणे शक्य होते प्रणालीमुळे मित्र की शत्रू अशी लक्ष ओळख द्वैत शक्य होते रेडिओ मुळे सुरक्षित व सॅटेलाईट द्वारे संवाद साधण्याची सुविधा आहे डिजिटल मॅप जनरेटर मुळे परिसर आणि उंचीची अचूक माहिती मिळते.

तेजस मार्क-१ए हे ४.५ पिढीचे विमान आहे. त्यात अत्याधुनिक AESA रडार, इलेक्ट्रॉनिक युद्ध (EW) संच आणि प्रगत क्षेपणास्त्र प्रणाली आहेत. मिग-२१ त्याच्या काळात अत्यंत सक्षम होते, परंतु तेजस हे आधुनिक काळातील गरजांनुसार तयार केलेले बरेच प्रगत आणि बहुमुखी आहे. तेजस मार्क-१ए हे स्वदेशी बनावटीचे आणि प्रगत हलके लढाऊ विमान आहे. हे भारताने विकसित केलेल्या एलसीएची प्रगत आवृत्ती आहे आणि चौथ्या पिढीतील बहु-भूमिका लढाऊ विमान मानले जाते. जलद, हाताळता येण्याजोगे आणि अत्यंत अचूक, हे विमान सर्व हवामान परिस्थितीत दिवसा आणि रात्री ऑपरेशन करण्यास सक्षम आहे.ते ५.५ टनांपेक्षा जास्त शस्त्र पेलोड वाहून नेऊ शकते आणि एकाच वेळी अनेक लक्ष्यांवर अचूक




हल्ला करू शकते. तेजस मार्क-१ए मध्ये नवीन एईएसए रडार, दृश्यमान श्रेणीच्या पलीकडे (बीव्हीआर) क्षेपणास्त्रे, प्रगत इलेक्ट्रॉनिक युद्ध (ईडब्ल्यू) संच आणि हवेतून हवेत इंधन भरणे यासारख्या अत्याधुनिक क्षमता आहेत. हे स्वदेशी पद्धतीने तयार केले जात आहे, ज्यामुळे देशात आवश्यक बदल करता येतात.

काही वर्षांपूर्वीपर्यंत देशाला संरक्षण उत्पादनाबाबत परकीय देशांवर अवलंबून राहावे लागत असे ६५ ते ७० टक्के साहित्य आयात केले जात असे आता या परिस्थितीत बदल होत आहे आता ६५ टक्के साहित्य देशातच तयार होत आहे लवकरच सर्व साहित्य देशांतर्गत तयार करण्यात येईल. संस्थांच्या सहकार्याने उत्पादित केलेले लढाऊ विमाने ही देशासाठी गौरवाची बाब आहे देशाची हवाई दल नवीन तंत्रज्ञानाच्या विमानांमुळे अधिक मजबूत होईल.देशांतर्गत संरक्षण उत्पादनांचे मूल्य २०२९ पर्यंत पर्यंत तीन लाख कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यामुळे देशाचे आयातीवरील अवलंबित्व कमी होईल तसेच संरक्षण उत्पादनांचे निर्यात मूल्य सन २०२९ पर्यंत दुप्पट म्हणजेच ५० हजार कोटी रुपयांपर्यंत करण्याचे ध्येय आहे ते निश्चितपणे साध्य होईल गेल्या दहा वर्षात भारताने गतीने संरक्षण उत्पादन क्षेत्रात प्रगती केली आहे त्यामुळे लढाऊ विमाने क्षेपणास्त्रे यंत्र लढण्यासाठी आवश्यक इलेक्ट्रॉनिक साधनांची निर्मिती भारतातच होत आहे.

तथापि, पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारने 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमांतर्गत गुंतवणूक सुलभ करून, नवोपक्रमाला चालना देऊन, कौशल्य विकास वाढवून, बौद्धिक संपत्तीचे संरक्षण करून आणि अत्याधुनिक उत्पादन पायाभूत सुविधा उभारून भारताच्या मरणासन्न संरक्षण उद्योगाला बळकटी देण्यासाठी अनेक सुधारणा सुरू केल्या आहेत.यामध्ये तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी परदेशी संरक्षण कंत्राटदारांशी सहकार्य, संयुक्त उपक्रम आणि संरक्षण क्षेत्रात देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी 'मेक इन इंडिया' मोहिमेसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. शिवाय, संरक्षण खरेदी प्रक्रिया आणि धोरणात्मक भागीदारी मॉडेलची ओळख यासारख्या भारताच्या संरक्षण खरेदी धोरणांमध्ये बदल खाजगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन देणे आणि स्वदेशी क्षमता वाढवणे हे आहे.उद्योगांना उत्पादनाची मोठी जबाबदारी घेण्यास सक्षम करण्याव्यतिरिक्त, सरकारने संशोधन आणि विकास करण्यास प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला आहे सरकारने 'मेक इन इंडिया' मार्गदर्शक तत्त्वांचे सरलीकरण आणि विस्तार केले आहे. आणि दोन नवोपक्रम-केंद्रित योजना सुरू केल्या आहेत - आज, भारताचा शस्त्रास्त्र उत्पादन लँडस्केप सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, खाजगी संरक्षण कंपन्या आणि परदेशी कंपन्यांशी सहकार्य यांचे मिश्रण आहे. देशाने क्षेपणास्त्र तंत्रज्ञान, नौदल जहाजबांधणी आणि विमान निर्मिती यासारख्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. याव्यतिरिक्त, संशोधन आणि विकासावर वाढता भर दिला जात आहे, संरक्षण संशोधन आणि विकास संघटना सारख्या संस्था नवोपक्रम आणि स्वदेशी तंत्रज्ञान विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा मो.९५६१५९४३०६

## सामाजिक परिस्थितीचे चिंतन करणारी 'विरक्त नदीचा काठ'




एकाच वेळी दोन कलाप्रकार समर्थपणे हाताळणारे मनस्वी कलावंत दुर्मीळच असतात. अशा दुर्मीळ प्रतिभावंतांपैकी एक म्हणजे सुनील यावलीकर. ते त्यांच्या अप्रतिम चित्रांमधून आपल्याला नेहमीच भेटत असतात. रंगरेषांवर त्यांची जशी हुकूमत आहे तशी शब्दांवरही आहे. त्यांच्या लेखनामधून बदलत्या सामाजिक परिस्थितीविषयीचे चिंतन व्यक्त होत असते.'काया वाचा मने' ही त्यांची कादंबरी आणि 'सरते काही सोडू नये' हा लेखसंग्रह याची साक्ष आहेत.

काही दिवसांखाली त्यांचा 'विरक्त नदीचा काठ' हा नितांत सुंदर कविता संग्रह प्रकाशित झाला.'पीळ' नंतरचा हा दुसरा कवितासंग्रह. या संग्रहातील त्यांची कविता आत्मसंवादात मग्न असणारी आहे. हा आत्मसंवाद जसा वेगवेगळ्या भावस्थितींची चित्रदर्शी पद्धतीने मांडणी करतो, तसाच तो बदलत्या सामाजिक परिस्थितीवर भाष्यही करतो. समाजातील भ्रष्टाचार, अनागोंदी, राजकीय निर्ढावलेपण, शेतकऱ्यांची दैना, स्त्रियांची कुचंबणा, वरचेवर गलिच्छ होत असलेल्या जातीय आणि धार्मिक अस्मिता या सगळ्या भयावह सामाजिक परिस्थितीचे चिंतन अतिशय संयतपणे त्यांचा हा आत्मसंवाद करतो. तो कधीही आक्रस्ताळा होत नाही हे या आत्मसंवादाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य. परिस्थिती बिकट आहे. पुष्कळदा न्यायासाठी झगडणाऱ्यांना अपयश पचवावे लागण्याचा हा काळ आहे. आपल्या अपयशामुळे पुढच्या पिढीचा धीर खचू नये याचीही कवीला चिंता आहे. म्हणून तो म्हणतो -

**'दूर जावे कोण्या देशी**
**सारे हरवले सूर**
**लेकरांशी बोलताना**
**लपो पराजयी नूर'**

काही ठिकाणी स्वतःशीच केलेला हा संवाद तीव्र संवेदनशीलतेने असा व्यक्त होतो -

**'मावळतीच्या सांज प्रकाशी**
**देही लगडता तप्त व्रण**
**गवतातील फुल एकाकी**
**भूतकाळाचे माजले तण**

**रिक्त ओल्या दीर्घ अवकाशी**
**डोळ्यांमधील अश्रूंचे भय**
**मिटून जाता सांजसमयी**
**विचारू नये जखमांचे वय'**

कवीचे चित्रकार असणे अनेक कवितांमधून जाणवत राहते. विविध चित्रकारांच्या येणाऱ्या संदर्भांमधून तर ते जाणवतेच पण मुख्य म्हणजे शब्दांच्या साह्याने कवी अनेक ठिकाणी आपल्यासमोर रंगीत भावचित्रच तयार करतो.

**'जीर्ण मळक्या पट्टावरची**
**बिलगती मज तेजल चित्रे**
**कॅनव्हासवर दात विचके**
**काळे-कभिन्न भयाण कुत्रे'**

हुसेनचे उधळलेले घोडे, अमृता शेरगिलच्या सुन्न घरपणाचा पदर डोक्यावर घेतलेल्या बायका, रेम्ब्रॉचे रंग, मायकेल एंजलोची शिल्पं कवीच्या भावविश्वाचा अविभाज्य घटक आहेत तर पिकासोची गर्निका पुनरावृत्तीच्या शक्यता दाखवून त्यांना कमालीची अस्वस्थ करते. आत्मसंवादात मग्न असली तरी समाजाप्रति उत्तरदायित्व असणारी, सामाजिक परिस्थितीचे चिंतन करणारी सुनील यावलीकर यांची 'विरक्त नदीचा काठ' या कवितासंग्रहातील कविता त्यांच्या चित्रांइतकीच प्रत्ययकारी आहे.

या कविता वाचताना अनेक ठिकाणी मर्ढेकर, आरती प्रभू आणि ग्रेस यांची आठवण होत असली तरी कवीने आपला स्वतंत्र सूर जपलेला आहे. म्हणूनच स्वतःचे स्वतंत्र रूप आणि शब्दकळा घेऊन येणारी ही कविता आवर्जून वाचावी अशीच आहे...

**नितीन कोत्तापल्ले, सुप्रसिद्ध लेखक आणि प्रकाशक**

विरक्त नदीचा काठ
**सुनील यावलीकर**
ज्ञानपथ पब्लिकेशन
किंमत १५० रुपये
फोन : ०८६००३५३७१२ / ०९५०३२३७८०६

## असूरांत ..

सुसज्ज कृष्ण अस्त्र
करी नरकासूर अंत
सोळासहस्त्र नारींना
करतोमुक्त तो अनंत

सुखेदिवाळीगोकुळी
प्रसन्नचित्तअनाद्यनंत
बंदिवास सरलाभला
उपकार झाले अनंत

जाणावेसणाचेमहत्व
नसे केवळ कथा दंत
घडवू चारित्र्य सुशील
कृती दृश्य विचारवंत

अ सूरत्व गळून पडो
चुकांचीजाणवो खंत
कृतीत व्यक्त कर्तव्य
व्हावे सद्गुण श्रीमंत

तन मन दोन्ही शुध्दी
पाप क्षालनार्थ उसंत
निदान माणूस बनूया
भले नहोणे साधु संत

काळजी घे कशी प्रेमे
नश्वर हे शरीर अंतवंत
मनशुध्दीकरण ठेवूनि
बनावे उदंड किर्तीवंत

**- हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६..

## सणासुदीत घर खरेदीतील फसवणूक रोखण्याची गरज

देशात दिवाळीच्या सर्वात मोठ्या सणाला प्रसार माध्यमांमध्ये घरांच्या जाहिरातींचा मोठा प्रचार होत असतो. संपूर्ण देशाचा विचार केला तर दिवाळी हा सण घरांच्या विक्रीला आणि खरेदीसाठी सर्वात मोठा काळ किंवा हंगाम मानला जातो. एकूणच दिवाळीचा काळ लक्षात घेऊन घराच्या खरेदीसाठी ग्राहकांना जास्त आकर्षित करणाऱ्या योजना अमलात आणल्या जातात. बिल्डर किंवा घर बांधणी करणाऱ्या मोठ्या कॉर्पोरेट बांधकाम कंपन्या अशा प्रकारच्या जाहिराती प्रसारित करतात. आणि त्या वाचून सामान्य माणूस जाहिरातींना आकर्षित होतो.अलीकडच्या काळात घराचा कोणताही ईएमआय किंवा हप्ता न देता तुम्ही घर खरेदी करा आणि घराचा ताबा घेतल्यानंतर तुम्ही तुमच्या घराचे हप्ते फेडायला सुरुवात करा अशा प्रकारची जाहिरात केली जाते. काही ग्राहकांना असे वाटते की आपल्याला आता कोणताच हप्ता न भरता घर ताब्यात मिळालेले आहे अशी त्यांची धारणा होते. घर ताब्यात झाल्यानंतर आपल्या घराचा ईएमआय सुरु होईल पण तुमच्या घराचे बुकिंग करून घेतले जाते. आणि बुकिंग करून घेतांना तुमच्याकडे संपूर्ण कागदपत्रांवर स्वाक्षरी घेतली जाते. त्यामध्ये तुम्ही त्या घराचे मालक झालेले असतात. परंतु त्या घराच्या मोबदल्यात बिल्डर बँकांकडून मोठ्या प्रमाणावर कर्ज उचलत असतो. आणि बँका देखील त्यांना ते कर्ज देतात. कारण घर तुमच्या नावावर झालेले असते. आणि कर्जही तुमच्या नावावरच लागू झालेले असते. साधारण आणि मध्यमवर्ग माणूस घराच्या आमिषाने जाहिरातींना बळी पडतो त्याला याबाबत कुठलीच पुरेशी कल्पना बिल्डरकडून दिली जात नाही. म्हणूनच आपल्या स्वप्नातले घर हातात पडण्यापूर्वीच त्याचा खिशावर कर्जाचा मोठा बोजा टाकला जात असतो. अशा प्रकारच्या दोषी बँका आणि बिल्डर यांना वेळीच रोखणे गरजेचे आहे. आणि त्यात सामान्य माणसाची कुठलीही फसवणूक होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

देशात गेल्या काही वर्षांमध्ये बँका आणि बिल्डरांच्या या भ्रष्ट युतीमधून एक मोठा भ्रष्टाचार समोर आलेला आहे.



आणि त्याचा अनेक ग्राहकांना मोठा भुर्दंड सहन करावा लागतो. म्हणजे ग्राहकांची फसवणूक होत असते. आणि आपल्या ती लक्षात येत नाही. आणि फसवणुकीचे परिणाम देखील किती मोठे आहेत हे कालांतराने घर घेणाऱ्यांच्या लक्षात येते. परंतु बँकांना आपल्या कर्जाचे वितरण करायचे असते. तसेच आपला व्यवसाय वाढवायचा असतो. आणि बिल्डरांना देखील आपल्या घरांची कमी वेळात अधिकाधीक विक्री करायची असते. म्हणजेच बँका आणि बिल्डर हे भ्रष्टाचाराला आणि गैरकारभाराला एकप्रकारे प्रोत्साहन देण्याचे काम करीत आहे असे चित्र पाहायला मिळते. अनेक वेळेला बिल्डरांनी बँकांकडून कर्ज घेतात. आणि बँकाही त्यांना ते कर्ज देतात. परंतु नंतर बिल्डराने ते फेडण्यास नकार देतात. ते कर्ज ज्या ग्राहकाने घर बुक केलेले असते किंवा नोंदवलेले असते त्याच्या नावावर ते कर्ज लागू झालेले असल्याने बँका त्या ग्राहकाच्या घरी जाऊन वसुली एजंट कर्ज वसुली करतात. परंतु याच्या हातात घर आलेले नसताना कर्जाचा नेमका प्रकार काय आहे याची ग्राहकाला कल्पना नसते. आणि बिल्डर पैसे घेऊन वेगळे होतो. आणि त्या कर्जाचे हप्ते फेडण्याचे काम घर नोंदणी केलेलया ग्राहकांना करावे लागते. म्हणून आता ज्या वेळेला दिवाळीच्या सणासुदीला किंवा अगदी दसऱ्यापासून बिल्डरांच्या जाहिराती सुरु होतात त्यामध्ये जर अशा प्रकारच्या जाहिराती असतील किंवा अशा प्रकारचे आमिष दाखवले गेले असेल तर ग्राहकाने सावध रहाण्याची गरज आहे.

आज काही बिल्डर आणि बँका यांच्या भ्रष्ट कारभाराचा प्रकार वाढतो आहे. कारण बरेचसे बँक अधिकारी आणि बिल्डर यांची हातमिळवणी करीत असल्यामुळे असे प्रकार होत असल्याचे समोर येत आहे. बँकांना हजारो कोटींचे कर्ज सहजपणे वितरित करता येतात. ज्यातून आपल्या बँकेचा नफा वाढत असल्याचे आणि आपली बँक कशी फायद्यात आहे ते दाखवता येणे बँक अधिकाऱ्यांना सहज शक्य होते. यामध्ये बिल्डरकडून बँक अधिकाऱ्यांची मर्जी राखली जाते. बिल्डरांना आपला वेगाने विशेषतः या अधिकाऱ्यांच्या मदतीने विस्तारता येतो किंवा वाढवता येतो. एकाच वेळेला अनेक प्रकल्प त्यांच्या हाताशी येतात. कारण स्वतः बिल्डरला त्यातला एक पैसाही बँकेला द्यायचा नसतो. उलट बँकेकडून त्याच्या ग्राहकांनी बुक केलेले घर तारण दाखवले जाते. बिल्डरची जमीन किंवा बिल्डरने कुठलेही अमानत, तारण ठेवलेले नसते. फक्त तो गघरांचा प्रकल्पच तिथे तारण करतो. पण तो देखील ज्या ज्या लोकांनी घर बुक केलेले आहेत त्यांच्या घरांचे तारण ठेवले जाते. आणि त्यातूनच मोठी कर्जाची रक्कम बिल्डरच्या खिशामध्ये पडत असते. बिल्डर आणि बँकांच्या मदतीने चालणारा हा गैरव्यवहार आता समोर येतो आहे. अशा दोषी बिल्डर किंवा बँक अधिकाऱ्यांसोबत गुप्तचर खात्याने कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

**मधुकर चुटे**

## अंधश्रद्धा निर्मूलनाचा समाजशास्त्रीय प्रवास

अंधश्रद्धा ही केवळ वैयक्तिक श्रद्धेची किंवा धार्मिक भावनेची बाब नाही; ती आपल्या समाजाच्या संरचनेत, संस्कृतीत आणि सत्तासंबंधांमध्ये खोलवर रुजलेली सामाजिक वास्तवता आहे. भारतीय समाजशास्त्रीय जीवनाचा अभ्यास केल्यास दिसते की श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांचा परस्परसंबंध हा मानवाच्या सामाजिक व मानसिक गरजांशी निगडित आहे.शिक्षण आणि माध्यमे ही अंधश्रद्धा निर्मूलनाची दोन अत्यावश्यक स्तंभ आहेत. शालेय शिक्षणात वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशक्ती आणि विवेकवाद यांचा समावेश करणे आवश्यक आहे. माध्यमांनी देखील लोकजागृतीची जबाबदारी ओळखली पाहिजे. दुर्दैवाने, काही माध्यमे अंधश्रद्धेला बळ देतात, भविष्य सांगणारे कार्यक्रम, ज्योतिष सल्ले, आणि चमत्कारांचे प्रक्षेपण समाजाच्या विवेकाला भ्रमित करतात. उलट, विज्ञानाधारित माहितीपट, विवेकवादी चर्चा आणि सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम समाजातील बौद्धिक वातावरण समृद्ध करू शकतात.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ व्यक्तीगत नव्हे तर सामूहिक प्रक्रियाही आहे. समाजातील बदल सामूहिक चेतनेवर अवलंबून असतो. म्हणून ग्रामपंचायतींपासून विद्यापीठापर्यंत 'विवेक मंच', विज्ञान मेळावे, लोकशिक्षण आणि चर्चासत्रे आयोजित करणे आवश्यक आहे. ती व्यक्तीची विचारशक्ती कुंठित करते आणि समाजाला स्थैर्याऐवजी अस्थिरता आणते. समाजशास्त्रीय, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ मोहीम नाही, तर ती सामाजिक क्रांती आहे. शिक्षण, विज्ञान, तर्कशक्ती आणि विवेक या चार आधारस्तंभांवरच समाजाचा प्रकाशमान भविष्यकाळ उभा राहू शकतो. अंध:कारावर प्रकाशाचा विजय तेव्हाच खरा ठरेल, जेव्हा प्रत्येक मनात विवेकाचा दिवा पेटेल आणि हा दिवा ज्ञानाचा, विज्ञानाचा आणि मानवतावादाचा असेल.

**डॉ.राजेंद्र बगाट**

## मानवतेचा दीप लावू!

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. मागील दोन वर्षापासून दिवाळीवरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. मागील दोन वर्षापासून दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी केली. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रसन्नतेचा उत्सव असल्याने हा उत्साह यावर्षीही असाच कायम राहील असे वाटत होते मात्र ऐन दिवाळीच्या आधी झालेल्या अतिवृष्टीने या उत्साहावर पाणी पडले. राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले. राज्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीने उभी पिके आडवी झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला. या संकटातून सावरण्याची ताकद शेतकऱ्यांना मिळो आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी अशी प्रार्थना राज्यातील १३ कोटी जनता देवाजवळ करत आहे.

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत



दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू. मानवतेचा दिप लावू!

**श्याम ठाणेदार**

# ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये दिवाळी उत्सव उत्साहात





**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूल, अमरावती येथे दिवाळीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आनंद पाठरकर (जिल्हा सैनिक बोर्ड अधिकारी, अमरावती), बी. एस. राय (संस्थापक अध्यक्ष, बहादुर माजी सैनिक कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था), नंदकिशोर काले (अध्यक्ष), अशोक बुंडे (सचिव) व गजानन शेरेकर (सहसचिव) हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा शर्मा राठोड मॅडम यांनी केले. विद्यार्थ्यांनी संपूर्ण शाळा प्रांगण आकर्षक रांगोळ्या, फुलांच्या सजावटी आणि पारंपरिक दिव्यांनी सजवले होते. विद्यार्थ्यांनी स्वतःहून मातीचे दिवे आणि लक्ष्मीमातेच्या पावन पदचिन्हांची विक्री केली. पालक वर्ग व शिक्षकांनी हे दिवे विकत घेऊन पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश दिला.

क्लास १ ते ३ मधील विद्यार्थ्यांनी मनमोहक नृत्य सादर केले. इयत्ता ५ ते ७ साठी थाळी सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, तर इयत्ता ८ ते १० मधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. संपूर्ण वातावरण भक्तिमय व आनंददायी होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अश्विनी मेश्राम यांनी अत्यंत अलंकारिक भाषेत केले, तर आभार प्रदर्शन देवी गुळदे यांनी केले. शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा गौरी देशमुख मॅडम, सचिव ममता ठाकरे, कोषाध्यक्ष अंगद सर, संचालिका वर्षा पुनवटकर मॅडम, तसेच मुख्याध्यापिका वर्षा राठोड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये शिक्षकवृंदांपैकी संगीता पवार मॅडम यांचे विशेष योगदान होते. तसेच संपूर्ण कर्मचारी वर्गाने सहकार्य करत उपस्थिती लावून कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये मोलाची भूमिका बजावली.

सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे व शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

# बडनेऱ्यात बुधवारी भव्य 'नरकासुर दहन' सोहळा

## -८६ वर्षांची परंपरा कायम



**बडनेरा :** तब्बल ८६ वर्षांची परंपरा कायम राखत, यंदाही बडनेरा जुनी वस्तीतील सावता मैदानावर नरकासुर दहनाचा भव्य दिव्य सोहळा बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पार पडणार आहे. बडनेरा शहरच नव्हे तर पंचक्रोशीतील सर्वसामान्यांच्या 'दिवाळीचा सोहळा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कार्यक्रमाची जय्यत तयारी आयोजकांच्या वतीने पूर्ण करण्यात आली आहे.

श्री संत सावता युवक मंडळ संचालित श्रीराम विजय उत्सव समिती या पारंपरिक सोहळ्याचे आयोजन दरवर्षी करते. दिवाळीतील लक्ष्मीपूजनानंतरच्या दुसऱ्या दिवशी पार पडणाऱ्या या सोहळ्यात आकर्षक फटाक्यांची आतषबाजी करून अन्याय आणि वाईट प्रवृत्तीवर विजय मिळविण्याचे प्रतीक म्हणून नरकासुराचे दहन केले जाते.

या सोहळ्याला दरवर्षी परिसरातील अनेक गावांतून हजारो भाविक व नागरिक उपस्थित राहतात. भव्य फटाक्यांची आतषबाजी हा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण असतो. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्यापूर्वी दरवर्षीप्रमाणे यंदाही सलग दहा दिवस रामलीला कार्यक्रम सावता मैदानावर रंगला. मध्यप्रदेशातील रामकुमार पांडे हे गेल्या अनेक वर्षांपासून ही रामलीला सादर करत आहेत आणि यंदाही त्यांनी तीच परंपरा कायम ठेवली.

गतवर्षांपर्यंत या सोहळ्याचे प्रमुख सूत्रधार माजी नगरसेवक विजय नागपुरे होते. त्यांचे काही महिन्यांपूर्वी निधन झाल्याने यंदा कार्यक्रमात थोडा भावनिक रंग आहे; तरीही भाजप नेते जयंत डेहनकर यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी व ग्रामस्थांनी तयारीत कोणतीही कसर ठेवलेली नाही. यंदा समितीचे अध्यक्ष निखिल लडके, तर सचिव गौरव बांते आहेत. तसेच जयंत डेहनकर, रवींद्र तर्हेकर, रवींद्र बोडके, प्रशांत मलपे, सुजय पवार, महेश येते, सागर पवार, शरद ठोसरे, मनीष कुठे, शुभम मोरे, दीपक महाजन, ईश्वरराव हाडोळे, नितीन नागपुरे, योगेश पाथोडे, आशिष आकोटकर, आकाश वाट, उकरराव श्रीखंडे, वामनराव पवार, विनोद डहाके, अभिजीत लांडे आणि विजय दरेकर आदी पदाधिकारी मंडळाच्या आयोजनात कार्यरत आहेत.

नागरिकांनी बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सावता मैदानावर होणाऱ्या या पारंपरिक नरकासुर दहन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# विकसित भारतासाठी प्रधानमंत्र्यांकडून महिला सक्षमीकरणासाठी ऐतिहासिक प्रयत्न

## -खा.डॉ.अनिल बोंडे यांचे प्रतिपादन

**-येवदा येथे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नारी शक्ती सन्मान सोहळा**

### -विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा केला सत्कार





**दर्यापूर/प्रतिनिधीः-** राष्ट्राची प्रगती साधायची असेल तर महिलांच्या विकासाशिवाय ते शक्य नाही, ही बाब ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या उत्थानासाठी विविध सामाजिक प्रकल्प, योजनांची मुहूर्तमेढ रोवून महिला सक्षमीकरणाचे ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणींना आधार देण्यासाठी विविध योजना सुरू केल्या. आज समाजातील दुर्लक्षित घटकातील महिला मुख्य प्रवाहात येऊन कर्तबगारपणे उद्योग आणि व्यवसाय करत आहेत, असे प्रतिपादन राज्यसभेचे खासदार तथा भाजपचे जेष्ठ नेते डॉ.अनिल बोंडे यांनी केले.


दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे स्वयम मल्टीपर्पज फाउंडेशन तर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधत 'नारीशक्ती सन्मान' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांशी संवाद साधताना डॉ.बोंडे बोलत होते. दरम्यान विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा सन्मान त्यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी विचारपिठावर मातोश्री त्रिवेणीताई बोंडे महिला सहकारी सूतगिरणीच्या अध्यक्ष डॉ.वसुधा बोंडे, माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, समाजकल्याणच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रीती देशमुख, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रशांत देशमुख, सलीम घाणीवाले, जिल्हा चिकित्सक डॉ.दिलीप सौंदळे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे डॉ.रंजन वानखडे, प्रकल्प बालविकास अधिकारी अमोल नेरगड, मेघा भारती, प्रशांत आढाव, नीता खाडे, सदाशिव खडके, सुमित चवरे, संजय वाघमारे, सुखदेव पवार, माला डोईफोडे, स्वप्निल गावंडे, नितीन बढे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**वसुधा बोंडे, केदार, देशमुख यांना नारीशक्ती पुरस्कार-**

महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणाऱ्या डॉ.वसुधा बोंडे, समाजकल्याण विभागाच्या पहिल्या महिला प्रादेशिक उपायुक्त माया केदार, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांचा डॉ.अनिल बोंडे यांच्या हस्ते नारी शक्ती पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यासह येवदा परिसरातील ८० पेक्षा अधिक महिलांना देखील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महिला सक्षमीकरण, उद्योग, व्यवसाय, बचतगट यासह विविध क्षेत्रातील महिलांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची माहिती स्वयम संस्थेचे सचिव नकुल सोनटक्के यांनी दिली.

# खोलापुरी गेट हद्दीत तरुणीची आत्महत्या



**अमरावती /प्रतिनिधीः-** शहरातील हनुमान नगर परिसरातील केवले प्लॉट येथे राहणाऱ्या ऋचिका उर्फ राणी राजेश रीठे (वय २४ वर्ष) या तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी (दि. १८) रात्री घडली.

पोलिस सूत्रांनुसार, ऋषिकाचे आई-वडिल हे किराणा साहित्य आणण्यासाठी बाहेर गेले होते. त्यानंतर साहित्य घेऊन ते घरी परतले असता घरातील आतील दरवाजा बंद होता. त्यांनी बराच वेळ आवाज दिल्यानंतरही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी शेजाऱ्यांच्या मदतीने किचनच्या दरवाज्याची कडी तोडून आत प्रवेश केला, तेव्हा ऋषिका हिने कॉटनच्या दोरीने स्लॅबवरील लोखंडी कडीला गळफास घेतल्याचे आढळले. त्यानंतर त्यांनी तिला तातडीने ॲक्झॉन हॉस्पिटल तसेच पुढे इर्विन हॉस्पिटल येथे नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. याप्रकरणात खोलापुरी गेट पोलिसांनी आकस्मिक नोंदवून तपास सुरू केला आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# काटपूर येथून बालाजी महाराजांची बिदाई



**काटपुर/प्रतिनिधीः-** काटपुर ममदापूर येथून श्री. व्यंकटेश बालाजी भगवान यांना मोठ्या भक्ती भावाने बिदाई देण्यात आली. माळी पौर्णिमेच्या मुहूर्तावर काटपुर येथे दहा दिवसांसाठी श्री वेंकटेश बालाजी भगवान यांचा महोत्सव मोठ्या उत्साहात व साजरा केला जातो. यादरम्यान लोटांगण व अनेक कार्यक्रम साजरे केले जातात . अखेरीस महाप्रसाधने सांगता करण्यात येते दहा दिवस गावात भक्तिभावाचे उत्साहाचे वातावरण बघायला मिळते. श्री . व्यंकटेश बालाजी भगवान यांची मोठ्या भक्तिभावाने संपूर्ण गावातून दिंडी काढून व गावातील प्रत्येक मंदिरामधे बालाजी महाराज यांची पालखी सहीत भेट देत मोठ्या भक्तिभावाने बिदाई देण्यात आली.

# शेतकऱ्यांची 'काळी दिवाळी'-अचलपूर तहसील

## कार्यालयासमोर कॉंग्रेसचे शिदोरी आंदोलन



**अचलपूर/प्रतिनिधीः-** राज्यातील शेतकरी मोठ्या आर्थिक विवंचनेत असताना, महाराष्ट्र शासनाने दिवाळीच्या तोंडावरही कोणतीही मदत, कर्जमाफी किंवा दिलासा जाहीर न केल्यामुळे शेतकऱ्यांच्या नाराजीत प्रचंड वाढ झाली आहे. शासनाच्या या नाकर्तेपणाचा तीव्र निषेध करण्यासाठी अचलपूर तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने 'शेतकऱ्यांची काळी दिवाळी' या आंदोलनाचे आयोजन तहसील कार्यालयासमोर करण्यात आले.या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष बबलू देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. आंदोलनादरम्यान कॉंग्रेस कार्यकर्ते व शेतकऱ्यांनी प्रतीकात्मक पद्धतीने 'शिदोरी' (झुणका-भाकर) खाऊन शासनाच्या उदासीन धोरणाचा निषेध नोंदविला.

शेतकऱ्यांच्या आयुष्यात दिवाळीसारखा सण साजरा करण्याची वेळ नसून, शासनाच्या निष्क्रियतेमुळे त्यांच्या अंगणात अंधार पसरलेला आहे, अशी भावना या आंदोलनात व्यक्त करण्यात आली. या आंदोलनात तालुका व शहरातील कॉंग्रेस पदाधिकारी तसेच शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. हे आंदोलन जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष बबलू देशमुख यांच्या नेतृत्वात घेण्यात आले. या आंदोलनात माजी जिल्हा सदस्य वासंतीताई मांगरोळे,महिला तालुका अध्यक्ष अश्विनीताई पेटकर,तालुका अध्यक्ष नामदेवराव तनपुरे, शहर अध्यक्ष श्रीकांत झोडपे, उपसभापती अमोल चिमोटे, देवेंद्र पेटकर, श्रीधर काळे, राहुल गाठे, सचिदानंद बेलसरे, दिनेश वानखडे, अमोल बोरेकर, सईद मौलाना,कैलास आवारे,राजेश काळे,रवींद्र हरणे, नितेश दाभाडे, गजानन टापरे, प्रशांत गोरले, श्रीकांत अपाले, हबीब खा पठाण, ममराज कडू, नितीन खालोकार, गणेशराव बेलसरे,राजीव कळमकर, अशोकराव दाणे,प्रमोद काळे,विनायकराव चौधरी,विजय बेलसरे, नितीन बोन्डे,जय घोरे, आगाभाई,देवेंद्र ठाकरे,संजय शेटे, बाबा बुंदेले, नईमभाई, रवी शुक्ला, अज्ञेश पेटकर, अर्जाज पटेल, महेरुल्लाभाई, अहमदभाई, कदीर पेहलबान,आदी कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भातकुलीतील शेतकऱ्याचा ट्रॅक्टर चोरीला

**अमरावती :** भातकुली तालुक्यातील गजानन नगर येथील रहिवासी सदानंद पांडुरंग बोचे (वय ३९) यांच्या मालकीचा ट्रॅक्टर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी बोचे यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचा मॅसी फर्ग्युसन कंपनीचा ट्रॅक्टर हा शनिवारी (दि. १८) रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास गजानन नगर येथील त्यांच्या शेताजवळ उभा होता. दुसऱ्या दिवशी (१९ ऑक्टोबर) सकाळी ६ वाजता त्यांनी ठिकाणी जाऊन पाहिले असता ट्रॅक्टर जागेवरून गायब असल्याचे निदर्शनास आले. सुमारे पाच लाख रुपयांचा हा ट्रॅक्टर अज्ञात इसमांनी चोरी केल्याचा संशय आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून, अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# लायन्स रियल ने केला साहसी बालिका करीना थापाचा सत्कार





**अमरावती /प्रतिनिधीः-** कठोर नाका परिसरातील एका संकुलात आग लागली असता आपल्या जिवाची परवा न करतात त्या घरातून गॅस सिलेंडर बाहेर काढत संकुलातील ७० कुटुंबियांना हानीपासून वाचवणाऱ्या करीना थापा या धाडसी बालिकेला पुढे राष्ट्रपती पुरस्कार मिळाला.

या साहसी बालिकेचा लायन्स सप्ताह अंतर्गत एका कार्यक्रमात डॉ. गोविंद कासट मित्र मंडळींना सुचवल्या वरून लायन्स क्लब ऑफ अमरावती ने सत्कार केला. लायन्स रियल अध्यक्ष मनोज मिश्रा व डॉ. गोविंद कासट यांच्या हस्ते झालेल्या या सरकार प्रसंगी माजी अध्यक्ष चेतन पाटील, हरेश उदासी, लक्ष्मीकांत जोशी, प्रकाश मनोजा, श्याम जडिया, रोशन पच्चीगर , हेमंत पच्चीगर व नरेंद्र तायडे हजर होते.





**अमरावती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय फ्रेजरपुरा अमरावती येथे बुधवार दि. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारताचे पूर्व राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# स्व. आर.जी. देशमुख कृषी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस उत्साहात



**तिवसा/प्रतिनिधीः-** डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती दिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्म दिवस शालेय तसेच महाविद्यालय स्तरावर साजरा केला जातो. त्यानिमित्त मानव सेवा प्रतिष्ठान वाडी नागपूर, द्वारा संचलित स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय, तिवसा, येथे १५ ऑक्टोबर २०२५ रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण डहाके यांनी डॉ . कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा आणि त्यांच्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा सखोल परिचय करून दिला व विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. प्राध्यापिका भारती नाल्हे यांनी केले व या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण डहाके, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विविध पुस्तकांच्या वाचनाचा आनंद घेण्यात आला.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ४४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री ईश्वर मुन्नासिंग जाधव, वय-३७ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. मोगरा, पो.भानखेडा खु. ता. जि. अमरावती यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन जाहिर नोटीस देतो ती येणेप्रमाणे -१). मौजा मुंडनारायण ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर चे हद्यीतील शेत सर्वे नं. १५/१अ प्लॉट नं. ९, एकुण क्षेत्रफळ १५१ चौ. मीटर (१६२४.७६ चौ. फुट) यापैकी दक्षिण उत्तर हद्य पाडुन पुर्वकडील ७५.५ चौ. मीटर (८१२.३८चौ. फुट) व तसेच नगर पंचायत कार्यालय, नांदगाव खंडेश्वर मधील प्रभाग क्रमांक ४ मधील प्लॉट नं. ४०८, ज्याच्या चतुः सिमा- पुर्वस-प्लॉट नं.१०, पश्चिमेस-याच प्लॉटमधील उर्वरित भाग, दक्षिणेस-लेआऊट रोड, उत्तरेस श्रीराम नगर या प्लॉटचे विभाजन करुन देवुन विकत घेण्याचा सौदा माझे पक्षकाराने श्री राहुल चंद्रभान बांगर वय-४१ वर्षे, व्यवसाय-शेती, व जयमाला राहुल बांगर, वय-३८ वर्षे व्यवसाय शेती रा. सावनेर, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती यांच्या सोबत केलेला आहे, त्यावरुन त्यांनी माझ्या पक्षकारास दोन साक्षीदारासमंक्ष नोटरी ईसारचिट्टी दिनांक २९/०४/२०२५ रोजी दोन साक्षीदारासमंक्ष करुन दिलेली आहे.
२) माझे पक्षकार सदर प्लॉटची खरेदी दिनांक २८/१०/२०२५ रोजी खरेदी करणार आहे, तरी सदर प्लॉटच्या खरेदी पुर्वी, सदर प्लॉटवर कोणाचा बोजा, कोणास गहाण, ईसारचिट्टी, खरेदी खत व बँकेचे बोजा, बँकेस गहाण असेल तर आपन माझे पक्षकारास किंवा मला सात दिवसाचे आत खरेदी होण्यापुर्वी कळवावे, त्यानंतर माझे पक्षकार सदर प्लॉटची खरेदी करेल, त्यानंतर कोणाचाही गहाण, बोजा, ईसारचिट्टी, खरेदी खत व बँकेचा बोजा विचारात घेतल्या जाणार नाही, व तसेच त्याबाबतची हरकत विचारात घेतली जाणार नाही, करिता सदरची जाहीर नोटीस देत आहे.

दिनांकः- २०/१०/२०२५

**पक्षकारातर्फे अधिवकता**
**(ॲड पि.एम. ठाकरे)**
गुरूकृपा निवास पोलिस स्टेशनजवळ नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती न्यू विजय नगर,अमरावती बडनेरा जुना बायपासच्या बाजूला राजस्थान मार्बल अमरावती मो. नं.९४२३६४८३६५,;९९२१०७५०६९

## नायब तहसिलदार महसूल अमरावती यांचे न्यायालय, अमरावती

रा.मा.क्र.आर.टी.एस-६४/वलगाव भाग-२/ /२०२४-२०२५
क्रमांकः-म.सहा./प्रस्तु-४/कावि-९८०/२०२५ दि.:- ८/१०/२०२५

### जाहीरनामा

सदर्हु जाहीरनाम्यानुसार सर्व संबंधितांना जाहिरपणे सुचित करण्यात येते की, मौजा वलगाव भाग-२ भुमापन क्रमांक ४६४ खातेदार सुधाकर नामदेव बोवडे खाते क्रमांक १५८० यांच्या ७/१२ वर सिताराम महाराज संस्थान हे नाव चुकीने नोंद झालेली आहे.ती नोंद कमी करून ७/१२ दुरूस्त करून ऑनलाईन रेकॉर्डवरून कमी करण्याबाबत अर्जदार नरेंद्र सुधाकर बोबडे रा. वलगाव ता.जि. अमरावती यांनी अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

करीता वरील प्रकरणात कुणाची काही हरकत वा आक्षेप असल्यास त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत आपले आक्षेप अर्ज स्वतः वारसामार्फत किंवा वकीलामार्फत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावे. त्यानंतर येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

**नायब तहसिलदार**
**महसुल अमरावती.**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री ईश्वर मुन्नासिंग जाधव, वय-३७ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. मोगरा, पो.भानखेडा खु. ता. जि. अमरावती यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन जाहिर नोटीस देतो ती येणेप्रमाणे -१). मौजा मुंडनारायण ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर चे हद्यीतील शेत सर्वे नं. १५/१अ प्लॉट नं. ९, एकुण क्षेत्रफळ १५१ चौ. मीटर (१६२४.७६ चौ. फुट) यापैकी दक्षिण उत्तर हद्य पाडुन पुर्वकडील ७५.५ चौ. मीटर (८१२.३८चौ. फुट) व तसेच नगर पचायत कार्यालय, नांदगाव खंडेश्वर मधील प्रभाग क्रमांक ४ मधील प्लॉट नं. ४०८, ज्याच्या चतुः सिमा- पुर्वस-प्लॉट नं.१०, पश्चिमेस-याच प्लॉटमधील उर्वरित भाग, दक्षिणेस-लेआऊट रोड, उत्तरेस श्रीराम नगर या प्लॉटचे विभाजन करुन देवुन विकत घेण्याचा सौदा माझे पक्षकाराने श्री राहुल चंद्रभान बांगर वय-४१ वर्षे, व्यवसाय-शेती, व जयमाला राहुल बांगर, वय-३८ वर्षे व्यवसाय शेती रा. सावनेर, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती यांच्या सोबत केलेला आहे, त्यावरुन त्यांनी माझ्या पक्षकारास दोन साक्षीदारासमंक्ष नोटरी ईसारचिट्टी दिनांक २९/०४/२०२५ रोजी दोन साक्षीदारासमंक्ष करुन दिलेली आहे.२) माझे पक्षकार सदर प्लॉटची खरेदी दिनांक २८/१०/२०२५ रोजी खरेदी करणार आहे, तरी सदर प्लॉटच्या खरेदी पुर्वी, सदर प्लॉटवर कोणाचा बोजा, कोणास गहाण, ईसारचिट्टी, खरेदी खत व बँकेचे बोजा, बँकेस गहाण असेल तर आपन माझे पक्षकारास किंवा मला सात दिवसाचे आत खरेदी होण्यापुर्वी कळवावे, त्यानंतर माझे पक्षकार सदर प्लॉटची खरेदी करेल, त्यानंतर कोणाचाही गहाण, बोजा, ईसारचिट्टी, खरेदी खत व बँकेचा बोजा विचारात घेतल्या जाणार नाही, व तसेच त्याबाबतची हरकत विचारात घेतली जाणार नाही, करिता सदरची जाहीर नोटीस देत आहे.

दिनांकः- २०/१०/२०२५

**पक्षकारातर्फे अधिवकता**
**(ॲड पि.एम. ठाकरे)**
गुरूकृपा निवास पोलिस स्टेशनजवळ नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती न्यू विजय नगर,अमरावती बडनेरा जुना बायपासच्या बाजूला राजस्थान मार्बल अमरावती मो. नं.९४२३६४८३६५,;९९२१०७५०६९

# घरपट्टी वसुलीत अपहार प्रकरणाची चौकशी थंडबस्त्यात!

## सावरगावच्या ग्रामपंचायत सदस्यांची सीईओकडे धाव

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सावरगाव ग्रामपंचायतीत सरपंच, तिचा पती, मुलगा आणि तत्कालीन ग्रामसेवक यांनी नागरिकांकडून वसूल केलेली घरपट्टी शासनाच्या खात्यात जमा न करता ती रक्कम अपहार केल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायत सदस्य जानू बाबूसिंग राठोड यांनी केला आहे.

राठोड यांनी दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी या संदर्भात पातूर गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दिली होती. त्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी १८ सप्टेंबर रोजी चौकशी समिती गठित केली. या समितीत विस्तार अधिकारी अनंत लव्हाळे, कनिष्ठ अभियंता एन. एस. मोरे आणि क. ले. अ.



व्ही. एस. थोटे यांचा समावेश होता. समितीने २६ सप्टेंबर रोजी सावरगाव ग्रामपंचायतीत चौकशी केली.

मात्र, दोन आठवड्यांपेक्षा अधिक कालावधी उलटूनही संबंधित तक्रारदारास चौकशी अहवाल देण्यात आलेला नाही. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्य जानू राठोड यांनी ९ ऑक्टोबर रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्याकडे पुन्हा तक्रार दाखल करून, पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. राठोड यांच्या म्हणण्यानुसार, '२६ सप्टेंबर रोजी समितीमार्फत घरपट्टी वसुलीतील अपहार प्रकरणाची चौकशी करण्यात आली. त्यानंतर वारंवार चौकशी अहवाल मागूनही समितीकडून देण्यास नकार देण्यात आला. त्यामुळे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत आहे. आम्ही सीईओकडे पुन्हा तक्रार दिली असून, पारदर्शक चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे.'

**ग्रामस्थांची लुबाडणूक – १,०४,७३१ रुपयांचा अपहार उघड! :** सावरगाव येथील ग्रामस्थांकडून वसूल करण्यात आलेल्या ?१,०४,७३१ घरपट्टी रकमेचा अपहार झाल्याचे ग्रामपंचायत सदस्यांनी मिळवलेल्या माहितीद्वारे उघड झाले आहे. तथापि, सव्वा महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही थातूरमातूर चौकशी करून प्रकरण थंडबस्त्यात ठेवण्यात आले आहे. कारवाई होणार की अभय मिळणार? याकडे सावरगाववासीयांचे लक्ष लागले आहे.

# दोन दिवसात पुन्हा शस्त्रसाठा जप्त

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

हिवरखेड हे आधीच संवेदनशील शहर असून येथे चक्क दोन दिवसात दोन वेळा पोलिसांनी घातक शस्त्र साठा जप्त केल्याने हिवरखेड शहरातील वातावरण खराब करण्याची तयारी तर नाही ना? अशी भीती हिवरखेड मधील नागरिकांमध्ये पसरली आहे.

अकोला पोलीस अधीक्षक, अर्चित चांडक यांचे निर्देशा प्रमाणे अकोला जिल्ह्यात अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या लोकांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात आली. दि.१७/१०/२०२५ रोजी हिवरखेड शहरात पोलीसांना गुप्त माहीती मिळाली की आरोपी नामे अमीर खॉ तस्लीम खॉ रा. इंदीरा नगर हिवरखेड ता. तेल्हारा जि. अकोला याने याचे ताब्यातील लोखंडी शस्त्रे ही आरोपी नामे मकसूद खॉ शेर खॉ याचे ताब्यात दिली आहेत अशी



**हिवरखेडमधील नागरिकांमध्ये भीतीचे सावट**

गुप्त माहिती मिळाल्या वरून पंचांचे मदतीने रेड केली असता आरोपी नामे मकसुद खॉ शेर खॉ वय २२ वर्षे रा.इंदिरा नगर, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला याचे घरात रेड मारून पाहणी केली असता त्याचे घरातुन एकुण तीन लोंखडी तलवारी, एक लोखंडी कोयता, दोन लोखंडी सुरे, एक लाकडी बांबूच्या काठीचा भाला त्याचेवर लोखंडी पाते असा एकुण १६,००/- रु. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतां विरूध्द पो.स्टे. ला अप.नं. २८०/२०२५ कलम ४,२५ शस्त्र अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधिक्षक, बि. चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलीस अधिक्षक निखील पाटील, यांचे मार्गदर्शनात स.पो.नि. ठाणेदार गजानन राठोड, पोउपनि गोपाल गिलबिले, पो. हवा. गणेश साबळे, प्रमोद चव्हाण, राजेश वसे, पो. कॉ नितीन पाटील, म. पो. कॉ. अश्वीनी करवते, नेहा सोनवने यानी केली आहे.

# मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाने गरजूंना वितरीत केले दीपावली किट



■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक व मानवीय सेवा कार्यात सदा सक्रिय असणाऱ्या मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे यावर्षीही दीपावली पर्वात २०० गरजुंना घरी जाऊन दीपावली फराळ व पूजा साहित्य किट वितरीत केली. त्याचप्रमाणे मंडळाच्या वतीने रस्त्यावर दीपावलीचे साहित्य विक्री करणाऱ्या ग्रामीण भागातील महिला, पुरुष विक्रेत्यांना ब्लॅंकेट्स, भोजन व दीपावली साहित्य किट वितरित करण्यात आले. या उपक्रमात. ग्रामीण भागातील दीपावली साहित्य करणाऱ्या महिला पुरुष विक्रेत्यांनी उस्फूर्त प्रतिसाद देत ब्लॅंकेट व भोजनाचा लाभ घेतला.

मंडळाचे मार्गदर्शक शरद चांडक, ब्रजेश तापडिया यांच्या मार्गदर्शनात व मंडळाचे अध्यक्ष नितीन चांडक, सचिव जतीन राठी यांच्या उपस्थितीत या वितरण उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी कांबळ व भोजन पॅकेट गांधी रोड ,गांधी चौक, ओपन थिएटर, तहसील चौक, गोरक्षण रोड , तुकाराम चौक, जठारपेठ, रेल्वे स्टेशन, जुने कापड बाजार येथे ग्रामीण भागातून येऊन रस्त्यावर दीपावली साहित्य विक्री करणाऱ्या महिला पुरुष फुटपाथ विक्रेत्यां ना भोजनाचे पॅकेट, कांबळ व दीपावली पूजन साहित्याची किट प्रदान करण्यात आली.

# भारतीय संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

सांस्कृतिक कार्य विभागाच्या 'जागर संविधानाचा' या उपक्रमातील 'संविधान शिल्पकार' या नाटकाला अकोलेकरांचा मोठा प्रतिसाद लाभला. संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन कार्य, संविधानाची निर्मिती, राज्यघटनेच्या प्रास्ताविकाचे महत्त्व असे अनेक पैलू अधोरेखित करत अनेक कलावंतांचा समावेश असलेल्या या महानाट्याच्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांना जिंकून घेतले.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'जागर संविधानाचा' हा दोन दिवशीय सांस्कृतिक कार्यक्रम प्रमिलाताई ओक सभागृह येथे झाला. भारतीय संविधान अमृत महोत्सव



वर्षानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली तसेच विभागाचे संचालक बिभीषण चवरे यांच्या नियोजनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यानुसार पहिल्या दिवशी १६ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध गायक स्मित वंजारी, पवन रामटेके, पंकज जाधव, आणि गायिका स्नेहा तिडके यांचा संविधानावर आधारित सुमधुर गीतांचा कार्यक्रम झाला. संविधानाचे महत्व सांगणाऱ्या अनेकविध सुंदर गीतांनी रसिकांना जिंकून घेतले. शुक्रवारी झालेल्या संविधान शिल्पकार नाट्य प्रयोगाला रसिकांची मोठी गर्दी होती. या कार्यक्रमात एकूण ५० कलावंतांनी भाग घेतला.

# महावितरण अकोला जिल्ह्यात बेरोजगार अभियंताना विविध कामाचे लॉटरीपध्दतीने वाटप

■ प्रतिनिधी | अकोला ■

महावितरण मधील विद्युत कामे बेरोजगार विद्युत अभियंत्यांना विना स्पर्धा आणि अत्यंत पारदर्शक थेट लॉटरी पद्धतीने देण्याचे धोरणाला बांधील राहून, अकोला जिल्हा कार्यालयाअंतर्गत करावयाच्या १ कोटी ५३ लाखाच्या कामाचे वाटप ३३ बेरोजगार विद्युत अभियंत्यांना करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची संधी महावितरणने उपलब्ध करून दिली आहे.

महावितरणच्या ' विद्युत भवन 'येथे निमंत्रित बेरोजगार अभियंत्यांच्या उपस्थितीत लॉटरी पद्धतीने या कामांचे वाटप करण्यात आले असून यात जिल्हा विकास नियोजना अंतर्गत करावयाचा कामाचा समावेश आहे . महावितरणच्या अकोला जिल्ह्याच्या अधीक्षक अभियंता प्रतिक्षा शंभरकर यांच्या मार्गदर्शनात आणि कार्यकारी अभियंता अजितपालसिंहस दिनोरे यांच्या उपस्थितीत बेरोजगार अभियंतांना द्यावयाच्या कामाच्या लॉटरीची (दि.१६ )सोडत करण्यात आली. यात निमंत्रित केलेल्या ३३ बेरोजगार अभियंतांना सुमारे १ कोटी ५३ लाख कामाचे वाटप करण्यात आले आहेत.

विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवी किंवा पदविकाधारक बेरोजगार अभियंत्यांना महावितरणतर्फे १० लाख रुपयापर्यंतची कामे बिना स्पर्धा थेट लॉटरी पद्धतीने देण्याचे धोरण आहे .

# निलेश देव मित्र मंडळाच्या उपक्रमाने मेळघाटात दिवाळी साजरी

## ॲड.धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प अंतर्गत केले कपडे वाटप



■ प्रतिनिधी | अकोला ■

मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील आढाऊ, चिखली, पातोडा, तारुबांदा शहानुर गावांमध्ये निलेश देव मित्र मंडळाच्या 'दिवाळी भेट ' उपक्रमातून गोरगरिबांना कपडे व इतर वस्तू आज पाठविल्या गेल्या. या वेळी सामर्थ्य फाउंडेशन विनोद देव, प्रबोध देशपांडे, ब्राह्मण व्यापारी संघ अध्यक्ष आशिष अमीन, श्रीकांत चाळीसगाकर, लायन्स क्लब ऑफ मिडटाऊन गोल्ड निलेश पवार यांची उपस्थिती होती.

माजी नगरसेविका ॲड.धनश्री देव अभ्यंकर यांच्या पाचव्या स्मृती दिनी त्यांना अभिवादन करण्यात आले. सामाजिक कार्यामध्ये नेहमी विविध लोकोपयोगी समाज हिताचे आगळेवेगळे उपक्रम राबविणाऱ्या ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प द्वारा संचालित निलेश देव मित्र मंडळाने 'जुने कपडे संकलन शिबिर' आयोजित करून या शिबिरात प्राप्त झालेले कपडे व फराळ, भेट वस्तू आज मेळघाटातील आढाऊ, चिखली, तारुबांदा गावांमधील गोरगरिबांसाठी नेण्यात आले. हे कपडे मेळघाटात पोहोचविण्यासाठी सकाळी स्थानिक सातव चौकातून दोन वाहनांसह संकल्प रथ रवाना करण्यात आले.

यावेळी सार्मथ्य फाउंडेशन अध्यक्ष विनोद देव, प्रबोध देशपांडे, श्रीराम देशपांडे, डॉ गजानन वाघोडे सह सार्मथ्य फाउंडेशन संपूर्ण टिम, लायन्स क्लब ऑफ मिडटाऊन चे अध्यक्ष निलेश पवार,, , सोमेश्वर मोटे, निलेश जी हाडोळे , ब्राह्मण व्यापारी संघ अध्यक्ष आशिष अमीन, सतिश खोडवे , यांची उपस्थिती होती. निलेश देव मित्र मंडळाने चिखलदरा तालुक्यातील गावात जावून गावातील प्रत्येकाला घरात कपडे, फराळ, फटाके, चपला जोड वाटप केले. यावेळी निलेश देव, जयंत सरदेशपांडे, दिलीप काका देशपांडे, रामहरी डांगे, अजय शास्ती, शरद जोशी, राजु गुन्नलवार, श्रीराम उमरेकर, नितीन गव्हारे,, राजू कनोजिया, अजय शास्त्री, राजु सोनी, विजय वाघ, , रविंद्र मेश्राम,, भास्कर बैतवार, नरेंद्र परदेसी, रमेश खिलोसिया, आशु यादव, शशि हिवरखेडकर, प्रदिप बांधोकार, दत्ता भाबेरे, कीरण मारवाल, विनोद भाबेरे, प्रसाद देशपांडे, अनिल कुकलवार, विजय भुजबळ काका, स्वराज बिलबिले हरिशचंद्र राठोड, प्रसाद देशपांडे, अनिरुद्ध भाजीपाले, पियुष पाटील, गिरीश गांधी, सुमेध लोखंडे, गिरीश लोखंडे, रुपेश ठाकरे, कुष्णा घाटोळे, सार्थक देव, मयुरेश पवार, संजय वडारकर, कार्तिक वडारकर, निलेश दुधलम, सह अनेक सदस्य उपस्थित होते.

# जिल्ह्यातील बळीराजाच्या विकासाकरीता तंत्रज्ञानाची जोड आवश्यक - विजय नाकरा

**अकोला :** शेतकऱ्यांना सुरक्षित, आरामदायी आणि हवामान-प्रतिरोधक कार्यक्षेत्र उपलब्ध करून करून देण्याची गरज आहे. कॅबिनमुळे वर्षभर शेती कामे सुलभ होतात आणि उत्पादकता वाढते. जीएईएल यांनी ४डब्ल्यूडी आणि २डब्ल्यूडी कॅटेगिरीमध्ये ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च केले आहेत. यामध्ये भारतातील पहिली फॅक्टरी-फिटेड कॅबिन सिरीज समाविष्ट आहे. ग्रोमॅक्सच्या दमदार आणि इंधन-कार्यक्षम डिझेल इंजिन्स तसेच जागतिक दर्जाच्या गिअरबॉक्स तंत्रज्ञानावर चालणारे हे नवे ट्रॅक्टर उच्च परफॉर्मन्ससाठी ओळखले जातात आणि वापरण्यास सोपे आहेत.


## वनपरिक्षेत्र अधिकारी वन्यजिव परिक्षेत्र वान यांचे कार्यालय ता. तेल्हारा जि. अमरावती

### B-1 निविदा सूचना क्र. २ सन २०२५-२६

वनपरिक्षेत्र अधिकारी, सोनाळा परिक्षेत्र कार्यालयामध्ये खाली नमुद केलेल्या कामांचे मोहरबंद निविदा B-I नमुना प्रपत्रात सार्वजनिक बांधकाम विभागाचे ५- अ व त्यावरील पंजिबध्द असलेल्या कंत्राटदारांकडुन मागवित आहे.

| B-निविदा सुचना | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | निविदा फॉर्म किंमत | कामाची अंदाजीत किंमत | अमानत रक्कम १ | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing and Fixing Chain Link Fencing at Wari Beat Comp No. B1/B2 in Wan Range | B-1 | 500 | 788020 | 7886 | २० दिवस | सु. बे. |
| 2 | Providing and Fixing Chain-Link Fencing on Parking area Near Wari Hanuman Mandir At Wari Beat Comp No. C1 in Wan Range | B-1 | 500 | 783920 | 7839 | २० दिवस | सु. बे. |
| 3 | Providing and Fixing Chain-Link Fencing on Parking area Near Wari Hanuman Mandir At Wari Beat Comp No. C1/B1 in Wan Range | B-1 | 500 | 787200 | 7872 | २० दिवस | सु. बे. |
| 4 | वान परिक्षेत्रातील नागरतास वर्तुळ, वारी बिट कक्ष क्र. CI (भाग-II) मधील ओघळ नियंत्रण कामे (Gully Plugging Work) एकुण 5750.00 घ.मी. | B-1 | 500 | 787750 | 7878 | २० दिवस | सु. बे. |
| | एकुण | | | 3146890 | 31469 | | |

अटी व शती :-
१. निविदेत नमुद केलेली अंदाजीत रक्कमेत बदल होवु शकते.
२. कोरी निविदा प्रपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी, सोनाळा यांचे कार्यालयात दि. २०/१०/२०२५ ते २७/१०/२०२५ दुपारी १४.०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध राहतील. (शासकीय सुटीचे दिवसीही विक्रीस उपलब्ध राहिल)
३. निविदा सादर करण्याची अंतीम तारीख २७/१०/२०२५ दुपारी १७.०० वाजे पर्यंत राहील. निविदेची प्रत टपालाने पाठविता येणार नाही.
४. निविदा दिनांक २८/१०/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. वनपरिक्षेत्र अधिकारी, वान यांचे कार्यालयात उपस्थित निविदाधार कंत्राटदारासमोर उघडण्यात येईल.
५. अ) बोली पात्रता लिफाफाः- उपरोलिखीत करुन त्यात खालील दस्ताऐवज/ सत्यप्रत सिलबंद करावे a) सार्वजनिक / उपनिबंधक विभागाचे कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्रं ) b) वस्तु व सेवाकर (GST) प्रमाणपत्र (C) मागील तिन वित्तीय वर्षाचे आयकर व पॅन कार्ड छायाप्रती F) Annexure-1 सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये परिपूर्ण स्वाक्षरीसह भरणे बंधनकारक आहे.
ब) किंमत बोली लिफाफा :- अपरोलिखीत करुन त्यास या कार्यालयातून खरेदी केलेले निविदा प्रपत्रात रितसर दर भरलेले व सही केलेले असावे सदर लिफाफा सिलबंद असवा.
६. प्राप्त झलेल्या निविदा दिनांक २८/१०/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. निविदा उघडते वेळी हजर राहावयास इच्छुक निविदाकत्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीच्या उपस्थितीत उघडण्यात येईल. लिफाफा क्र. १ मध्ये प्रस्तुत करण्यात आलेली कागदपत्रे समाधानकारक व परिपूर्ण आढळुन आली तरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.
७. निविदाकर्त्यांला निविदा प्रपत्र जारी करणे याचा अर्ज निविदाकर्ता निविदा उघडण्यासाठी पात्र झाला असे नाही, पात्रता बोली (लिफाफा क्र. १) प्रथम उघडण्यात येईल व त्यानंतर ते पत्र असल्यास निविदा बोली (निफाफा क्र. २) उघडण्यात येईल.
८. उपरोक्त कामाकरीता प्रशासकीय मान्यता / अनुदान उपलब्ध झाल्यानंतरच कार्यारंभ आदेश जारी करण्यात येतील तसेच कुठलेही कारण न देता कोणतीही किंवा सर्वच निविदा फेटाळण्याचा अधिकार, उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प अकोट वन्यजिव विभाग अकोट यांचेकडे सुरक्षीत आहे.

क्रमांक/वपअ/वान / ५७०/-
वान, दिनांक १८/१०/२०२५

**वन परिक्षेत्र अधिकारी**
वान परिक्षेत्र



### जाहीर नोटीस

**सह दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**दयानंद मारूती वाघमारे यांचे न्यायालयात सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/ २५७/२०२५ — प्रोसेस नं.२४१०
सुमनबाई बाबूलाल सरवरे वि. बन्सीलाल बाबूलाल सरवरे
पुढिल तारिख : २९-११-२०२५

**अर्जदार :** १. सुमनबाई बाबुलाल सरवरे वय अं.७५ वर्ष धंदा निरंक २. सतिश बाबुलाल सरवरे वय अं. ५५ वर्ष धंदा मजुरी ३. कुंदनलाल बाबुलाल सरवरे वय अं.५३ वर्ष धंदा मजुरी ४. चंदन बाबुलाल सरवरे वय अं.४३ वर्ष धंदा मजुरी अर्जदार कं. १ ते ४ रा. चौबेपुरा बाळापुर ता. बाळापुर जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** बन्सीलाल बाबुलाल सरवरे वय अं. सज्ञान धंदा मजुरी रा. चौबेपुरा बाळापुर ता. बाळापुर जि. अकोला.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत बाबुलाल लक्ष्मणलाल सरवरे हे दिनांक ०९.०१.१९९७ रोजी राहते घरी वार्ड कं. ८ चौबेपुरा बाळापुर ता. बाळापुर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद सर्व अर्जदार व गैरअर्जदार यांना मयत बाबुलाल लक्ष्मणलाल सरवरे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २९.११.२०२५ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०१.१०.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहायक अधिक्षकी (न्यायीक)**
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर



जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com



### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९०३/२०२५ — प्रोसेस नं.१७३४६/२०२५
चौ.ता. २४/११/२०२५ — दिनांक : १५/१०/२०२५

**अर्जदार :** १. सुशिला लक्ष्मण रंगारी रा. समर्थ अशोक बौद्ध जवळ, गुलजार पुरा, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मैनाबाई परशराम सहारे २. परशराम दयाराम सहारे
**पत्ता :-** दोघेही रा. समर्थ अशोक बौद्ध जवळ, गुलजार पुरा, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मैनाबाई परशराम सहारे यांचे दि. ०९/०७/२०२५ रोजी व तसेच मयत परशराम दयाराम सहारे यांचे दि. १३/०१/१९८९ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे. गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



### जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८२२/२०२५ — प्रोसेस नं.१७२९३/२०२५
चौ.ता. १५/११/२०२५ — दिनांक : १३/१०/२०२५

**अर्जदार :** १. गजानन विठ्ठल गिरी रा. मु. पो. आखातवाडा, ता. जि. अकोला. २. सौ. रंजना संतोष गिरी रा. मु. पो. दानापूर, ता. तेल्हारा, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विठ्ठलगिर किसनगिर गिरी २. रत्नप्रभा विठ्ठलगिर गिरी
**पत्ता :-** दोघेही रा. मु. पो. आखातवाडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विठ्ठलगिर किसनगिर गिरी यांचे दि. १७/०८/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे व तसेच मयत रत्नप्रभा विठ्ठलगिर गिरी यांचे दि. १६/०८/१९९४ रोजी आखातवाडा, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९०२/२०२५ — प्रोसेस नं.१७२९६/२०२५
चौ.ता. २७/११/२०२५ — दिनांक : १४/१०/२०२५

**अर्जदार :** १. तातोबा गोपाल घोडेस्वार रा. रामटेके चक्की जवळ, गुलझारपूरा, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. गोपालराव लक्ष्मण घोडेस्वार २. इंदुबाई गोपालराव घोडेस्वार
**पत्ता :-** रा. दोघेही रा. रामटेके चक्की जवळ, गुलझारपूरा, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गोपालराव लक्ष्मण घोडेस्वार यांचे दि. २१/०७/२००० रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत इंदुबाई गोपालराव घोडेस्वार यांचे दि. ०२/०२/२०२१ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/११/ २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# शहरातील मोकाट कुत्रे व गुरांचा बंदोबस्त करा

## रायुकाँ (शरदचंद्र पवार गट) चे न.प. मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**वर्धा/जनमाध्यम**

शहरात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्रे व गुरांचा संचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच दुभाजकावर लावलेले सप्तपदीची वाढलेली झाडे अपघाताला निमंत्रण देत असल्याने तत्काळ बंदोबस्त करावा, अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटातर्फे नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले.

वर्धा शहरामध्ये मागील अनेक दिवसांपासून मोकाट जनावरे व कुत्रे यांचा मोठ्या प्रमाणात संचार वाढला आहे. चौकाचौकात व रस्त्यावर मोकाट कुत्रे तसेच जनावरे यांचे कळप नागरिकांसाठी डोकेदुखी झाले आहेत.

यामुळे अपघाताला चालना मिळत असून, कुत्र्यांनी चावा घेतल्याने काही नागरिक जखमीसुद्धा झाले आहेत. तसेच ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांनासुद्धा याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच शहरात दुभाजकावर लावलेले सप्तपदीची झाडे मोठ्या प्रमाणात वाढले असून, नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होत आहे. यामुळे नागरिकांना दम्यासारख्या आजाराचा त्रास वाढला आहे. त्यामुळे या सप्तपदीच्या वाढलेल्या झाडांची तत्काळ छटाई करावी व मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदन देताना राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) प्रदेश उपाध्यक्ष संदीप किटे, युवक जिल्हाध्यक्ष प्रणय कदम, राकाँ शहराध्यक्ष मुन्ना झाडे, सचिन ठाकरे, आकाश दाते, रवी संगतानी, राहुल घोडे, बंटी पाल, गणेश महाकाळकर, निकेश भुसारी, रोशन भुसारी, नेहाल वसू, अभी काळे, मनोज वाघ आदी उपस्थित होते.

# वर्ध्यात 'के-टी'चा भडका! पवार गटात सत्तास्फोट

## देशमुखांचे नाराजीचे फटाके, वांदिले मैदानात

**वर्धा/जनमाध्यम**

दिवाळीच्या आधीच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मध्ये वर्ध्यात सत्तेचा फटाका फुटला तब्बल १८ वर्षे जिल्हाध्यक्षपदी टिकलेले सुनील राऊत यांना पायउतार करत हिंगणघाटचे आंदोलनबाज नेते अतुल वांदिले यांचा झेंडा उंचावला गेला. या निर्णयाने माजी आमदार सुरेश देशमुख गटात तुफान संताप उसळला असून 'के विरुद्ध टी' असा उघड संघर्ष रंगला आहे.




शरद पवारांचे निकटवर्तीय मानले जाणारे देशमुख यांनी जिल्ह्यात संघटन उभे करण्याचा प्रयत्न केला, मात्र अपेक्षित परिणाम न मिळाल्याने पवारांनीच स्थिती पालटण्याचा निर्णय घेतला. पण हा बदल देशमुख गटाच्या घशात काटा ठरला. त्यांच्या समर्थकांनी निष्ठा फेकून दलबदलूंना पदे मिळणार? असा घणाघात करत रोष व्यक्त केला आहे. दलबदलू अतुल वांदिले हे हिंगणघाटातील अनेक लढ्यांमुळे चर्चेत आहेत. मनसेला झोपवणारा नेता म्हणून ओळखला जाणारा हा चेहरा आता राष्ट्रवादीलाही झोपवणार काय? असा प्रश्न वर्ध्यातील राजकारणात गुंजतो आहे. सुनील राऊत यांच्या अठरा वर्षांच्या कारकिर्दीनंतर हा बदल म्हणजे पवार गटात सत्ता बदलाचे सूचक वारे. देशमुख नाराज आहेत, कार्यकर्ते गोंधळलेत आणि पवारांच्या तंबूत संभ्रम पसरला आहे. राजकीय फटाक्यांच्या या स्फोटात दिवाळी आधीच राजकारण भाजून निघाले आहे. वर्ध्यातील राष्ट्रवादीची तळी हादरली आहेत, आणि आता खरी लढाई आहे, 'के'च्या निष्ठेची की 'टी'च्या राजकारणाची!

# पॅरामिलिटरी मित्रपरिवारतर्फे शहीद नितीन पुट्टेवार यांना श्रद्धांजली

**हिंगणघाट/जनमाध्यम**

देशासाठी हौतात्म्य पत्करलेल्या शहीद नितीन सुरेशराव पुट्टेवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ माजी पॅरामिलिटरी मित्रपरिवार कल्याणकारी चारिटेबल ट्रस्ट, हिंगणघाट तर्फे भारत विद्यालयाच्या पटांगणात श्रद्धांजली कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य हरीश भट्टड होते, तर प्रमुख पाहुणे प्रेमबाबू बसंतानी आणि शहिदांच्या मातोश्री प्रतिभा पुट्टेवार होत्या. या कार्यक्रमाला माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष पुंडलिक बकाने, शहीद चंद्रशेखर कोरे यांचे वडील सुरेश कोरे, माजी नगरसेविका शारर्दा पटेल आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक जानराव चांभारे यांनी तर सूत्रसंचालन मजीद बेग मुगल यांनी केले. २० ऑक्टोबर २००१ रोजी दिल्ली येथील सीआरपीएफच्या झाडोदा कला कॅम्पवर चार दहशतवाद्यांनी हल्ला केला. शहिद नितीन पुट्टेवार यांनी हत्यारांशिवाय शौर्याने सामना केला आणि प्रखर झुंज देत वीरमरण पत्करले. या कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवरांनी शहीदास पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शहिदांच्या आईस शाल-श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. रविंद्र नोकरकर यांनी परेड कमांड दिला, उपस्थितांनी भारत माता की जय व नितीन पुट्टेवार अमर रहे अशी घोषणांनी वातावरण भारावून गेले.

# गोठ्यातून दोन शेळयांची चोरी

**वर्धा-** अज्ञात चोरट्याने गोठ्यात बांधून असलेल्या दोन शेळ्या चोरून नेल्या. ही घटना वर्धा तालुक्यातील जऊळगाव शेतशिवारात घडली. शेळीपालक सकाळी गोठ्यात गेले तेव्हा तेथे दोन शेळ्या आढळून आल्या नाही. त्यांनी सर्वत्र शोध घेतला असता कोणतीच माहिती मिळाली नाही. रात्रीदरम्यान शेळ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे लक्षात आल्यानंतर याप्रकरणी प्रशांत दिगांबर चौधरी यांनी सेवाग्राम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. परजिल्ह्यातून आलेल्या चोरट्यांचा हा प्रताप असल्याची चर्चा आहे.

# बंजारा व धनगर समाज आरक्षण घुसखोरीविरोधात निवेदन

**वडनेर -** बंजारा व धनगर समाजाच्या आरक्षणातील घुसखोरीच्या विरोधात सकल आदिवासी कृती समिती, हिंगणघाट तर्फ उपविभागीय अधिकारी हिंगणघाट यांना निवेदन देण्यात आले. आदिवासींच्या आरक्षण हक्कांवर कुणाचीही गदा येऊ नये, अशी मागणी समितीने केली.निवेदन देताना उत्तमराव तोडसाम, शामराव कुळसंगे, सुरेशराव चांदेकर, विजयराव तोडसाम, कवडूजी सिडाम, शशिकांत कुळसंगे, बंडू मडावी, रमेश मडावी, सुरज सुरपाम, पंकज आत्राम, ओमकार मडावी, सुभाष आत्राम, पुंडलिकराव पेंदाम, महादेव शिडामे, उमेश मेश्राम, अनंता आत्राम आदींसह मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते.

**ट्रॅक्टर टँकरचालकास मारहाण**

**वर्धा :** ट्रॅक्टर टँकर बाजूला कर असे म्हणत वाद करून थंड पाण्याच्या कॅन वितरित करणाऱ्या मालवाहू चालकाने वाद करून ट्रॅक्टर टँकर चालकास काठीने मारहाण करून जखमी केले. ही घटना कारंजा येथील इंदिरा नगर भागात घडली. रामेश्वर हरीभजन ढोबाळे रा. कारंजा असे जखमीचे नाव आहे. त्यास प्रफुल्ल सातपुते रा. इंदिरा नगर, कारंजा याने मारहाण केल्याचे तक्रारीत नमुद असल्याचे कारंजा पोलिसांनी सांगितले.

# रेल्वेखाली येऊन सात गोमाता ठार, सहा जखमी

## जिवरक्षक फाउंडेशनच्या हस्तक्षेपामुळे दोन गायींचे प्राण वाचले

**हिंगणघाट/जनमाध्यम**

वसुबारस दिनी गावोगावी गोपूजनाचा सोहळा होत असतानाच हिंगणघाट जवळील नागपूर–काजीपेठ रेल्वेमार्गावर दुर्दैवी अपघात घडला. रेल्वेखाली येऊन सात गोमाता ठार, तर सहा जखमी झाल्या.

दुखापतग्रस्त गायींच्या उपचारासाठी जिवरक्षक फाउंडेशनने तत्परतेने कृती करत दोन गायींचे प्राण वाचवले.हिंगणघाट पासून केवळ अर्धा किलोमीटरवर ही घटना घडली. चंद्रपूरकडे जाणाऱ्या भरधाव रेल्वेने रुळांवर चरत असलेल्या १३ गायींना धडक दिली. सात गायींचा जागीच मृत्यू झाला, तर सहा गायी गंभीररीत्या जखमी झाल्या. ग्रामस्थांनी प्रशासनास सूचना दिल्या, मात्र तातडीची मदत न मिळाल्याने जिवरक्षक फाउंडेशनच्या पथकाने मध्यरात्री घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले.राकेश झाडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तीन रेल्वे रुळ ओलांडत मृत आणि जखमी गायी बाजूला केल्या. दोन गंभीर गायींना गावातील दानशूरांच्या मदतीने अमरावती येथील गोकुलम् गौरक्षण संस्थेत उपचारासाठी हलविण्यात आले. उर्वरित जखमी गायींवर स्थानिक उपचार सुरू आहेत.या कार्यात राकेश झाडे यांना दिनेश वर्मा, गोलू मडावी, भाविक कोपरकर, ओम कापसे, साहिल माहुरे आणि ॐ मेसरे यांनी सहकार्य केले. त्यांच्या संवेदनशील कार्याची परिसरात प्रशंसा होत आहे, तर रेल्वे प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.



# हजारो दिव्यांच्या प्रकाशात उजळले संभाजी महाराज स्मारक



**वर्धा/जनमाध्यम**

छत्रपती संभाजी महाराज स्मारक हे वर्ध्याचं केवळ सौंदर्य नव्हे तर शहराचा स्वाभिमान, संस्कृती आणि शौर्याचं प्रतीक आहे. गांधीनगर येथील स्मारक परिसरात १७ रोजी रौद्रशंभो दीपोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. दिवाळीचा पहिला दिवा शंभूराजांच्या चरणी अर्पण करण्यासाठी शेकडो नागरिकांनी उपस्थिती दर्शवली. सुमारे १५०० दिव्यांच्या तेजाने परिसर उजळून निघाला.

छत्रपती संभाजी महाराज समितीतर्फे शंभूतिर्थाचे प्रभावी प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. स्मारक परिसरात शंभूराजांच्या अटकेपासून बलिदानापर्यंतचा जीवनपट थ्रीडी इफेट आणि लेझर शोद्वारे सादर होणार आहे. नागपूर रोड ते बॅचलर रोडपर्यंतचे प्रवेशद्वार, रेखीव पथदिवे, भिंतीचित्रे, वाचनालय, व्यायामशाळा, खेळणी आणि पुतळा या माध्यमातून 'शंभूतिर्था'ला एक अद्वितीय रूप लाभणार आहे. या प्रसंगी परिसरातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. यशस्वीतेकरिता महेश मूधोळकर, शिरीष बंड, संतोष लांगोरे, पुरुषोत्तम आष्टेकर, रामदास भांदक्कर, राजेंद्र मिस्कीन, शेखर मेघे, सुरेंद्र पावडे, अतुल पिसे, सुभाष खंताळे, प्रफुल्ल केणे, अविनाश किटे, योगेश मैत्रे, प्रवीण क्षीरसागर, राम जोशी, संदीप ठाकरे, डॉ. आशिष ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांच्या संपूर्ण मागण्या निकाली न निघाल्यास तीव्र आंदोलन : बच्चू कडू

**समुद्रपूर/जनमाध्यम**

शेतकऱ्यांना कर्जमुक्त करा, शेतमालाची हमीभावात खरेदी करण्याकरिता कापूस व सोयाबीन खरेदी केंद्र तातडीने सुरू करा यासह इतर मागण्यांचा पुनरुच्चार करीत २८ ऑक्टोबरला नागपुरात आंदोलनास सुरुवात करणार आहोत. शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या शासनाने निकाली न काढल्यास नागपुरात अभिनव आंदोलन करण्याचा इशारा माजी मंत्री बच्चू कडू यांनी नंदोरी येथील शेतकरी एल्गार सभेत दिला.



छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी राहिलेल्या रायगड किल्ल्यावरून बच्चू कडू यांनी शेतकरी हक्क यात्रा सुरू केली. मधल्या काळात गुरुकुंज (मोझरी) येथे कर्जमाफीकरिता अन्नत्याग आंदोलन केले. त्यानंतर पायदळ वारी करीत विविध भागात जनजागृती करण्यात आली. आता २८ ऑक्टोबरला बुट्टीबोरी ते जामठा ही पायदळवारी करण्यात येणार आहे. त्यानंतर नागपुरात आंदोलनाला सुरुवात होईल. या आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याची मागणी करणार आहोत. त्यासोबतच शेतकऱ्यांना बोनस, पॉलीहाऊस, शेडनेट, बागायती शेतीकरिता बिनव्याजी कर्ज, दिव्यांगांना सहा हजार मानधन, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, अंगणवाडी सेविका, मदतनिस यांच्यासह इतर मागण्या या आंदोलनातून शासनाकडे करण्यात येईल. या आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी राहवे, असे आवाहन बच्चू कडू यांनी केले. व्यासपीठावर प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्याध्यक्ष बल्लू जवंजाळ, चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याचे निरीक्षक प्रवीण हेंडवे, माजी विदर्भप्रमुख गजानन कुबडे, जिल्हाप्रमुख सुरज कुबडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महेश झोटींग पाटील, परडा येथील उपसरपंच प्रवीण महाजन यांच्यासह इतरांची व्यासपीठावर उपस्थिती होती. सभेचे संचालन अमोल नगराळे यांनी केले. सभेच्या आयोजनाकरिता प्रहार सेवक, सार्वजनिक क्रीडा मंडळ पुरुष व महिला यांच्यासह शेतकऱ्यांनी सहकार्य केले.

## मोटरसायकल चालक अपघातात ठार

**हिंगणघाट-** हिंगणघाट ते वडनेर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७वरील घाटसावली परिसरात अपघात झाला. यामध्ये एक मोटरसायकल चालक ठार झाला. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, यशवंत नगर येथील बिपिन अशोकराव कांबळे (वय ३७) आपल्या पल्सर मोटरसायकलने वडनेर येथे नातेवाईकांच्या लग्नाला जात होते घाटसावली परिसरात समोरून येणाऱ्या अन्नात वाहनाने त्याना धडक दिली.

गंभीर जखमी अवस्थेत उपचारासाठी नेताना बिपिनचा मृत्यू झाला. मृतकाचा मोठा भाऊ, प्रशांत अशोक कांबळे (वय ४२) यांनी वडनेर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली असून.तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अपघाताची नोंद केली आहे. पोलीस हवालदार सचिन रोकडे ठाणेदार घनश्याम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहेत.

# भाषण स्पर्धेत अनिमेश पेटकर अव्वल

**विरुळ (आ.) -** अग्नीपंख इंटरनॅशनल फाउंडेशन, मुंबईद्वारे डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय ऑनलाइन भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत येथील जि.प. प्राथ. कन्या शाळेच्या अनिमेश पेटकर याने यश संपादन केले. सदर स्पर्धेत येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेच्या अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.



त्यात इयत्ता तिसरीचा विद्यार्थी अनिमेश विजय पेटकर याने पहिल्या चाळीस विद्यार्थ्यांमध्ये यश संपादन केले. एनइसी-२०२० चे ध्येय विद्यार्थ्यांना वैश्विक नागरिक बनविण्याचे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. जेणेकरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होईल, असे मत मुख्याध्यापिका शितल वडनेरकर यांनी व्यक्त केले. अनिमेशने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व शिक्षका भाग्यश्री मुडे यांना दिले आहे.

# 'आठवण बाबांची' कवितेला द्वितीय क्रमांकाचा मान

## मराठी साहित्य संमेलनात संगीता बढे यांचा सन्मान



**हिंगणघाट/जनमाध्यम**

मराठी साहित्यातील नव्या संवेदनांचा सुगंध पसरवत कवयित्री रणरागिणी संगीता बढे यांनी पुन्हा एकदा आपली साहित्यसक्त छाप उमटवली आहे.

नुकत्याच हिंगणघाट येथे पार पडलेल्या मराठी साहित्य मंडळाच्या पंधराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांच्या आठवण बाबांची या हृदयस्पर्शी कवितेला द्वितीय क्रमांकाचा मान मिळाला.वडील नसलेल्या लहान मुलाच्या मनातील ओलाव्याचे, वेदनेचे आणि आकांक्षेचे जिवंत चित्रण या कवितेत आहे. या चाळीसाव्या अखिल भारतीय कवी संमेलनात राज्यभरातील चाळीस कवींनी आपल्या कविता सादर केल्या होत्या. त्यात संगीता बढे यांच्या भावनिक शैलीने परीक्षकांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. किरण नागतोडे (वर्धा) या होत्या. उद्घाटक म्हणून तुकाराम सातपुते, तर माजी अध्यक्ष डॉ. पुष्पा तायडे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांमध्ये तालुकाध्यक्ष डॉ. बालाजी राजुरकर, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर (मुंबई) आणि ॲड. नीता कचवे (अमरावती) यांचा समावेश होता.

# मतदारयादीतील नावांची शहानिशा करून दुरुस्ती करा

**वर्धा-** निवडणूक विभागाच्या प्रभाग मतदार यादीमध्ये त्रुट्या असून, अनेकांची नावे या प्रभागातून त्या प्रभागात गेली आहेत.त्यामुळे या नावांची शहानिशा करून तत्काळ दुरुस्ती करण्याची मागणी माजी जि.प. सदस्य संजय शिंदे यांनी तहसीलदार यांच्यामार्फत निवडणूक अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



प्रभाग क्र. ३० (निर्वाचन गण क्र. ५९) मधील मतदार यादीतील पृष्ठ क्रमांक ९४ ते पृष्ठ क्रमांक ११६ पर्यंत जास्तीत जास्त नावे ही पिपरी (मेघे) प्रभाग क्र. २१ मधील असल्याचे दिसून येते. एकुणच प्रभागातील मतदार यादीमध्ये गंभी त्रुटी असून, प्रभाग निवडणूक प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तेव्हा या तक्रारीची गंभीर दखल घेऊन मतदार यादीची शहानिशा करून आवश्यक ती दुरुस्ती करण्याची मागणी माजी जि.प. सदस्य संजय शिंदे यांनी केली आहे.

# गोमय दिव्यांनी उजळली 'हरित' दिवाळी

## हिंगणघाटच्या जीवरक्षक फाऊंडेशनचा अनोखा पर्यावरणपूरक उपक्रम

**हिंगणघाट/जनमाध्यम**

गाईला आपल्या संस्कृतीत 'गोमाता' म्हणून पूजले जाते. तिच्या शेणालाही धर्मशास्त्रात पवित्र मानले गेले आहे. याच गोमयाचे पर्यावरण रक्षणासाठीचे महत्व ओळखत हिंगणघाट येथील जीवरक्षक फाऊंडेशनने गाईच्या शेणापासून दिवाळीसाठी विशेष दिवे तयार केले आहेत.

या पर्यावरणपूरक गोमय दिव्यांना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, दिवाळीपूर्वीच विक्री झपाट्याने सुरू आहे. शेणापासून तयार केलेले हे दिवे पाण्यावर तरंगतात, वातावरणातील दूषित वायू शोषून घेतात आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात, अशी माहिती संस्थेचे राकेश झाडे यांनी दिली.त्यांनी सांगितले की, या दिव्यांच्या विक्रीतून मिळणारा निधी संस्थेकडील जखमी, मुक्या व अनाथ गोमातांच्या आणि इतर प्राण्यांच्या देखभालीसाठी वापरला जाणार आहे. पूर्वी दिवाळीत अंगणात शेणाचा सडा घालण्याची प्रथा होती, परंतु शहरी जीवनात ती हरवत आहे. हाच वारसा टिकवून ठेवण्यासाठी आणि घराघरांत गोमयाचा सुगंध पोहोचवण्यासाठी हा उपक्रम हाती घेतल्याचे फाऊंडेशनने सांगितले.झाडे यांनी नागरिकांना आवाहन केले की, यंदाच्या दिवाळीत कृत्रिम दिव्यांऐवजी अशा नैसर्गिक गोमय दिव्यांचा वापर करा आणि पर्यावरणरक्षणाला हातभार लावा.



## जाहीर सूचना

आम जनतेस जाहीर सूचीत करण्यात येते की, माझे पक्षकार राहणार वर्धा तह. जि. वर्धा यांनी अशोक विठोबा राऊत, बाबाराव धोंडबा राऊत, बेबीबाई बुरे, मुकुंद राऊत, शेवंताबाई चौधरी राहणार रोठा त. जि. वर्धा यांच्या सामायीक मालकी आणि ताब्यातील खालील प्रमाणे वर्णन केलेली शेतजमीन विकत घेण्याबाबत ईसार करार केला असून सदर मालमतेचे वर्णन येणे प्रमाणे ' वर्धा जिल्हा परिषद हद्दीतील मौजा रोठा येथील शेत सर्वे नंबर ५५ क्षेत्रफळ ०. ४३ हे. आर. भोगवटदार वर्ग १'.

वर नमुद केलेल्या मालका व्यतिरिक्त कोणाचाही वरील शेतजमीनी संबंधी कसलाही वारसाण हक्क, अधिकार तसेच कुठल्याही प्रकारचा करार कुणाचा दावा, बोझा, किवा गहाण अथवा कोणतीही हरकत इत्यादी असल्यास त्यांनी वरील सूचना प्रसिद्ध झाल्या पासून सात (०७) दिवसाच्या आत योग्य त्या मूळ कागदी पुराव्यासह लेखी आक्षेप माझ्याकडे नोंदवावा उपरोक्त मुदतीनतंर माझे पक्षकार वरील शेत जमीनीचे खरेदीखत करुन घेतील आणि त्यानंतर कोणाचाही कसलाही प्रकारचा उजर लक्षात घेण्यात येणार नाही. तसेच माझे पक्षकाराला बंधनकारक राहणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

वर्धा                                   संपर्क
दिनांक. २०/१०/२०२५ **ॲडव्होकेट आर. एम. घंगारे**
**गिरीपेठ कारला चौक, पिपरी (मेघे), वर्धा.**
**मोबाईल नं. ८५५४०३१३४०**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३२१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# नगरपरिषद नगराध्यक्षांच्या निवडणुकीत राजकीय चुरस वाढणार

## सत्ता मिळवण्यासाठी नेत्यांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

नगरपरिषदेसाठी नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती साठी प्रवर्गासाठी आरक्षित ठरले असून, या निर्णयामुळे आगामी निवडणुकीत राजकीय समीकरणांची नव्याने मांडणी होणार आहे. भाजप काँग्रेस शिवसेना उबाठा व शिवसेना शिंदे गटाची सक्रियता आणि स्थानिक आघाड्यांच्या हालचालींमुळे शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापणार आहे.

नगरपरिषद क्षेत्रातील एकूण मतदारसंख्या ४५ हजार असून, नगरपरिषदेचे एकूण १४ प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत. दिवाळीनंतर पालिका निवडणुकीचा बिगूल वाजू शकतो. मागील निवडणुकीत नगराध्यक्ष पद खुला प्रवर्गसाठी होते. त्यावेळी भाजपचे ॲड कमलकांत लाडोळे यांनी एम आय एम पक्षाचे सैय्यद मोजिद यांचा थोडक्यात पराभव करत नगराध्यक्षपद पटकावले होते. यंदा हे पद अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल दिसून येणार आहे. शहरात काँग्रेस शिवसेना उबाठा युतीने एकत्र निवडणूक लढण्याची शक्यता नाकारता येत नाही. युतीमध्ये नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना उबाठा आपला दावा करू शकते. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सुद्धा स्वतंत्रपणे आपला उमेदवार देवू शकतो. अंजनगाव सुर्जी स्थानिक आघाड्याही सक्रीय झाल्यास प्रमुख पक्षांचे गणित बिघडविण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाढलेल्या नगरसेवकांची संख्या तसेच अनुसूचित जाती आरक्षणामुळे वेळेवर राजकीय पक्षापेक्षा स्वच्छ प्रतिमा असलेले उमेदवारांवर निवडणूक होऊ शकते.त्यामुळे अनेकांच्या इच्छेवर पाणी फिरू शकते.






शहरातील विकासकामे, तसेच प्रशासक काळात भ्रष्टाचाराच्या आरोप-प्रत्यारोपाची राळ उठू शकते. विशेष म्हणजे, नगराध्यक्ष पद हे पुन्हा एकदा थेट जनतेतून निवडले जाणार आहे. त्यामुळे नागरिकांचा थेट सहभाग आणि स्थानिक मुद्द्यांवर केंद्रित निवडणूक अशी अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीची रंगत राहणार आहे. वाढते राजकीय वातावरण पाहता, येणाऱ्या निवडणुकीत अंजनगाव सुर्जी हे जिल्ह्याचे लक्षवेधा ठरण्याची शक्यता आहे.

प्रचाराचा प्रमुख मुद्दा-पालिकेत मागील तिन वर्षापासून प्रशासक आहे. या कालावधीत करण्यात आलेल्या विकास कामावरून मोठ्या प्रमाणात श्रेयवाद निवडूकीत पुढे येवू शकतो. यात शहरातील निकृष्ट दर्जाचे बांधलेले सिमेंट रस्ता व शासकीय वाहनासह घंटागाडी इंधन खर्चात झालेला घोटाळयाचा प्रामुख्याने समावेश होवू शकतो.

## मजीप्रा कंत्राटदार संघटनेचे आंदोलन स्थगित

**अमरावती/का.प्र.**

पाणीपुरवठा योजनेतील थकीत देयके दिल्याने पुरवठा बंद करण्याचा कंत्राटदार संघटनेने दिलेला इशारा मागे घेतला आहे. मध्यवर्ती कार्यालयाकडून २०२५-२६ चे देयक देण्याचे मान्य करण्यात आले असून उर्वरित २०२४-२५ चे देयक दिवाळीनंतर पंधरा दिवसांत देण्याचे ठोस आश्वासन मिळाल्याने नियोजित पाणीपुरवठा बंद आंदोलन स्थगित करण्यात आल्याचे अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनचे मार्गदर्शक धनंजय बंड यांनी सांगितले.

गेल्या वर्षभरापासून पाणीपुरवठा योजनेत काम करणाऱ्या कंत्राटदारांचे देयक न मिळाल्याने अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनने मजीप्रावर ठिय्या आंदोलन करीत शुक्रवारी सायंकाळपासून पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा दिला होता. यामुळे अमरावती शहरासह दर्यापूर, अंजनगावसुर्जी, चिखलदरा या शहराचा व ग्रामीण पाणीपुरवठा योजनेंतर्गत होणारा पुरवठा विस्कळीत होणार होता. या योजनेवर निर्भर पंधरा लाख नागरिकांना त्याचा फटका बसण्याची शक्यता होती. दरम्यान, निधी मागणीसाठी जीवन प्राधिकरणाचे अधिकारी शुक्रवारी मुंबईत मध्यवर्ती कार्यालयात तळ ठोकून होते. त्यांनी केलेल्या निधीची मागणी पूर्ण झाली. त्यामुळे कंत्राटदारांना थकीत देयके मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. मजीप्राच्या मध्यवर्ती कार्यालयातील अधिकाऱ्यांनी कंत्राटदार संघटनेला वर्ष २०२५-२६ चे देयके देण्याचे व वर्ष २०२४-२५ चे देयके दिवाळीनंतर पंधरा दिवसांत देण्याचे ठोस आश्वासन दिले. आश्वासनानंतर अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनने नियोजित काम बंद आंदोलन मागे घेतले आहे. यामुळे आता पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे.

### अनुसूचित जमाती शेतकऱ्यांसाठी

## कृषी प्रशिक्षण, हरभरा बियाणे व निविष्ठा वितरण कार्यक्रम

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

भारतीय कृषी अनुसंधान परिषद - केंद्रीय कापूस संशोशन संस्था, नागपूर यांच्यावतीने अचलपूर तालुक्यातील निमदरी येथे नुकतेच निमदरी (अचलपूर) या आदिवासी बहुल गावात एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण, हरभरा बियाणे व कृषि उपयोगी निविष्ठा वितरण कार्यक्रम केंद्र शासन पुरस्कृत अनुसुचित जमाती विकास कृती आराखडा या योजने अंतर्गत आयोजित करण्यात आले होते.



यामध्ये केंद्रीय कापूस संशोशन संस्थेचे योजना समन्वय अधिकारी व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिपक नगराळे, अचलपूर तालुका कृषी अधिकारी अक्षाय क्षीरसागर,श्रद्धा भुले (सहाय्यक कृषी अधिकारी), शशांक कुरळकर (उपकृषी अधिकारी),लक्ष्मी काळे (सरपंच-निमदरी),रमेश बोलसरे (उपसरपंच-निमदरी),निशांत इंगळे, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक-आत्मा, श्री. आर. एम. रामटेके, वरिष्ट तांत्रिक सहाय्यक व सारंग श्रीरामे, वाय. पी.१ तसेच निमदरी गावातील मोठ्या संख्येने महिला व पुरुष शेतकरी यांचा सहभाग होता. सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक, निशांत इंगळे यांनी केले. कार्यक्रमादरम्यान डॉ. दिपक नगराळे यांनी कपाशी व हरभरा पिकातील मुख्य कीड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन, अक्षय क्षीरसागर यांनी कृषि विभागातील नव-नविन योजना, सोबतच आर. एम. रामटेके कपाशी व हरभरा पिकातील तण नियंत्रण तसेच खत व्यवस्थापन यावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी निमदरी येथील अनुसूचित जमाती समूहातील शेतकऱ्यांना कृषी निविष्ठांचे वितरण करण्यात आले. यामध्ये हरभरा बियाणे (वाण-जाकी ९२१८), निमतेल, बीजप्रक्रियेसाठी ट्रायकोडर्मा मित्र बुरशी व कपाशीतील गुलाबी बोंडअळी निगराणी साठी कामगंध सापळे यांचे उपस्थित शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले.आर. एम. रामटेके यांनी आभार प्रदर्शन केले.

## टीईटी अनिवार्यता संदर्भात होणार सुनावणी

**अमरावती/का.प्र.**



सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार इयत्ता १ ते ८ पर्यंतच्या वर्गांमध्ये अध्यापन करणाऱ्या जिल्हा परिषद, खासगी प्राथमिक तसेच अनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षकांसाठी 'टीईटी' परीक्षा अनिवार्य ठरविण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार आता फक्त 'टीईटी' पात्र शिक्षकांनाच मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी या पदांवर पदोन्नती मिळू शकणार आहे. ज्या शिक्षकांकडे पदोन्नतीसाठी आवश्यक सेवा ज्येष्ठता आहे पण 'TET' पात्रता नाही, त्यांना पदोन्नती मिळणार नाही. केंद्रप्रमुखांच्या ५०% पदांची भरती सरळसेवा आणि उर्वरित ५०% पदे पदोन्नतीच्या माध्यमातून केली जातात. विस्ताराधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठीही हाच नियम लागू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या १ सप्टेंबरच्या आदेशानंतर सध्या मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्ताराधिकाऱ्यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया थांबविण्यात आली आहे.

शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी नागपूर येथिल बैठकीत महाराष्ट्रातील सर्व शिक्षक संघटनांना आश्वासन दिले होते की,शासन सुर्पिम कोर्टात फेरयाचिका दाखल करणार पण आजपर्यंत ही याचिका दाखल झाल्याचे दिसत नाही.त्यामुळे आगामी काळात शिक्षक संघटना आंदोलन करणार आहे.आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीवर याचा परीणाम शासनाला दिसेल.फेरविचार याचिका सुनावणी दरम्यान २ न्यायाधीशांनी 'टीईटी' बाबत फेरविचार याचिका मोठ्या बेंच कडे वर्ग केला.७ पेक्षा जास्त न्यायाधीश बेंच निर्णय घेतील.

## २३ दिवसांच्या बाळावर अघोरी उपचार

### आईनेच दिला बाळाला 'डम्मा';आईविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/का.प्र.**

पोटच्या अवघ्या २३ दिवसांच्या नवजात बाळाच्या पोटावर उपचार म्हणून अगरबत्तीने डम्मा (चटके) देण्यात आले. २१ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर दरम्यान ही अघोरी उपचाराची घटना घडली. याप्रकरणी चिखलदरा पोलिसांनी आशा वर्कर जीजी भोगेलाल सावलकर (४०, रा. लाखेवाडा, ता. चिखलदरा) यांच्या तक्रारीवरून शुक्रवारी (दि. १७) सायंकाळी डम्मा देणाऱ्या बाळाच्या २६ वर्षीय आईविरुद्ध महाराष्ट्र जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम २०१३ च्या कलम ३, २ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

२६ वर्षीय महिलेने काही दिवसांपूर्वी मुलाला जन्म दिला. मात्र काही दिवसानंतर त्या नवजात बाळाला पोटाचा त्रास सुरू झाला, ते बाळ उलटी करत होते. त्याच्यावर उपचार म्हणून मातेने बाळाच्या पोटावर अगरबत्तीने चटके दिले. त्यामुळे ते जखमी झाले. नियमित तपासणीसाठी गेलेल्या आशा वर्कर जीजी सावलकर यांच्या ती बाब लक्षात आली. त्यांनी आरोग्य यंत्रणेला कळवले. त्यानंतर त्या बाळाला तालुक्यातीलच शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. चिखलदरा तालुक्यात यापूर्वीही नवजात बाळाच्या पोटावर डम्मा देण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. गावरानी इलाज म्हणून तसेच जुन्या चालीरिती, रुढी परंपरेनुसार अघोरी इलाज करून स्वतःच्या नवजात बाळाला अगरबत्तीने चटके दिले, अशी तक्रार जीजी सावलकर यांनी पोलिसांत दिली पोटावर आहे. तक्रारीवरून शुक्रवारी (दि. १७) सायंकाळी बाळाच्या २६ वर्षीय आईविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. डम्मा देणाऱ्या बाळाच्या २६ वर्षीय आईविरुध्द गुन्हा दाखल केला

## धारणी शेतशिवारातून केबल व नोझल चोरी

**धारणी -** अज्ञात चोरट्यांनी शेतातून विद्युत केबल, स्टार्टर व नोझल चोरून नेल्याची घटना घडली. हुकुमचंद नंदुसा मालवीय (७०) रा. तलई असे फिर्यादी शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्या धारणी येथील शेतातून अज्ञात चोरट्याने २९० फूट केबल किंमत अंदाजे १३ हजार ५० रूपये, स्टार्टर किंमत २ हजार रूपये व स्प्रिंक्लरचे नोझल किंमत अंदाजे ७हजार रूपये असा एकूण २२ हजार ५० रूपयांचा माल चोरूनन नेला. मालवीय यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

# मक्याची आवक वाढल्याने भाव कोसळले

**अमरावती/का.प्र.**



खरीप हंगामात अतिवृष्टी आणि रोगराईच्या संकटाचा सामना केल्यानंतर शेतकऱ्यांच्या आशांवर आता बाजारातील भाव कपातीने पाणी फेरले आहे. गेल्या काही आठवड्यांपासून मक्याचे दर कोसळल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. मेळघाटातील शेतकऱ्यांनी आपला मका विक्रीसाठी अचलपूर बाजार समितीत नेला असता, त्यांना फक्त सरासरी १,३०० रुपये प्रतिक्विटल इतका दर मिळाला. विशेष म्हणजे, मक्याचा हमीभाव हा २,४०० रुपये आहे. हाच मका गेल्या महिन्यात २,००० ते २,४०० प्रतिक्विंटल दराने विकला जात होता.

> शेतकऱ्यांनी दोन दिवसांपासून कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्रीसाठी मका आणला आहे. परंतु सध्या बाजारात मक्याला फक्त हजार ते बाराशे रुपये प्रति क्विटल इतका अत्यल्प भाव मिळत आहे, जो उत्पादन खर्चापेक्षा खूपच कमी आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या मका पिकाला किमान आधारभूत किंमतीप्रमाणे योग्य दर मिळवून द्यावे.
>
> **ॲड. बंड्या साने,**
> सदस्य, गाभा समिती.

> मी दोन एकर क्षेत्रात मक्याचा पेरा केला होता. यासाठी पेरणी ते क्विटल हाती आले. अचलपूर येथील बाजार समितीत मक्याला १ हजार रुपये काढणीपर्यंत अंदाजे ५० हजार रुपये खर्च आला. एकूण उत्पन्न १८ प्रति क्विटल भाव मिळाला. एकूण ३२ हजार रुपयांचे नुकसान सोसावे लागले. -
>
> **गोपाल चतूर,**
> शेतकरी, मोहीफाटा

बाजारात नवीन मक्याची आवक वाढल्याने व्यापाऱ्यांनी खरेदीदर कमी केले आहेत. मात्र, व्यापारी संगनमत करून दर कृत्रिमरीत्या पाडत असल्याचा शेतकऱ्यांचा थेट आरोप आहे. शुक्रवारी अचलपूर येथील बाजार समितीत १ हजार ८० क्विटल मक्याची आवक झाली. किमान १ हजार तर कमाल १६०० रुपये भाव मिळाला. सरासरी दर १३००रुपये प्रतिक्विंटल आहेत. सध्या या बाजार समितीत मेळघाटातील मक्याची आवक वाढली आहे.शेतमाल खरेदीसाठी शासनाने हस्तक्षेप करून तातडीने हमीभावाने खरेदी न केल्यास कर्जबाजारी होण्याची वेळ येईल आणि परिस्थिती अधिक बिकट सुरू करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. शासनाने वेळेत हस्तक्षेप होईल, अशी भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. बाजारपेठेतील भाव स्थिर होईपर्यंत मक्याची विक्री घाईत करू नये. साठवणुकीची सोय असल्यास पीक सांभाळून ठेवावे. पुढील पिकासाठी लागवडीपूर्वी खर्चाचा पुन्हा एकदा आढावा घ्यावा. तसेच, बाजार समितीच्या दरमाहितीवर लक्ष ठेवून नजीकच्या बाजारात स्पर्धात्मक भाव मिळेल तिथेच विक्री करावी, असा सल्ला शेतीतज्ज्ञांनी दिला आहे.

## संक्षिप्त

### गुरुवारी उपवर युवक-युवती व पालक परिचय मेळावा

**अमरावती-** मागील ३५ वर्षापासून विश्वासपात्र ठरलेल्या मराठा विवाह मंडळ वाचनालयाच्यावतीने व दरवर्षीप्रमाणे दिवाळी विशेष 'उपवर युवक - युवती व पालक परिचय मेळावा' गुरुवार २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळात मंडळाचे कार्यालय, नारायणनगर बगीचा, रूक्मिणीनगर अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे.मंडळाचे अध्यक्ष डॉ. गणेश पाटील (माजी कुलगुरू अमरावती विद्यापीठ) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या मेळाव्यासाठी मंडळाच्या कार्यालयात उपवर युवक युवतींची नोंदणी सुरू असून दुपारी ४ ते सायंकाळी ६ वेळात मंडळाच्या कार्यालयात येऊन नोंदणी करावी.मंडळात यापूर्वी नोंदणी झालेली भरपूर स्थळे उपलब्ध आहेत. तरी या संबंधितांनी मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे सरकार्यवाह दिगंबर शहापुरे यांनी केले आहे.

### अशोक पवार यांचा सत्कार



**कुऱ्हा-** वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५७ वा पुण्यतिथी महोत्सव गुरुकुंज आश्रम मोझरी येथे झाली. गोपाल काल्याच्या कार्यक्रम प्रसंगी विविध संस्थानचे अध्यक्ष तथा विश्वस्त यांचा अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज तर्फे सत्कार करण्यात आला. श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान, श्रीक्षेत्र कौंडण्यपूर चे कार्यकारी विश्वस्त अशोक पवार यांचा मा. प्रचार प्रमुख प्रकाश वाघ यांचे हस्ते शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. विदर्भाचे पंढरपूर असलेले श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर हे माता रुक्मिणीचे माहेर आहे. या संस्थानचे कार्यकारीणी विश्वस्त मंडळ, संस्थानचे कार्य यशस्वीपणे सांभाळीत आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर, कडून अशोक पवार विश्वस्त यांचे अभिनंदन करण्यात आले.

### एकता शारदा उत्सव तर्फे देणगी प्रदान



**अमरावती-** डॉ. राजीव डांगे यांच्यामार्फत एकता शारदा उत्सव बहुउद्देशीय महिला मंडळ आशियाड कॉलनी तर्फे अध्यक्ष प्रीती देशमुख यांच्यातर्फे डॉ. गोविंद कासट मित्र मंडळीला समारंभ पूर्वक रद्दी तुन वृद्धी तसेच होतकरू बांधवांसाठी सायकल व अंध अपंगांच्या कार्यात देणगी रूपात सहकार्य करण्यात आले.सहकार्याचा स्वीकार डॉ. राजू डांगे व उमेश वैद्य यांनी केला. याप्रसंगी तात्यासाहेब देशमुख, अनुपसिंह सिंगर, रंजना लांडे, कीर्ती बोरकर, वंदना रंभाळ, बेबी तायडे, मीना ठाकरे, शिला इंगोले, प्रमिला सावरकर, मृणाल वानखडे, कविता जाधव, संगीता काळमेघ, शांता अवघड सह अनेक भगिनी उपस्थित होत्या.

### आशियाई मास्टर्स स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांचा शुभेच्छा



**अमरावती-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या ट्रॅकवर ॲथलेटिक्स स्पर्धा साठी नेहमी सराव करणाऱ्या एकूण बारा स्पर्धकांचे चेन्नई येथे होणाऱ्या २३ वे आशियाई मास्टर्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दि. ५ ते ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जवाहर स्टेडियम चेन्नई येथे या स्पर्धा होणार ७५ प्लस वयोगटातील लक्ष्मण तडस यांच्या नेतृत्वात निवड झालेल्या स्पर्धक पुरुष गट- लक्ष्मण तडस नंदकिशोर मालवीय संजय देशमुख राधेश्याम यादव डॉ. प्रशांत शिंगवेकर व शिवचरण यादव. महिला गट- पुष्पा चौधरी, सुनंदा वरठी, नंदा सोनुने, नंदा खंडारे, डॉ. अरुणा गुल्हाने व ममता सांगोडे यांचा समावेश आहे.सर्वप्रथम लक्ष्मण तडस व डॉ. गोविंद कासट यांनी पद्मश्री यांचा शाल व पुस्तक देत सत्कार केला, तसेच डॉ. माधुर्री चेंडके यांचा पुर्ष्पा चौधरी, सुनंदा वरठी, नंदा सोनुने व नंदा खंडारे यांनी सत्कार केला. प्रास्ताविक संचालन डॉ. गोविंद कासट, आभार लक्ष्मण तडस यांनी मानले.

### गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळी वसूबारस साजरी

**दर्यापूर-** दिपावली सणाच्या शुभारंभी साजरा होणारा वसुबारस या दिनाला पूजेचे तथा गाय वासरांसाठी अन्नदानाचे विशेष महत्व प्राप्त असून संपूर्ण देशात हा दिवस अतीशय मनोभावे साजरा होतो.याच संस्कृतील वसुबारस हा सोहळा दर्यापूर तालुक्यातील माहुली (धांडे ) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळी विधिवत पद्धतीने साजरा झाला.या निमित्याने संपूर्ण गोरक्षण परीसर, पाणी पिण्याचे टाके स्वच्छ करून रेणू -धनू या गाय जोडीचे मानाचे पूजन करून एकंदरीत एकशे साठ गाय वासरांना विशेष अलप प्रदान करण्यात आला . या शिवाय सायंकाळी गाय-वासरांचे पूजन करून वासरांना कडधान्य पीठाचाही अलप दिल्या गेला.गोरक्षण संस्थेशी संबंधीत विदर्भातील बहुतांश मान्यवरांनी या दहा दिवसीय गोपूजनाच्या पहिल्या दिवसात आर्थिक सहभाग नोंदविला.यामध्ये डॉ महेंद्र ढोरे(अमरावती विद्यापीठ प्र कुलगुरु) यांचेसह रमेशराव गेबड, प्राचार्य डॉ प्रशांत थोरात, डॉ सुनिल अग्रवाल, डॉ संजय मकवाना, डॉ प्रेमकुमार भानावत, डॉ आनंद ताथोड, नितीन विधळे, एस जी मोरे, प्रा सौरभ सोनखासकर, आशिष पागरूत, प्रा. आदित्य गणगणे, प्रसाद पांडे, सौरभ गावंडे, प्रा. शाहू चोरे, डॉ अपेक्षा घोरमोडे ( काळमेघ ), प्रा पी एम राऊत ,प्रा अमीत गावंडे, प्रा वेद कुलट, सुनिल देशमुख, गोविंद लड्ढा, अजयराव देशमुख, डॉ सचिन अग्रवाल, डॉ अरविंद देशमुख, प्रा प्रदीप लांडे, प्रा सुमला निंगवाल, प्रा प्रदीप पांडव, महेंद्र कराळे, प्रा प्रणाली नागे, प्रफुल्ल गावंडे, सौ सरीता काठोळे, प्राचार्य डॉ सुनिल ठाकरे,सुशीला कावलकर, डॉ एम एस पाटील, प्रा सुनिल सुरतकर, संतोषराव पेठे, डॉ अभिनंदन गुप्ता, प्रा आर एस जाधव, प्रा राम विघे इत्यादी देणगीदारांचा सहभाग होता . येणाऱ्या गाई गोंदण पूजेच्या दहा दिवसीय संकल्प सेवा यज्ञात अनेक मान्यवर सहकार्य करणार असल्याचे संकेत प्राप्त असून या सर्वांचे गोरक्षण संस्थेच्यावतीने संस्थेचे संस्थापक संचालक प्रा. गजानन भारसाकळे व सचिव शेखर पाटील यांनी आभार व्यक्त केलेले आहेत .



# १२ तासांत खुनाचा उलगडा : यवतमाळमधून
# आरोपी शाहरूख ब्लॅक जेरबंद

**नांदगावपेठ / प्रतिनिधीः-** नांदगावपेठ पोलीस ठाणे हद्दीतील रामगाव शेतशिवारात घडलेल्या खुनाच्या घटनेचा उलगडा अवघ्या १२ तासांत अमरावती शहर गुन्हे शाखेने केला आहे. या प्रकरणात फारुख खान शमशेर खान उर्फ शाहरूख ब्लॅक (वय ३२, रा. अकबर नगर, अमरावती) या आरोपीस यवतमाळ येथील भोसा रोडवरील सासरवाडीतून (दि.१९) अटक करण्यात आली आहे.

शुक्रवारी रात्री सैयद शाहरूख सैयद फारुख (वय ३४, रा. अकबर नगर) या

### दारूच्या नशेत क्षुल्लक वादातून केली मित्राची हत्या

युवकाची निर्दयीपणे हत्या करण्यात आली होती. घटनेनंतर परिसरात वेगवेगळ्या चर्चा होत्या. मात्र, गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा माग काढत यशस्वी सापळा रचला.

तपासात उघड झाले की, मृतक आणि आरोपी हे दोघेही एकमेकांचे मित्र असून, दारूच्या नशेत क्षुल्लक वाद झाल्याने आरोपीने संतापाच्या भरात चाकूने



वार करून आरोपीने मित्राची हत्या केली. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. तो मोटरसायकल चोरीसह विविध गुन्ह्यांमध्ये सामील असून, वारंवार आपले वास्तव्य बदलत असल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान होते.

तथापि, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने यवतमाळपर्यंत शोधमोहीम राबवून आरोपीला जेरबंद केले. त्यानंतर आरोपीस पुढील तपासासाठी नांदगावपेठ पोलिसांच्या ताब्यात



देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त श्याम घुगे, उपायुक्त (मुख्यालय व गुन्हे) रमेश धुमाळ, तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत ☞(पान २ वर)

## महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या उपाध्यक्ष पदी
# ॲड. प्रशांत देशपांडे यांची बिनविरोध निवड
### अध्यक्ष पदाकरीता उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यात लढत



**अमरावती/प्रतिनिधीः-** येत्या पाच वर्षांकरिता महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या निवडणुका जाहीर झाल्या असून नामांकन परत घेण्याच्या शेवटच्या दिवशी फक्त उपाध्यक्ष पदा करिता निर्विरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या उपाध्यक्ष पदी ॲड. प्रशांत देशपांडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्ष पदासाहित इतर संपूर्ण कार्यकारिणीची निवडणूक दि. २ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे.

अमरावती क्रीडा क्षेत्रातीलच नव्हे तर सामाजिक, राजकीय, कला क्षेत्रातील दबदबा असणारे, जगप्रसिद्ध श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष , अमरावती जिल्हा वकील संघाचे मा. अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे सध्या ऑलिम्पिक संघटनेच्या मावळत्या कार्यकारिणीत सहसचिव म्हणून कार्यरत असून आपल्या अभ्यासू आणि मनमिळावू स्वभावामुळे ते संपूर्ण राज्यभरातील क्रीडाक्षेत्रात सुपरिचित आहेत. क्रीडाक्षेत्रातील या सर्वोच्च संघटनेत महत्वाच्या पदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी ॲड. प्रशांत देशपांडे यांच्यावर महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या संघटनेच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी मागील अनेक वर्षांपासून आहे. नुकतेच ॲड. देशपांडे राज्य व्हॉलिबॉल संघटनेचे सुद्धा बिनविरोध उपाध्यक्ष म्हणून निर्वाचित झालेले आहेत. अमरावती जिल्ह्यातील अनेक क्रीडा संघटनांची महत्त्वाची पदं ॲड. देशपांडे सांभाळत असून खेळाडूंना सर्वप्रकारची मदत आणि मार्गदर्शन करण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे महासचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांचे सह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी ॲड. प्रशांत देशपांडे यांचे अभिनंदन केले आहे.

# रहाटगाव बनावट नोट प्रकरणात आणखी दोघांना अटक
### ५७ हजारांच्या बनावट नोटा जप्त; आतापर्यंत पाच आरोपी पोलिसांच्या ताब्यात
### मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** रहाटगाव परिसरात उघडकीस आलेल्या बनावट चलनी नोटांच्या प्रकरणात नांदगाव पेठ पोलिसांनी रविवारी (दि.१९) आणखी दोन संशयितांना अटक करून ५७ हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. आतापर्यंत या प्रकरणात पाच जणांना अटक करण्यात आली असून, या रॅकेटचा मास्टरमाईंड अद्याप फरार



आहे. पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यासाठी वेगाने तपास सुरू आहे. अटक करण्यात आलेले आरोपी आदित्य रामेकर (रा. समर्थवाडी, रहाटगाव) व यश सतीश बर्वे (रा. दत्तवाडी, रहाटगाव) हे असून, आदित्य रामेकर याच्याकडून तब्बल ४८ हजार रुपयांच्या, तर यश बर्वे याच्याकडून ९ हजार रुपयांच्या बनावट नोटा हस्तगत करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे. या आधी पोलिसांनी तीन आरोपींना अटक करून काही प्रमाणात ☞(पान २ वर)

# गोमांस विक्री करताना युवक रंगेहात अटक
### पोलिसांची कारवाई; ६० हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**मोर्शी /प्रतिनिधीः-** धार्मिक भावना दुखावणाऱ्या आणि कायद्याला डावलणाऱ्या कृत्यावर मोर्शी पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. पिंपळखुटा (मोठा) येथे एका ☞(पान २ वर)



































